म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय नाटक
दा. क्र. १८८८१

IRBK-0118881
IRBK-0118881

# फुलाला सुगंध मातीचा

शरद घाग

IRBK-0118881

मूल्य दहा रुपये

मॅजेस्टिक बुक स्टॉल

प्रथम प्रयोग : गुढी पाडवा, मंगळवार, दिनांक ७ एप्रिल १९७०
स्थळ : शिवाजी मंदिर, दादर, मुंबई २८
नाट्यपरीक्षण मंडळ DRM ४१८/७०

या नाटकाच्या प्रयोगासंबंधीचे सर्व हक्क सौ. मीना घाग यांच्या स्वाधीन आहेत. तरी या नाटकाचा प्रयोग करण्यापूर्वी त्यांची लेखी संमती घेणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

पहिली आवृत्ती : १० एप्रिल १९७१
दुसरी आवृत्ती : २३ जुलै १९७६
तिसरी आवृत्ती : ५ एप्रिल १९८१

© सौ. मीना घाग

मुखपृष्ठ : नरेंद्र भुर्के

प्रकाशक : केशव विष्णु कोठावळे,
मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई ४

मुद्रक : अ. के. कोठावळे,
ॐ मुद्रणालय,
२५० अ, शनिवार पेठ, पुणे ३०

चांदण्या रात्री
पानांआड लपलेल्या फुलांना
केवळ वासाच्या अनुरोधाने शोधून काढण्याची किमया
माझ्या बाळपणीच ज्यांनी मला शिकविली
त्या फुलवेड्या—
*कै. भाऊंच्या स्मृतीला*
माझे हे पहिले कलापुष्प
साश्रुनयनांनी समर्पण !

# माझ्या पहिल्या नाटकाच्या निमित्ताने

' फुलाला सुगंध मातीचा ' हे माझे पहिलेच नाटक ! यापूर्वी मी काही एकांकिका लिहून त्या निरनिराळ्या स्पर्धांतून सादर केल्या होत्या. तरीही मी तीन अंकी नाटक लिहू शकेन असा विश्वास निर्माण व्हायला मला बराच अवधी लागला... थोडक्यात माझ्या मित्रांच्या मते मी बराच काळ फुकट घालवला. (कदाचित त्यांचे म्हणणे बरोबर असेलही !)

आज या नाटकाचे सव्वाशेच्यावर प्रयोग महाराष्ट्रभर झाल्यानंतर ते छापण्याचा योग येत आहे. टीकाकारांच्या थोड्याफार प्रतिकूल टीकेनंतरही हे नाटक प्रेक्षकांना आवडले आहे. माझे पहिलेच नाटक प्रेक्षकांच्या पसंतीस उतरल्यामुळे एका वेगळ्याच अननुभूत कृतार्थतेने माझे मन मोहरून आले आहे— थरारून उठले आहे !

म्हणूनच कृतज्ञतेचे पहिले फूल मी प्रेक्षकांच्या चरणांवर वाहत आहे !

खरं म्हणजे हे कथानक नाट्यरूप घेऊ शकेल असे मला आग्रहाने सतत सांगणारे माझे मित्र श्री. राम वाघेला हे मला भेटले नसते, तर हे नाटकही रसिकांसमोर आले नसते. माझे मित्र श्री. विनायक आयरे व श्री.पद्माकर आठवले यांनीही हे नाटक लिहिताना मित्रत्वाच्या भावनेने नव्या लेखकाला अत्यंत आवश्यक असणारे प्रोत्साहन मला सतत दिले. श्रीमती विमलाबाई घैसास व मित्रवर्य मधुसूदन जोशी यांनीही हे नाटक लिहीत असताना फार मोलाच्या सूचना मला केल्या. या सर्वांचा मी ऋणी आहे.

उमलू पाहणाऱ्या फुलाला पहाटेच्या स्पर्शाने धीर यावा तसा धीर गुरुवर्य माधव मनोहर यांचा प्रोत्साहनाचा हात माझ्या पाठीवरून फिरला तेव्हा मला आला... त्या फुलानं पहाटेशी कृतज्ञ राहावं तितकाच मी माधवरावांशी कृतज्ञ आहे!

या नाटकाचे निर्माते श्री. राजाराम शिंदे व मी या नाटकामुळे एकमेकांचे मित्र बनलो आहोत... (आता आली पंचाईत!) त्यांच्याबद्दलची माझी भावना मी अव्यक्त ठेवलेलीच त्यांना आवडेल... आणि मलाही ती शब्दात व्यक्त करणे जमणार नाही! एवढेच म्हणतो, की 'नाट्यमंदार'चा जोमदार वारा लाभला नसता, तर या फुलाचा 'सुगंध' महाराष्ट्रभर इतक्या लवकर दरवळला नसता!

१०–४–१९७१ —शरद घाग

३५, वल्लभदास तेजपालची वाडी,
रामजी आसद लेन, घाटकोपर, मुंबई–७७.

# सप्रेम आशीर्वाद विशेष

चि. शरद घाग हे प्रथम माझे विद्यार्थी व नंतर मित्र. ज्या माझ्या विद्यार्थ्यांचा मला विशेष अभिमान आहे— अभिमानाचे विशेष कारण म्हणजे ते काही बऱ्यापैकी स्वतंत्र लेखन करतात— त्यांच्यातील पुन्हा शरद घाग यांचे स्थान अनन्यनिर्विशेष आहे. त्याचे कारण म्हणजे त्यांनी काही चांगली नाटके रचलेली आहेत. आणि परिणामकारक नाट्यलेखन हे सोपे काम नव्हे, हे मला चांगले माहीत आहे. मला नसले, तर अन्य कोणाला ते माहीत असणार ? कारण माझी माहिती ही अनुभवसिद्ध आहे.

एक दिवस खरोखरच देखण्या सिनेमानटासारखा दिसणारा ( हे आवर्जून सांगण्याचे कारण असे की सिनेमानट देखणे क्वचितच असतात— आणि नटी पण. ) हा माझा तरुण विद्यार्थी माझ्याकडे आला. आणि मोठ्या नम्रतेने मला म्हणाला की, सर, मी नाटकं लिहिलेली आहेत आणि ती तुम्ही ऐकावीत अशी माझी इच्छा आहे.—नाटकं ? मी मनात म्हटलं, —आता आली का आफत ! बरे, तो नाटक हा शब्द एकवचनी वापरीत नव्हता. द्विवचनी. कदाचित अनेकवचनीही. त्याची ती इच्छा ऐकून खरोखरच मी दचकलो— अर्थात मनातल्या मनात. कारण आविर्भावातील दचकण्याचे दृश्य शिष्टाचारला सोडून दिसले असते.— मी नाटकात काम करणार आहे, ते काम बघायला तुम्ही या;— अशी इच्छा त्याने व्यक्त

केली असती, तर ती त्याच्या साजऱ्या व्यक्तित्वाला शोभून दिसली असती. पण नाटक ?— नव्हे नाटकं ? हे काम मात्र कठीण आहे, अशी खूणगाठ मी मनाशी बांधली. कारण नाट्यवाचनाच्या संबंधातील पूर्वानुभव मला आक्रोशून सांगत होता, की या विद्यार्थ्याची इच्छा तू मानू नकोस. त्यात धोका आहे. धोका अर्थातच वेळेच्या अपव्ययाचा. पण कोणत्याही विद्यार्थ्याची इच्छा अव्हेरून त्याला विन्मुख पाठवणारा हा शिक्षक नव्हता ! आणि ते त्या विद्यार्थ्यालाही चांगले माहीत होते ! ! तात्पर्य, या ऐतिहासिक गुरु–शिष्यप्रसंगाचे फलित असे की आलिया प्रसंगभोगाला सादर होण्यावाचून आता गुरूला गत्यंतरच नव्हते !

शरद धाग या नावाच्या या उत्साही विद्यार्थ्याने आपल्या नाट्योत्साही गुरूला लागोपाठ दोन संपूर्ण नाटके वाचून दाखवली. एक म्हणजे हे : 'फुलाला सुगंध मातीचा.' आणि दुसरे म्हणजे : 'उभ्या रेषा, आडव्या रेषा.' पैकी पहिले तसे ठीक होते— ठीक म्हणजे मराठी लोकप्रिय नाटकाच्या रूढ चाकोरीतील. या असल्या लोकप्रिय नाटकाच्या प्रयोगात मला रस असला, तरी नाटकात मात्र मला मुळीच रस नाही. कारण नागेश जोशींच्या 'देवमाणूस' पासून या तथाकथित कौटुंबिक विनोदी लोकप्रिय नाटकांचा एक साचा ठरून गेला आहे. आणि एक तर कोणताच साचा मला तसा आवडत नाही. आणि 'देवमाणूस' चा तर नाहीच नाही. तात्पर्य, मला मनापासून आवडले ते माझ्या विद्यार्थिमित्राचे दुसरे नाटक— 'उभ्या रेषा, आडव्या रेषा.'

'फुलाला सुगंध मातीचा' या नाटकासारखे एखादे हमखास लोकप्रिय होईल, असे नाटक महत्त्वाकांक्षी तरुण नाटककाराच्या संग्रही असणे आणि त्या नाटकाचे प्रयोग सतत झडत राहणे हे त्याच्या हिताचे आहे, असे मला वाटते. कारण एक तर या लोकप्रियतेच्या परिणामी त्याचा अहंकार सुखावतो. आणि लोकप्रिय नाटकाच्या कर्त्याच्या कोणत्याही नाट्यकृतीकडे लोक अधिक लक्षपूर्वक लक्ष देतात. आणि लोकांची ही कदर त्याच्या नंतरच्या नाटकांना वा नाट्यप्रयोगांना गर्दी खेचण्यासाठी उपकारक ठरल्याशिवाय राहात नाही. 'फुलाला सुगंध मातीचा' मधे भावी लोकप्रियतेचा मालमसाला ठेचून ठासून भरलेला मला उघड दिसत होता. तेव्हा या

नाटकाच्या भावी यशाविषयी काळजी करण्याचे तसे काहीच कारण नव्हते. कारण अशा नाटकाला गिऱ्हाईक पुष्कळ असते.

—पण तरीही 'फुला' च्या संबंधात नाटककाराचे 'भाग्य विशेष' असेच आता म्हणावयास हवे. कारण राजाराम शिंदेसारखा एक व्यवहारनिपुण जिद्दीचा निर्माता या ' फुला 'च्या प्रयोगासाठी उपलब्ध झाला. आणि दत्ता भटांसारखा नाट्यनिपुण, तज्ज्ञ दिग्दर्शकही. शिंदे यांची व्यवहारनिपुणता आणि जिद्द पाठीशी असल्यामुळेच किती तरी अल्पावधीत या नाटकाने आपला शतकोत्तर रौप्यमहोत्सवी प्रयोग साजरा केला. म्हणून म्हटले की या तरुण नाटककाराचे ' भाग्य विशेष ! '

' फुलाला सुगंध मातीचा ' या नाटकातील ' फूल ' म्हणजे एक बिघडलेले मूल आहे– ' दुर्वांची जुडी 'तल्यासारखे. ' जुडी ' त बिघडलेल्या भावाला मार्गी लावू पाहणारी त्याची बहीण आहे, तर ' फुलाला सुगंध 'मधे त्याची भावजय आहे. भाऊबहीण काय आणि दीरभावजय काय, एकच. पण प्रश्न बिघडलेल्या मुलाचा एकच असला, तरी या दोन्हीही नाटकांची कथावस्तू तशी अगदी भिन्न आहे. कथावस्तू तर भिन्न आहेच, पण या नाटकाची रचनाही तदितर भिन्न आहे. शेवटी ' कौशल्य मोठे रचनेत ' असते, हेच खरे. आणि ' फुलाला सुगंध ' हे नाटक ' देवमाणूस ' ला अनुसरणारे असले, तरी त्यातील कुटुंबियांच्या मनोगत संघर्षाची पार्श्वभूमी अगदी वेगळी, स्वतंत्र आणि प्रत्ययकारक आहे.

' फुला 'ला अलोट लोकप्रियता लाभली, याचा अर्थ हे अगदी निर्दोष नाटक आहे; असा अर्थातच नव्हे. तसे कोणतेच नाटक निर्दोष नसते. आणि होतकरू नाटककाराचे पहिले नाटक तर नसतेच नसते. कुटुंबियांच्या आप्तसंबंधातील अकारण वत्सलता वा निष्ठुरता, संभाषणातील अलंकरणाची व विशेष करून दृष्टान्तार्थान्तरन्यासांची विपुलता, स्वभाव-विशेषांच्या मूर्तीकरणाची लालसा, अनपेक्षित घटनाविशेषांची कृत्रिमता, भावविवशता, ही मेलोड्रामाची सर्व आकर्षक लक्षणे ' फुलाला सुगंध '-मध्ये ओतप्रोत आहेत. पण नेमकी हीच लक्षणे लोकप्रियतेचीही घटक असतात, हेही लक्षात ठेवावयास हवे. शेवटी ड्रामापेक्षा मेलोड्रामा अधिक लोकप्रिय ठरतो, तो उपर्युक्त लक्षणांच्याच परिणामी. तात्पर्य, ' फुला 'ची

भावी लोकप्रियता मी गृहीतच धरली होती. आता जी लोकप्रियता गृहीत होती, ती प्रत्यक्ष प्रत्ययास येत आहे; एवढेच. आणि एवढेच केवळ नव्हे, तर या नाटकाची लोकप्रियता प्रतिपच्चन्द्ररेखेव उत्तरोत्तर वाढतच जाणार आहे.

'फुला'चे निर्माते राजाराम शिंदे यांनी या नाटकाची लोकप्रियता सहजप्राप्य असताही ती बळेच खेचून आणण्यासाठी म्हणून जो कुतूहल-जनक स्टन्ट केला, त्याची काही आवश्यकता होती, असे मात्र मला मुळीच वाटत नाही. 'रंगमंचावरून धडाडत जाणारी आगगाडी प्रत्यक्ष पाहा,' ही 'फुला'च्या नाट्यप्रयोगाची जाहिरात नाटककाराच्या परिणाम-कारक नाट्यसंहितेला निःसंशय निष्कारण अन्याय करणारी होती. परिणामी नाट्यसंहितेला तर अन्याय झालाच, पण नाट्यप्रयोगाची प्रारंभिक लोक-प्रियताही धोक्यात आली. कारण पहिल्याच प्रयोगाच्या वेळी रंगमंचा-वरून आगगाडी वेळीच धडाडत जाऊ शकली नाही! आणि आगगा-डीच्या दर्शनापेक्षेने आलेल्या भाबड्या प्रेक्षकांचा विरस झाला. बरे, या नाट्यप्रयोगात रंगमंचावरून धडाडत जाणाऱ्या आगगाडीचे दर्शन अत्या-वश्यक होते, असेही नव्हे. किंबहुना ते आवश्यकही नव्हते. आणि रंग-मंचावरील आगगाडीच्या परिणामी नाट्यसंहितेतील परम महत्त्वाचा असा अंतिम प्रवेश पहिल्या प्रयोगात कटला, तो वेगळाच. तात्पर्य— पण ते आता सांगावयास हवेच का?

'फुलाला सुगंध'पेक्षा 'उभ्या रेषा' हे नाटक मला अधिक रुचले होते. कारण त्या नाटकाच्या विषयाशयात व रचनेतही नवीनता होती. आणि तसे मी नाटककाराला परोपरींनी आवर्जून सांगितलेही होते. माझी समजत अशी आहे की, 'उभ्या रेषा' ही 'फुला'पेक्षाही अधिक महत्त्वाची अशी नाट्यकृती आहे. पण होतकरू नाटककाराची प्रयोगाच्या संबंधातील अविचारी अधीरता म्हणजेच त्या नाटकाच्या प्रयोगाची विफलता ठरली. या प्रयोगाला मी स्वतः हजर नव्हतो, हे एका परीने बरेच झाले. कारण एका फार चांगल्या नाट्यकृतीच्या प्रयोगाचा केविलवाणा पराभव मला बघवला नसता. ते नाटक चांगले आहे, याविषयी माझ्या मनात यत्किंचि-तही शंका नाही. तात्पर्य, पहिले हे की नाट्यवस्तू मुळात चांगली

असूनही भागत नाही. प्रयोगही त्या चांगल्या नाट्यवस्तूस साजेल, असा देखणा व्हावयास हवा, आणि तात्पर्य दुसरे हे, की नाट्यवस्तूला संपूर्ण न्याय देणारा प्रयोग लाभेपर्यंत अधीर नाटककारानेही धीर धरावयास हवा. आपले नाट्यनिर्मातेही असे असमंजस आहेत की एखाद्या समर्थ नाट्यवस्तूचा पहिला प्रयोग अपेशी ठरला, की लगेच ती नाट्यवस्तू सुरेख असूनही ती कायमचीच बाटली, असे ते समजतात. आता या समजुतीला काय म्हणावे ? म्हणावे ते एवढेच, की स्वतःच्या हितासाठी म्हणून तरी निदान त्यांनी अधिक शहाणपणा दाखवावयास हवा. असो. हे थोडेसे विषयान्तर झाले. पण तेही बुद्धिपुरस्सर केले होते, हे संबंधितांनी कृपा करून ध्यानात घ्यावे.

शरद घाग यांच्या नाटकाच्या यशाचा मुहूर्ताचा नारळ तर आता फुटला आहे, आणि 'फुला'ला मुहूर्तही शुभंकर लाभला आहे, असे मी समजतो. सध्या एक समजूत अशी प्रचलित आहे, की मराठी नाटकाला बरे दिवस लाभले आहेत, पण बरे नाटककार मात्र लाभत नाहीत. शरद घाग हे केवळ बरेच नव्हे, तर चांगले नाटककार आहेत. त्यांचे वय तसे अद्याप लहानच आहे आणि 'फुलाला सुगंध मातीचा' हे त्यांचे अगदी पहिले-वहिले नाटक आहे. त्यांच्यासमोर केवढे तरी मोठे आयुष्य खडे आहे. बालसुलभ स्वप्नील वृत्तींचा हा तरुण नाटककार आपल्या हातून भावी काळात निर्माण होणार असलेल्या नव्या नव्या नाट्यकृतींची मनोरंजक स्वप्ने बघण्यात मग्न आहे. त्याची ती स्वप्ने सुभग नाट्याकार धारण करोत, अशी शुभेच्छा त्याच्या पहिल्या नाट्यकृतीच्या प्रकाशनसमयी मी प्रकट करतो. आणि नाट्यक्षेत्रातील मार्गावर उमटलेले त्याचे हे पहिले पाऊल भावी काळातील त्याच्या उत्तमोत्तम नाट्यकृतींचे द्योतक ठरो, अशी मनकामना व्यक्त करून अंतःकरणपूर्वक त्याला आशीर्वाद देतो, की तुझे यापुढील मार्गक्रमणही शुभ होवो.

**माधव मनोहर**

# फुलाला सुगंध मातीचा

दिग्दर्शक : दत्ता भट
नेपथ्य : रघुवीर तळाशिलकर
प्रकाशयोजना : विठ्ठल चव्हाण, सुरेश पाटील
पार्श्वसंगीत : अरविंद पिळगांवकर,
: राजाराम शिंदे
ध्वनिमुद्रण : सुधीर ठाकूर, प्रमोद शहाणे
रंगभूषा : बाबा वर्दम, पोतदार
वेषभूषा : रामचंद्र घाडी
रंगमंचसहाय्यक : गोपाळ बांद्रे, सहदेव राणे,
: रमेश धामणसकर, जयवंत पाटील,
: दत्ताराम सुर्वे, भिवा रसाळ
व्यवस्था : गंगाराम साळवी, रमेश नारद
सुत्रधार आणि निर्माता : राजाराम शिंदे

## कलावंत

उमा : सौ. इंदुमती पैंगणकर
सुमा : कु. ज्योती पाठारे
साहेब : कमलाकर टाकळकर
जयेश : अविनाश मसुरेकर
उमेश : नरेन् चव्हाण
दिगंबरपंत : अविनाश इंगळे
गोविंदकाका : सुहास भालेकर
डॉक्टर : प्रकाश ठाकूर

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ३८८८९ नों. दि २०।८।८९
वि. नाटक

अंक पहिला

## दृश्य पहिले

[ स्थळ : रिटायर्ड कमिशनर सरनाइकांचा दिवाणखाना. समोरच मध्यभागी दिवंगत पत्नीचे छायाचित्र. डाव्या बाजूचा जिना जयेशच्या खोलीकडे जातो. उजवीकडचा जिना साहेब व उमेश यांच्या खोल्यांकडे जातो. उजवीकडे जिन्याखाली बागेत जाण्याचा रस्ता. उजव्या भिंतीकडला स्वयंपाकघरात जाण्याचा रस्ता– डावीकडे बाहेरून आत येण्याचा मुख्य दरवाजा. सजावट आल्हाददायक– सोफासेट– टी पॉयीज्– टेबल. दोन जिन्यांच्या जवळ स्टॅंडस्– त्यांच्यावर पामच्या कुंड्या– उजव्या जिन्या-जवळ हॅट स्टॅंड— मध्यभागी आडवी खिडकी– तिच्यातून मागील बागेचे दृश्य दिसत आहे. ]

वेळ : सकाळची— ९–३० चा सुमार. साहेबांचे कारकून गोविंदराव आणि ज्योतिषी दिगंबरशास्त्री बोलत प्रवेश करतात.

उमा : ( पंचारती घेऊन प्रवेश करीत ) राघू, ए राघू, अरे नाइन अप् गेली बाबा, साहेबांच्या येण्याची वेळ झाली. ( आत जाते. )

दिगंबरशास्त्री : समजले की नाही गोविंदराव— हे असे आहे.

उमा : आणि हे बघ, दोन कप चहा पण ठेव...

गोविंदराव : ते तसं आहे हे आम्हाला माहीत आहे. प्रश्न असा आहे, की ते तसं का आहे?

दिगंबर : ( कुंडली पाहात ) अहो— ते तसंच असणार– समजले!

गोविंद : काय म्हणालात— ते तसंच असणार— पण का?

दिगंबर : अहो, ते तसं असणार नाही तर कसं असणार? ग्रहांची स्थितीच तशी आहे...

गोविंद : ( त्यांच्या हातातील कुंडली घेत– ) ग्रहांची स्थिती तशी आहे? हे बघा दिगंबरपंत, तुमच्या त्या कुंडलीतल्या ग्रहांना सांगा... हा कमिशनर सरनाइकांचा वाडा आहे. इथं चावटपणा नको. म्हणे ग्रहांची स्थिती तशी आहे. स्थिती तशी असेल तर बदला. ग्रह बदला, कुंडली बदला...पण इथली परिस्थिती बदलली पाहिजे ...पाहिजे तर भविष्य बदला...

दिगंबर : भविष्य बदलू?

गोविंद : हूं!

दिगंबर : काय हो गोविंदराव, आमच्या म्हणण्याप्रमाणे स्थिती बदलायला ग्रह काय नोकर आहेत तुमच्या बापाचे... ( गोविंदराव रागाने पाहतात ) किंवा आमच्या बापाचे?

गोविंद : ( हसत ) असे तापू नका. मला काय म्हणायचं आहे, की ग्रहस्थिती वाईट असेल तर शांती वगैरे काय, कशी करायची ते सांगा...

दिगंबर : हां...हां...हे बरोबर... असे सरळ बोला. तुमची आमची वाकडी चाल...बुद्धिबळातल्या उंटासारखी... ( पिशवीतील पंचांग काढतात. )

गोविंद : नशीब, सर्कशीतला उंट नाही म्हटलंत...

दिगंबर : तो उंट वाकडा दिसला तरी सरळ चालतो. खरा धोका असतो तो सरळ दिसणाऱ्या पण वाकड्या चालीच्या उंटाकडून...समजलं?

उमा : ( प्रवेश करीत ) अगदी बरोबर– काय काका, समजलं की नाही?

गोविंद : समजलं– या सूनबाई! ही थोरल्याची बायको... बी. ए. झालेय पण गर्व म्हणून नाही. साक्षात देवता आहे ह्या घरची. हे दिगंबरपंत... तुम्हांला म्हटलं होतं ना, एक चांगले ज्योतिषी आहेत म्हणून, ते हेच...

उमा : नमस्ते... बसाना! (बसत) पाहिलीत आमच्या जयेशची कुंडली...

दिगंबर : पाहिली ? (हसतात) अहो, पाठसुद्धा झाली माझी. एका पाहण्यात कुंडली पाठ होत नाही . त्यानं पुन्हा कुंडली पाहण्यात अर्थ नाही. अहो, तिनतिनदा कुंडली बघतो तो ज्योतिष काय सांगणार, कप्पाळ ? (गोविंदरावास–) पाहू कुंडली...

गोविंद : (कुंडली देत) ते सगळं खरं... पण लवकर सांगा काय सांगायचं ते. सूनबाई, साहेब कुठं आहेत ?

उमा : साहेब बाहेर गेलेत सकाळीच...

दिगंबर : गोविंदराव, लवकर आटपायला ज्योतिष म्हणजे पूजा नाही सत्यनारायणाची... समजले ?

गोविंद : मला इतकंच वाटतं, साहेब आत यायच्या आत तुम्ही आटपलेत तर बरं... नाही तर कायमचे आटपाल.

दिगंबर : तर मग ऐका... आज सकाळी चांगले दोन तास अभ्यास केला या कुंडलीचा... एका कुंडलीवरून बारा कुंडल्या मांडाव्या लागल्या...

गोविंद : अहो, फक्त निकाल सांगा. तो कसा लावलात ते नाही सांगितलंत तरी चालेल...

[ त्याच्या कानात " साहेब यायच्या आत " असं पुटपुटतो. तोही ' हो हो ' म्हणतो. ]

दिगंबर : तुमच्या या छोट्या दिरांना हे वर्ष फार म्हणजे फारच वाईट जाणार आहे...

उमा : (काळजीच्या स्वरात) वाईट जाणार आहे ? काय म्हणता ?

उमेश : (साहेबांचा थोरला पुत्र... खेळण्याच्या पोशाखात प्रवेश करतो. हातात रॅकेट) अशक्य... हे वर्ष आम्हांलाच वाईट जाणार आहे.

गोविंद : (ओळख करून देत) हे थोरले चिरंजीव... इंजीनिअर आहेत... स्वतंत्र धंदा करतात.

दिगंबर : म्हणजे साहेबांना पुत्र दोन...

उमेश : होय... आणि कन्या नाही. म्हणून सूनबाईंना फार भाव आहे इथं— मी थोरला पुत्र. धाकट्याची कुंडली तुमच्या हातात आहेच. आणि त्याला

कोणतंही वर्ष... वाईट जाणं शक्य नाही.. हे त्याची कुंडली न पाहता अनुभवानं सांगू शकतो मी. आजपर्यंत त्याच्यामुळे आमचंच प्रत्येक वर्ष वाईट जातंय... त्याचे चाळे चालूच आहेत.

दिगंबर : म्हणजे काय करतात ते...?

उमेश : काय करीत नाहीत ते विचारा. वाईट संगत...जुगार, रेस, सट्टा, मटका यातील काहीही वर्ज्य नाही त्यांना. आरामात खातात आणि गावात उंडारतात. ते काय तुमचं ' उद्धरेदात्मनात्मानं ' की काय आहे ना, त्याच्यावर त्यांचा फार विश्वास. स्वतःचा उद्धार स्वतःच करताहेत.

उमा : अहो. पण—

दिगंबर : शिक्षण किती झालंय...?

उमेश : दोन वेळा इंटर कॉमर्स नापास. आता पुन्हा परीक्षेला बसणार नसल्यामुळे नापास होण्याची हॅट्रिक मारता येणार नाही त्यांना...

उमा : अहो, जरा गप्प बसा बघू. लोकांच्या देखत आपल्या माणसांची किती निंदा कराल ?

उमेश : अग पण हे ज्योतिषी आहेत... त्यांना हे सगळं न सांगताच समजलं असेल...काय हो ज्योतिषीबुवा, खरं की नाही ? (हसतो.)

दिगंबर : नाही...पण या वर्षी त्यांना जरा जपायलाच हवं...

उमेश : (नमस्कार करीत) अहो, सहा महिनेसुद्धा झाले नाहीत आमच्या लग्नाला ! सहा महिन्यांत हिनं त्याला इतका लाडावून ठेवलाय...त्यात तुम्ही या वर्षी त्याला जपायला सांगा. म्हणजे आम्हांला आज वेळेवर चार घास मिळताहेत, तेही मिळणार नाहीत यापुढं. म्हणून म्हटलं ना... हे वर्ष आम्हांलाच वाईट दिसतंय...

उमा : (त्याला दटावीत) आता तुम्ही गप्प बसणार आहात, की असेच बडबडत राहणार आहात ?

उमेश : अरे वा, सरळ दमबाजी...(हसत) बरं मला सांग, आंघोळीची तयारी केलीयस ?

उमा : हो, सगळी तयारी आहे... (तो जाऊ लागतो...तो जिन्यावर असतानाच) तेव्हढा गीझर सुरू करा आणि कपाटातील टॉवेल घ्या...

उमेश : गीझर सुरू करा...कपाटातील टॉवेल घ्या...म्हणजे आंघोळीची तयारी

आहे ती काय ? मी तयार आहे ही ?

उमा : ( खोट्या रागाने ) प्लीज !

उमेश : ओ. के... ओ. के....

( 'जय गंगे भागीरथी' म्हणत जातो. )

दिगंबर : यांचा स्वभाव विनोदी दिसतो. काय गोविंदराव... 'तयारी' शब्दावर काय कोटी केली. तुमच्या लक्षात नाही आली..

गोविंद : दिगंबरपंत...साहेब यायच्या आत भविष्यकथन पुरं करा, नाही तर तुमचं भविष्य धोक्यात येईल !

दिगंबर : तर मग ऐका. वैनीसाहेब, यांचा गुरू उच्चीचा आहे आणि मंगळ प्रखर, म्हणजे मनुष्य बुद्धिमान पण फार रागीट...अगदी दुसरा जमदग्नी... बरोबर आहे ? असलं तर हो म्हणा...नसलं तर नाही म्हणा.

उमा : हो...हो...अगदी बरोबर !

दिगंबर : ( खूष होऊन ) अहो, भविष्यात लिहिलंय ते वाचतोय...शिवाय मंगळाची पितृस्थानावर वक्रदृष्टी. यांचं वडिलांशी अजिबात पटत ना ऽ ऽही...

गोविंद : ( चेकाळून ) द्या टाळी...( उमा रागाने पाहते. )

दिगंबर : वडिलांकडून यांना व यांचेकडून वडलांना फार त्रास झाला विशेषतः यांचे बालपण म्हणजे वय सुमारे १३ ते २० ही ७ वर्षे यांना फार कष्टाची गेली.

उमा : किती नेमकं सांगताहात तुम्ही...

दिगंबर : ( पाहात ) या वर्षी यांचा गुरू अगदी टॉपला आहे. त्याला बुध-चंद्र युतीचा फायदा मिळतोय...वहिनीसाहेब, या वर्षी हे पोरगं काहीं तरी देदीप्यमान यश मिळवणार.

उमा : तुमच्या तोंडात साखर पडो. अहो, हीच एक काळजी आहे मला. बाकी दृष्ट लागण्याइतकं सुख आहे मला इथं.

गोविंद : काय हो दिगंबरपंत, यात तुम्ही म्हणालात तशा पंचायती कसल्या आल्यात...मला तर सगळं उत्तम दिसतंय...

दिगंबर : तुम्हांला सगळं उत्तम दिसतंय...पण मला दिसत नाही ना ?

उमा : का...काही वाईट घडणार आहे काय ?

दिगंबर : त्याचं काय आहे वहिनीसाहेब, शनी आणि केतू फार नीचीचे आहेत. तेही या वर्षी यांना वक्री ! वक्री शनी, केतू ..प्रखर मंगळ, राहूसुद्धा नीचीचा

…म्हणजे जिवावरचा प्रसंग…काय चेष्टा आहे? (गंभीरपणे) या वर्षी फार जपा त्यांना…

उमा : काही वाईट घडणार आहे काय.. स्पष्ट सांगा.

दिगंबर : प्रसंग जिवावरचे येतील…पण घाबरायचं कारण नाही. गुरू निभावून नेईल त्यातून.

उमा : कसले प्रसंग येतील?

दिगंबर (थोड्या वेळाने) प्रसंग म्हणजे…मोठं आजारीपण, भयानक अपघात, भयंकर बदनामी…असले प्रकार. आता हेच पाहा ना…खरं म्हणजे यांचा शुक्र चांगला आहे…अगदी पॉवरफुल! पण या वर्षी यांना आहे शुक्राची पीडा! म्हणजे झाला घोटाळा…अशा वेळी स्त्रीविषयक आळ, अपवाद वगैरे येण्याचा संभव असतो.

उमा : हां…हां.. दिगंबरपंत, या बाबतीत आमचा जयेश अगदी चोख हं! अहो, म्हणजे कुठल्याही पोरीची रस्त्यात कुणीही टिंगल केली, तरी हा त्याला वेलाशक बडवतो. त्या बाबतीत तो कोणाचं ऐकणार नाही. काय काका, खरं की नाही?

गोविंद : हो, आता तुम्ही म्हणताय म्हणजे खरंच असणार ते!

दिगंबर : गोविंदराव, तसे असेल तर उत्तमच. पण आळ खोटेसुद्धा येऊ शकतात …नव्हे मी म्हणतो पुष्कळदा ते खोटेच असतात. अहो, एवढा मोठा द्वारकाधीश श्रीकृष्ण…पण त्याच्यावर सुद्धा चोरीचा आळ आलाच ना?

उमा : पण यावर काही उपाय?

[आत साहेबांचा आवाज ऐकू येतो. 'राघू–राघू, कुठं आहे तो बदमाष' गोविंदराव दिगंबरपंतांना घाईघाईनं जयेशच्या खोलीत ढकलतात.]

साहेब : (प्रवेश करीत) लेकाला हंटरनं बडवून काढतो…राघू, राघू…कुठं नाहीसा झालाय?

[साहेबांचा वेष : सूट, हातात चांदीच्या मुठीची काठी, हॅट, रुबाबदार व्यक्तिमत्त्व, प्रत्येक हालचालीत आत्मविश्वास ओतप्रोत भरलेला.. भेदक डोळे. वय झालं तरी कणा ताठ.]

उमा : बाहेर पाठवलाय मी त्याला...

साहेब : येऊ दे...आज त्याची कणीक तिंबवतो...ब्लडी रास्कल...लाख वेळा सांगितलं, की माझ्या कोटाच्या खिशात तंबाखूचे पॅक ठेवीत जा म्हणून... पाईप ठेवतो आणि तंबाखू विसरतो. आता पाइपात घालून ओढणार काय मी...याचा बाप ?

उमा : पण एवढं भडकता काय साहेब ? डॉक्टरनी सांगितलंय ना, ओरडू नका म्हणून !...

साहेब : अग, पण तू बघ आता...सकाळी किती सात वाजता बाहेर पडलो मी... राईट ? आता दहा वाजलेत. फॉर थ्री बिग अवर्स नो स्मोक ! प्राण कंठाशी आले...

[ उमा झटकन टेबलाच्या खणातील तंबाखूची डबी काढून देते. साहेब आधाशासारखा पाईप भरतात व मोठा झुरका सोडतात. ]

उमा : ( साहेब पाईप भरीत असताना ) राघूनं ठेवली होती ही डबी कोटाच्या खिशात. पण मीच काढून ठेवली. त्या बिचाऱ्यावर कशाला रागवता, साहेब.

साहेब : ( धूर सोडीत ) तू काढून ठेवलीस—आय सी. पण का ?

उमा : कारण बाहेर पडलात की तुम्ही सारखं स्मोकिंग करता—

साहेब : अरे वा ! म्हणजे घरात धूम्रपान चालतं...बाहेर नाही.

उमा : हो. कारण, बाहेर मग तासतास धूम्रपान चालूच राहतं तुमचं...

साहेब : तुला कसं कळलं हे...की बाहेरही पहारा ठेवलाहेस माझ्यावर ?

[ उमा हसत गोविंदरावांकडे पाहते. साहेब संशयाने गोविंदाकडे पाहतात. ]

गोविंद : ( हात जोडीत ) साहेब, सूनबाईंनीच मला विचारलं, की साहेब बाहेर जास्त आरडाओरड करतात की जास्त धूम्रपान करतात ? आता सूनबाईजवळ खोटं कसं बोलायचं...सगळं ? तेव्हा पन्नास टक्के खरं सांगितलं...जे त्यांना माहीत होतं ते. म्हटलं भडकतात कमी, पण धूर सोडतात जास्त.

साहेब : आय सी. असं आहे काय ? म्हणजे आमच्याच घरात आम्हांलाच नजरकैद झालेली दिसतेय ! ( हसत उमाकडे पाहतात. )

उमा : साहेब, काही तरीच काय ? नजर कैद कसली ? पण डॉक्टरनीच सांगितलंय ना, की धूम्रपान कमी करा म्हणून...

साहेब : डॅम दीज डॉक्टर्स ! अग, हे डॉक्टर्स स्वत: सगळे शौक करतात, पण त्यांच्या हातात एखादा आमच्यासारखा विशेष सुखवस्तू पेशंट सापडला, की रोगाचं निदान होण्यापूर्वीच त्याचं खाणं बंद, पिणं बंद, धूम्रपान बंद— हे बंद, ते बंद, असले काही तरी करतात. जाऊ दे...( धूर सोडीत ) जळतात लेकाचे आमच्यावर ! वैऱ्यासारखा सूड उगवतात आमच्यावर...

उमा : ( हसत ) डॉक्टर तुमच्यावर जळतात ? म्हणून धूम्रपान बंद करा म्हणतात ? करू का डॉक्टर वर्तकांना फोन आणि सांगू तुमचे हे विचार ?

साहेब : ( हसत ) ओह, नो—नो, दॅट वॉज अ जोक ! बट यू आर राईट ! आय मस्ट नॉट स्मोक !

उमा : साहेब...डॉक्टर रोगाचा वैरी असतो, रोग्याचा नाही ! रोग्याचा मित्रच असतो ना तो ?

साहेब : खरं आहे तुझं म्हणणं उमा ! अग पण, माणसाला एकदा व्यसनं जडली की मित्र वैरी वाटू लागतात आणि वैरी मित्र वाटू लागतात, त्याला कोण काय करणार ? मला धूम्रपान सोडलं पाहिजे हे खरं आहे. पण माणसाला एकदा व्यसनं जडली की जडली...कायमची... ( कुंडलीकडे लक्ष जाते ) ज्योतिषी येऊन गेले वाटतं ? कितवे ?

उमा : पाचवे आणि शेवटचे.

गोविंद : साहेब, यांनी अगदी नेमक्या गोष्टी सांगितल्यात.

साहेब : मूर्ख आहात. अहो, भविष्यातील गोष्ट वर्तमानकाळात तुम्हांला नेमक्या कळू देण्याइतका परमेश्वर मूर्ख आहे असं वाटतं का तुम्हांला ?

उमा : म्हणजे ज्योतिषशास्त्र साफ चूक असं म्हणायचं आहे का तुम्हांला ? ( साहेब रागाने पाहतात ) नाही...नाही...म्हणा हवं तर...

साहेब : ज्योतिषशास्त्र म्हणजे काय ते सांगू का तुला ? आयुष्याच्या धकाधकीतून पळून जाण्याची ती एक सोयीस्कर पळवाट आहे. अरे, त्या विश्वनियंत्याच्या हालचालींचा वेध घेण्याचा प्रयत्न करणं हाच मोठा वेडेपणा आहे ! त्यातून तुम्ही लोक भविष्य जाणून घेऊन थांबत नाही, तर ते टाळण्याचे उपाय शोधता. उपास करता. शांती करता ग्रहांची ! विधिलिखित टाळणं जर अशा

रीतीनं माणसाला शक्य असतं, तर प्रभू रामचंद्रांच्या नशिबी वनवास का आला असता ? आणि कुरुक्षेत्रावरचा सर्वनाश भगवान श्रीकृष्णाला नसता का टाळता आला ?

गोविंद : पण साहेब, इतके लोक ज्योतिष पाहतात– ते त्यांना तसा काही अनुभव आल्याशिवाय ?

साहेब : तुमचा ज्योतिषावर विश्वास आहे. तुमच्या वर्तमानकाळातील किती घटना तुम्हांला भूतकाळात माहीत झाल्या होत्या ? सांगा. गोविंदराव, जगात यशस्वी माणसांपेक्षा अपयशी माणसांची संख्या जास्त आहे. या अपयशी माणसांनी वर्तमानकाळातील अडचणींना, संकटांना तोंड देण्याची हिंमत धरावी, भविष्याच्या आशेनं त्यांनी वर्तमानकाळात जिद्दीनं लढावं, म्हणून कुठल्या तरी बुद्धिवान समाजधुरीणानं या ज्योतिषशास्त्राची निर्मिती केली असावी असं माझं स्पष्ट मत आहे ! मनुष्याच्या भूतकाळाचा आणि वर्तमान-काळाचा भविष्यकाळ हा संयुक्तिक परिणाम असतो, वर्तमानकाळातील मनुष्य भविष्यकाळात एकदम बदलत नाही.

गोविंद : पण मग साहेब, वाल्या कोळ्याचा वाल्मिकी ऋषी कसा हो झाला ?

साहेब : कारण त्याला नारद भेटला. नारदानं त्याची कुंडली मांडून भविष्य नाही सांगितलं. त्यानं त्याला जीवन जगण्याचा नवा दृष्टिकोन दिला. असा दृष्टिकोन लाभला की मगच मनुष्य बदलतो. माणसाच्या वर्तनात क्रांती घडून येण्यापूर्वी ती त्याच्या मनात घडावी लागते– मग मनाचा माग घेत घेत आचरण आपोआप बदलतं ! जाऊन द्या. माझ्या बोलण्यानं तुमच्यातल्या गोविंदरावाचं समाधान होणार नाही. उमा, मला तुझं नवल वाटतं. अग, बी. ए. झालेली तू आणि कुंडल्या दाखवतेस ? काय ग, परीक्षेला मुहूर्त बघून बसलीस काय ? ( हसतात. )

उमा : साहेब, माझी नाही– जयेशची कुंडली दाखवतेय.

साहेब : जयेशची कुंडली ? ती ज्योतिष्याला कशाला दाखवतेस ? हं ! त्याची कुंडली पोलिस स्टेशनवर मांडलेली आहे– तिकडूनच आलो आता ( थोड्या वेळाने ) हा केतू जन्माला आला, तेव्हा त्यानं पहिला बळी घेतला त्याच्या आईचा– आता दुसरा बळी घेतोय माझा. या घराण्याच्या अब्रूचा ? त्याची कुंडली दाखवून का आमची सुटका होणार आहे ? यातून सुटका होण्याचा

मार्ग एकच ! एक तर आम्ही तरी जीव द्यायचा, नाही तर त्यानं तरी काळं करायचं या घरातून कायमचं...

उमा : पण साहेब, त्यांना सुधारायला थोडी संधी द्या मला...

साहेब : ( राग गिळून ) सुधारण्यापलीकडे गेलाय तो ( दूरवर पाहात ) पाणी फार गढूळ झालंय आता.

उमा : पण साहेब— गढूळ पाणी कधीच निवळत नाही काय ?

साहेब : निवळतं ना...पण त्याला गंगेची संगत लाभली तर ! ते जर गटाराच्या संगतीनं वाहू लागलं, तर त्याचंही अखेरीस गटारच होतं.

उमा : मी त्यांना माझी संगत देणार आहे, साहेब.

साहेब : तुझी संगत देणार आहेस...काय डोकं फिरलंय काय तुझं ? ( खिन्नपणे हसून ) अग, दुधाच्या संगतीने मिठाचा खडा कधी गोड झालाय का ? आळवाच्या पानावरचा पाण्याचा थेंबसुद्धा मोत्यासारखा चमकतो. पण संगत सुटताच तो मातीत मिसळतो. अग, ज्याच्यात सद्गुणांचा अंश नाही, त्याला सद्गुणांचं आकर्षण तू कसं वाटायला लावणार ? आंधळ्याला प्रकाशाचं मोल तू कसं समजावून देणार ? सूर्यप्रकाशात चमकायला हिरा, हिरा असावा लागतो; मातीचं ढेकूळ कसं चमकणार ?

उमा : साहेब, अगदी हिरा असलेल्या हिऱ्यालासुद्धा प्रकाशात चमकायला पैलू पाडावे लागतातच ना ?

साहेब : अग, पण जयेशची जात हिऱ्याची नाही. त्याच्यातील एका तरी सद्गुणाचं नाव सांग मला— सांगतेस ? ( उमा गप्प राहते ) तोच उमेश बघ; लाथ मारील तिथं पाणी काढील अशी धमक आहे त्याच्या अंगात. ( क्षणभरानं ) जयेशला वळणीवर आणावयाचा मार्ग एकच— उठता बसता त्याला बडवायला हवा हंटरनं.

उमा : तो मार्ग जुना झाला, साहेब. आता जरा नवीन मार्गानं प्रयत्न करायला काय हरकत आहे ?

साहेब : कर. खुशाल प्रयत्न कर. कुठल्याही मार्गानं कर. पण शेवटी जेव्हा माझ्यासारखं घोर अपयश पदरात पडेल, तेव्हा ते पचवण्याची ताकदसुद्धा उरात जपून ठेव. त्या क्षणी कोसळू नकोस, ढासळू नकोस.

उमा : साहेब, काहीही असलं तरी जयेश जिद्दी आहेत, जिद्दी माणसंच

आयुष्यात काही तरी बनतात, काही तरी कमावतात.

साहेब : पण जेव्हा ती वाइटाच्या संगतीत वाढतात तेव्हा सर्वस्व गमावतात. अग, जमिनीत पुरलेलं सोनंसुद्धा माती खाऊन टाकतं म्हणतात. तिथं दुर्गुणांनी घेरलेल्या माणसांची काय कथा ? तू त्याला संधी द्या म्हणतेस, पण स्वतःचे दुर्गुण तो इतक्या मस्तीनं मिरवीत असतो, की त्याला संधी देणारी माणसं शेवटी तोंडघशी पडतात.

उमा : साहेब, मी त्यांना संधी द्या म्हणत नाही. मला थोडी संधी द्या म्हणतेय ...त्यांना घडवायला. ( मंद हसत ) साहेब, तुम्हीच तर नेहमी म्हणता, की माणसं घडवावी तशी घडतात... घडवणारा भेटला नाही तर...

साहेब : बिघडतात. ( हसतात ) माझंच वाक्य मलाच ऐकवतेस काय ?

उमा : तसं नाही– पण–

साहेब : ( हसत ) ठीक आहे– दिली आम्ही तुला संधी. आजपासून त्याच्या बाबतीत आम्ही पडणार नाही...जयेशबाबत आम्ही एका अक्षरानं बोलणार नाही...पण त्याच्या प्रत्येक हरकतीला जबाबदार तू.. ठीक आहे ? ( जाऊ लागतात—मधेच थांबून ) आणि हे बघ, या सेफच्या चाव्या तुझ्याकडेच ठेव आजपासून. पण त्या जयेशच्या हाती लागणार नाहीत याची खबरदारी घे...

उमा : विश्वासानं विश्वास वाढतो ना साहेब– तुम्ही तर नेहमी म्हणता—

साहेब : ( हसत ) होय...होय ..मी म्हणतो आऽऽऽ ( मोठ्याने हसतात ) ठीक आहे– ठीक आहे. आम्हांला मंजूर आहे तुझी जिद्द—आणि लाववी–पणाही. ( बाहेर जाऊ लागतात. )

उमा : हे काय साहेब, आता कुठं निघालात ?

साहेब : अग, दादा मोहित्यांचा तातडीचा निरोप आला, की भेटून जा . जरा जाऊन येतो.

उमा : पण काम संपल्यावर लगेच या– जेवायला उशीर करू नका. आपल्या तब्येतीला मानवत नाही ते.

साहेब : हो. ( जातात. )

दिगंबरपंत : ( दबकत दबकत ) गोविंदराव... साहेब गेले ?

उमा : हो, हो, गेले...या, घाबरू नका.

गोविंद : मग काय दिगंबरपंत, अधिक काही सांगायचं आहे काय ?

दिगंबर : अधिक काही नाही. (वहिनीस) तेवढ्या एकदोन गोष्टींची काळजी घ्या वहिनीसाहेब...

गोविंद : म्हणजे आजारीपण किंवा मोठा अपघात- याच ना?

दिगंबर : हो- आणि सर्वांत महत्त्वाचा म्हणजे तो स्त्रीविषयक आळ-आरोप.

उमा : ती गोष्ट मला शक्य नाही वाटत! कारण स्त्रियांच्या बाबतीत जयेश म्हणजे अगदी लाजाळूचं झाड आहेत. माझंच पाहा ना! सहा महिने झाले आमच्या लग्नाला...पण अलीकडे २-३ महिनेच ते माझ्याशी मोकळेपणानं बोलू लागले आहेत. नाहीतर त्यापूर्वी मला पाहिलं, की स्वारी छूः व्हायची!

दिगंबर : तसं असेल तर चांगलंच...पण वाईट संगतीमुळे निष्कारण आळ येतात माणसावर. हां- तसं घाबरण्याचं कारण नाही. अहो, फूल मातीत पडलं, तर त्यालासुद्धा मातीचा वास लागतो थोडासा; पण म्हणून काही फुलाचा मूळचा गंध नाहीसा होत नाही.

उमा : मग काही ग्रहांची शांती वगैरे करायला हवी काय? हवी असेल तर तीही करा—लागेल तो खर्च करीन मी.

दिगंबर : शांती करायला हवी- ती मी करीन. तुम्हांला काही उपास नेमून देईन तेवढे करा. सगळं काही ठीक होईल. मी येऊ आता...?

उमा : या...

दिगंबर : येतो. ही कुंडली.

उमा : अहो काका, ते तसेच चाललेत...त्यांना पन्नास रुपये द्या. ही तुमची आत्ताची दक्षिणा.. पण जरा लवकर काम सुरू करा.

दिगंबर : हो- एवढी अमावास्या टळली, की ताबडतोब सुरू करू काम. बरंय, नमस्ते.

[ गोविंदराव त्यांना पोहोचवून येतात. ]

गोविंद : मग काय सूनबाई, कशी काय जपणूक करणार दिराची? म्हणजे या रोपाची निगरण कशी काय करणार?

उमा : काका, काही काही रोपं फार नाजूक असतात. त्यांना खतपाणी घालतानासुद्धा फार काळजी घ्यावी लागते. पाणी थोडं जास्त झालं तर मुळं कुजतात, थोडं कमी झालं तर रोपं सुकतात.

गोविंद : हो-हो, मीसुद्धा ऐकलंय खरं असं—काही बिनबियांच्या झाडांविषयी.

उमा : नाही काका, हे झाड बिनबियांचं नाही. या कुटुंबाच्या वृक्षाचंच बी त्याच्या मुळात आहे. पण वेळच्या वेळी सहानुभूतीचा प्रकाश, मायेचा ओलावा न मिळाल्यामुळे ते खुरटलंय– त्याची वाढ मंदावतेय !

गोविंद : पण सूनबाई, या झाडाची निगरण करताना थोडी काळजी घ्या. कारण झाड काटेरी आहे. तुमचा काहीच अपराध नसताना चार ओरखडे उठायचे हातावर, आणि हात विनाकारण रक्तबंबाळ व्हायचा एखादे वेळी तुमचा !

उमा : मग काय करायचं, झाला तर—? आपल्या माणसाच्या सद्‌गुणावर, यशावर तेवढा हक्क सांगायचा आणि त्यांच्या दुर्गुणाकडे पाहून नाकं मुरडायची ? अहो, झाडाची फुलं जर आपली तर त्याचे काटेही आपलेच !

[ आत जयेशचा आवाज ऐकू येतो. 'त्याला सांग संध्याकाळच्या आत हिशेब चुकता कर, नाही तर तिथं दात पाडीन म्हणावं'... ]

गोविंद : घ्या—हे आलंच तुमचं झाड बोंबलत !

[ जयेश प्रवेश करतो–बाहेरून. वय २१।२२. तंग पँट. रंगीत चौकड्यांचा शर्ट. केसांची झुलपं उडविण्याची सवय. त्याच्या मागोमाग गुलाबाची फांदी घेऊन सुषमा प्रवेश करते– तिचं वय १८ । १९.]

सुषमा : कशाला भांडतोस सगळ्यांजवळ ?

जयेश : अग, यांचे दात पाडले म्हणजे सरळ असतात हे—

सुषमा : मला आवडत नाही तुझा भांडखोरपणा—

जयेश : पण मी तुझ्याशी भांडतोय का ? आयला— काय कटकट आहे बघ हिची वहिनी !

उमा : काय म्हटलंत ?

जयेश : काय म्हटलं...हां...हां...ते आयला म्हटलं ते— अग पण, तूच सांग— जन्माच्या सवयी एकदम कशा जाणार ?

उमा : गेल्या पाहिजेत—वाईट आहेत ना त्या ?

सुषमा : वहिनी, हा बघा इंग्लिश गुलाब. मुद्दाम तुमच्यासाठी जयेशनं आणायला सांगितली ही फांदी कट करून— हो ना रे ?

जयेश : हो ना, आणि बरं का वहिनी, तिला तिच्याच हातानं लावायची आहे ती बागेत. मी लावली आणि रुजली नाही, तर तिची फांदी उगाचच फुकट जायची !

[ तो, उमा हसतात. सुषमा त्याच फांदीने त्याला मारते. तो ' अग, अग ' म्हणतो. ]

गोविंद : ( खाकरून ) काय रे, आत्ता दात कुणाचे पाडायला निघाला होतास ?—हिचेच काय ?

जयेश : नाही—तुमचे ! ( वहिनीकडे पाहून चमकून ) सॉरी—सॉरी ! काकोबा, आय् ॲम् एकदम सॉरी ! नाही म्हणजे वहिनी, एकदम थोबाडातून निघून गेलं बघ !

उमा : कशातून ?

जयेश : थोब्—नाही—तोंडातून !

गोविंद : नाही—आमचे दात पाडल्यातच जमा आहेत. आत्ता बरोबर कोण होतं ?

जयेश : ही.

गोविंद : नाही— दुसरं कोण होतं ?

जयेश : हुसेन.

उमा : हुसेन ?

गोविंद : हु–से–न ! त्या पाववाल्याचा पोरगा.

जयेश : का ? काय झालं त्यात ?

गोविंद : नाही बुवा. तुझ्याबरोबर हुसेन असला, नाही तर एखादा याकूब असला, तरी आमचं काय होणार त्यात ?

जयेश : ( उसळून ) तुम्ही हे असं आडून पाडून बोलू नका. काय बोलायचं ते स्पष्ट बोला. ( सुषमाला ) तू काय माझं तोंड पाहात उभी राह्यलेस ? तुला झाड लावायचं आहे ना ? मग जा— लाव बागेत—

सुषमा : तू येतोस ना... ?

जयेश : आता मी कसा येणार ? यांनी मला इथंच खणायला सुरुवात केलीय हं. बोला—

सुषमा : कुठेसं लावू हे झाड ?

जयेश : ( चिडून ) लाव माझ्या डोक्यावर !
सुषमा : ( गमतीने ) पण तिथं रुजेल का ते ?
जयेश : आता लाफा खाशील--

[ सुमी त्याला जीभ काढून दाखवते व पळून बागेत जाते. ]

उमा : पण तुमच्याबरोबर कोण होतं विचारलं, तर त्यात एवढं चिडायला काय झालं ?

जयेश : पण बघ कसे विचारताहेत ? सरळ विचारायला काय झालं ?

गोविंद : ठीक आहे. आता सरळ विचारतो, या हुसेनबरोबर संबंध ठेवायचे नाहीत असं साहेबांनी सांगितलंय की नाही ?

जयेश : हो–सांगितलंय. पण तो माझा बालपणाचा मित्र आहे— मी त्याच्याशी संबंध ठेवणार—

गोविंद : पण मी म्हणतो, साहेबांच्या इच्छेविरुद्ध का ठेवायचे संबंध ?

जयेश : संबंध न ठेवायला साहेबांची इच्छा एवढं कारण सोडल्यास दुसरं काही कारण आहे ?

गोविंद : हो आहे—

जयेश : काय आहे ?

गोविंद : ते तुला माहीत आहे.

जयेश : स्पष्ट बोला.

गोविंद : सूनबाई, या हुसेनची आई अशीतशीच आहे.

जयेश : ( ओरडून ) अशीतशी म्हणजे कशी ?

उमा : जयेश ! काका ... अशीतशी म्हणजे कशी ?

गोविंद : सूनबाई, स्पष्ट सांगू ?

उमा : सांगा.

गोविंद : ती बाई धंदा करते.

जयेश : हे खोटं आहे.

गोविंद : हे खरं आहे.

जयेश : तुम्हांला नक्की माहीत आहे ?

गोविंद : हो ... हो ... शंभर टक्के माहीत आहे !

जयेश : ती धंदा करते हे शंभर टक्के तुम्हांला हो कसं माहीत ?

उमा : जयेश...

गोविंद : ( वैतागून ) नाही– मला काही माहीत नाही. ती अल्लाची बहीण आहे आणि तो तुझा हुसेन खुदाचा प्यारा आहे. मी जातो सूनबाई. या प्रश्नाला माझ्याकडे उत्तर नाही. उगीच आमच्यावर शिंतोडे नकोत उडायला. आम्ही गरीब माणसं. आमची अब्रू हेच आमचे धन. ती गेली की आम्ही संपलो. वड्यांचं सगळंच वडं. आम्ही पायरी विसरून मधे पडतो ,हा आमचा गाढवपणा. झक मारली नि तुला विचारलं. पुन्हा विचारणार नाही. ( जातो. )

जयेश : बघितलंस–हे असं आहे...

उमा : पण तुम्ही तरी सरळ का बोलत नाही ?

जयेश : वहिनी, सरळ काय बोलायचं यांच्याशी ? एखाद्या स्त्रीविषयी काही माहिती नसता बेधडक बोलायची यांना ताकद कशी होते ?

उमा : अहो— आपल्या माणसांना आपली काळजी वाटणारच.

जयेश : ही आपली माणसं ? मी त्यांच्याकडे जातो एवढी एकच गोष्ट ती तशी नाही हे सिद्ध करायला पुरेशी वाटायला हवी होती यांना.

उमा : गावात लोक बोलतात—

जयेश : ते हे ऐकतात आणि इथं बोलतात. वहिनी, ती बाई तशी असती, तर मी पाऊल टाकलं असतं का तिथं ? एवढासुद्धा यांचा माझ्यावर विश्वास नसावा ? आणि तू म्हणतेस ही आपली माणसं ? तू बोलशील का असं– इतक्या बिन-दिक्कतपणानं, मी तिथं जात असताना—

उमा : पण अशा संशयास्पद माणसांकडे का जाता तुम्ही ? हे बघा, आत्ताच एक ज्योतिषी तुमची कुंडली पाहून गेलेत. त्यांनी स्पष्टच सांगितलंय...

जयेश : काय सांगितलंय ?

उमा : की तुमच्यावर स्त्रीविषयक आळ येईल म्हणून...

जयेश : स्त्रीविषयक आळ...

उमा : अहो...खोटा...

जयेश : पण वहिनी, हुसेनची आई तशी नाही.

उमा : तुम्हांला काय ठाऊक ती तशी आहे की नाही ते ?

जयेश : ( भावनावेगाने ) मला काय ठाऊक ? मग कुणाला ठाऊक असणार ? गेली सात वर्षं तिनं माझ्यावर आपल्या पोराइतकीच माया केलीय. साहेबांनी घरी मला मर मर मारल्यानंतर कित्येक वेळा मी तिच्याच कुशीत शिरून ढसाढसा रडलोय ! वहिनी, वहिनी, या हातावरील चाबकाचे वळ तिनं आपल्या आसवांच्या पाण्यानं बुजवलेत. ती कशी आहे ते सगळ्यात जास्त मला ठाऊक आहे. लहानपणी काही तरी व्हायचंच. साहेब मला दोनदोन दिवस उपाशी ठेवायचे. त्या वेळी हुसेन मला आपल्या घरी घेऊन जायचा. त्याची आई मला आपल्या हातानं खाऊ घालायची– म्हणायची, हुसेन माझा बेटा तसा तू सुद्धा माझा बेटाच ! वहिनी, मला आई म्हणजे काय ते माहीत झालं हुसेनच्या आईमुळं. माझा जन्म झाला आणि आई वारली. तेव्हापासून साहेब मला मनातून त्यांचा वैरीच मानीत आले. वहिनी, तू येण्यापूर्वी कोण होतं माझं या घरात ? हे गोविंदराव, साहेब– या माणसांनी मला माणसांतून उठवलं होतं. मला माणसांत ठेवलं ते हुसेनच्या आईनं ! ( आवेग आवरून ) पुन्हा सांगतो... वहिनी, हुसेनची आई तशी नाही ग ! गेल्या वर्षी हुसेनचे वडील वारले आणि त्याच्या पावाच्या दुकानावर त्याची आई बसू लागली. दिसायला बरी आहे म्हणून गावाच्या नजरेत सलू लागली. लोकांच्या हाती काही लागेना म्हणून मग त्यांनी या अफवा उठवायला सुरुवात केली. आता काका जे बोलले ते त्यांच्या ऐवजी दुसरा कुणीही बोलला असता ना वहिनी, तर त्याचे दात घशात घालायला मी कमी केलं नसतं. तुला खरं सांगू वहिनी, हे काकोबा आहेत ना, ते पक्के हलकट आहेत !

उमा : जयेश, काय बोलता हे ? किती झालं तरी तुमचे काका आहेत ते... दूरचे असले तरी या घरचे झाले आहेत ते...

जयेश : होय. ते दूरचे असून घरचे आणि मी पोटचा असून परका.

उमा : उगाच त्रागा करू नका. तुम्हांला कुणीच परका म्हणत नाही. उलट तुम्हीच परक्यासारखं वागता– कुणाला विश्वासात घेत नाही. सगळ्यांबद्दल मनात तेढ बाळगता– विनाकारण.

जयेश : विनाकारण नाही– सकारण बाळगतो. हे गोविंदकाका स्वतः पैशांचा हिशेब कुणालाच कधी देत नाहीत, माझ्याकडून मात्र पैन्पैचा हिशेब ठोकून घेतात. एक पैसा इकडचा तिकडे झाला की साहेबांना सांगतात. आता गेल्या

आठवड्यात फर्निचरच्या पॉलिशसाठी तू त्यांना साडेतीनशे रुपये दिलेस... फर्निचरचं पॉलिश झालं, पण तुला हिशेब दिला त्यांनी? दाखवलं बिल एक तरी?

उमा : अहो, दाखवतील—

जयेश : हो- दाखवतील, वाट बघ.

उमा : जयेश, आपल्या सगळयांतच लहानसहान दोष असतात. मला एवढंच म्हणायचं होतं, की ज्या घरात वडील माणसांचा उपमर्द होतो त्या घराचं घरपण फार दिवस टिकत नाही.

जयेश : पण साहेबांना यांचे दोष दिसत नाहीत... माझे तेवढे दिसतात.

उमा : होय ..त्याचं कारण तुम्ही घरचे आहात. ते बाहेरचे आहेत. त्यांच्यामुळे फार तर थोडं फार नुकसान होतं, पण तुमच्यामुळे बदनामी होते साहेबांची!

जयेश : बदनामी ... बदनामी...यांची बदनामी आणि यांचा सन्मान. यांचीच काळजी करीत जगायचं का आम्ही जन्मभर? यांची नुसती बदनामी झाली त्याला मी जबाबदार. पण माझी आजवर ससेहोलपट झाली, आयुष्याची दैना उडाली त्याला जबाबदार कोण? त्यांच्या बदनामीचं दुःख होतं त्यांना. माझ्या आयुष्याची वाट लागते आहे त्याचं त्यांना काहीच वाटत नाही.

उमा : चुकता आहात तुम्ही जयेश. आज साहेबांजवळ काय नाही? पैसा आहे, मान आहे, कीर्ती आहे—सगळं काही आहे. पण रात्र-रात्र झोपत नाहीत ते. तुमच्याशिवाय दुसरी कसली काळजी वाटत असेल त्यांना? पहाडासारखा पोलादी पुरुष, पण तुमच्या चिंतेनं पोखरून निघालाय आतून!

जयेश : खरं असेलही तुझं म्हणणं कदाचित! पण अगदी लहानपणापासून त्यांना माझे फक्त दोष दिसलेत. अपराध दिसलेयत! आणि तेव्हापासून प्रत्येक अपराधासाठी त्यांनी हंटरनं बडवलंय मला- कधी एखाद्या अपराधाबद्दल क्षमा नाही केली.

उमा : तो त्यांचा स्वभाव आहे.

जयेश : होय- फक्त माझ्यापुरता! उमेशभैयाच्या सगळ्या चुका ते आईच्या मायेनं पोटात घालतात. माझ्या मात्र नाही. तो त्यांचा मुलगा- मी मात्र वैरी! का हा पक्षपात...का? तुला माहीत नाही कारण, पण मला माहीत आहे! मी जन्मलो आणि माझी आई वारली- हा माझा अपराध ठरला. साहेबांचं

पत्नीसुख मी हिरावून घेतलं--

उमा : ( ओरडून ) जयेश- शरम नाही वाटत आपल्या जन्मदात्याबद्दल असं बोलायला ?

जयेश : ( शांतपणे ) वाटते- फार शरम वाटते ! त्यांचा मुलगा झाल्याबद्दल शरम वाटते, भैय्याचा भाऊ म्हणवून घ्यायला लाज वाटते. पण वहिनी, सत्य सांगायला लाज नाही वाटत, शरम नाही वाटत. मी सांगितलं ते सत्य आहे. आणि तेच सत्य आहे !

उमा : ( डोळ्यांत पाणी आणून ) नका जयेश, नका ऐकवू ते भयानक सत्य मला. मला अज्ञानात राहू दे जयेश- मला अज्ञानात राहू दे !

[ सुषमा ओंजळीत फुले घेऊन प्रवेश करते. ]

सुषमा : जयेश, ही बघ किती फुलं गोळा केलीत मी. हे काय वहिनी- रडता आहात तुम्ही ?

जयेश : होय सुमा, वहिनी रडते आहे. माझ्यावर प्रेम करते ना ती. माझ्यावर प्रेम करणाऱ्या माणसाला रडावंच लागतं. माझ्यावर प्रेम करणं सोपं नाही. माणसानं विचार करावा माझ्यावर प्रेम करण्यापूर्वी !

सुषमा : जयेश, काय झालं ?

जयेश : फुलं आणलीस ना- वहिनीला दे. तिला आवडतात.

सुषमा : वहिनी, घ्याना ही फुलं. किती सुंदर आहेत बघा, आणि वास तरी किती छान आहे, घ्याना.

उमा : सुमा, या बागेतील सगळी फुलं सुंदर आहेत, त्यांचा वासही छान आहे, पण एकमेकांचा सुगंध या फुलांना जाणवत नाही- तो एकमेकांपर्यंत पोहोचत नाही. हेच या बागेचं दुर्दैव आहे ग... हेच या बागेचं दुर्दैव आहे !

[ अश्रुपूर्ण डोळ्यांनी ओंजळीत फुले घेते- डोळे मिटून त्यांचा सुगंध घेते. रंगभूमीवर प्रकाश मावळतो...अंधार होतो. ]

## दृश्य दुसरे

[ साहेबांचा दिवाणखाना– काही दिवसांनंतरचा प्रसंग. उमेश ऑफिसला जाण्याच्या तयारीनं दिवाणखान्यात येतो. ]

उमेश : राघू, आज ऑफिसला डबा पाठवू नको रे (फोन येतो.) हॅलो! कोण बाफना शेठ ? येस्, मी उमेश सरनाईक. हो, तुमच्याकडेच निघालो होतो शेठजी. तुम्ही जे रंग पसत केले आहेत ते फार गॉडी दिसतील... कोण बायडी ? हां हां आपल्या सौभाग्यवती. अहो, पण त्यांना पेंटस्‌मधलं काय कळतंय ... शेटजी, एकच सांगतो. निसर्गसुद्धा रंगाची इतकी उधळपट्टी करीत नसेल !.. कोण निसर्ग ? नाही शेटजी, माझं काही म्हणणं नाही.

उमा : (आतून) राघू...ए राघू अरे, सेफच्या चाव्या साहेबांच्या खोलीत-सुद्धा नाहीत रे ... (उमेश फोनजवळील चाव्या लपवतो. उमा प्रवेश करते.)

उमेश : हो ... हो...तुमच्याकडेच लक्ष आहे !

राघू : (आतून) स्वैपाकघरातसुद्धा शोधल्या . तिथं नाहीत त्या. आता कोठी-घरात शोधतो...

उमा : शोध, बाबा शोध ! (उमेशकडे बघून) हे काय? अजून गेला नाहीत तुम्ही ?

उमेश : हा काय निघालोच. (उमेश दरवाज्यापर्यंत जाऊन पुन्हा मागे फिरतो. कोचावर बसतो.) छे! आज घरातून पायच निघत नाही.

उमा : चला ..काही तरीच . पण ह्या चाव्या कुठं गेल्या ? (कमरेला चाचपते. इकडेतिकडे पाहात आठवण्याचा प्रयत्न करीत) चाव्या, कुठं गेल्या हो––हे नसतं संकट ओढवून घेतलंय माझ्यावर. पण गेल्या कुठं त्या ? (रडकुंडीला येत) अहो, माझी गंमत काय बघत बसला आहात? जरा शोधून द्या ना मला. त्या टेबलाच्या खणात आहेत का पाहा ना जरा.

[ उमेश शीळ घालीत गंमतीने इकडे तिकडे हिंडतो. ]

उमा : अहो, शिट्ट्या मारीत काय हिंडताय ?

उमेश : म्हणजे शिटी न मारता शोधू ? ठीक आहे––(मिस्किलपणे हसून)

पण मी म्हणतो, जर झेपत नसेल, तर घ्यावी कशाला नसती जबाबदारी अंगावर ?

उमा : ( टेबलाचा ड्रॉवर धुंडाळीत ) तुम्हांला जरा शोधा म्हटलं किल्ल्या, तर ते राहिलं बाजूला आणि वर उपदेशाचे डोस देता आहात. मेली नवऱ्यांची जातच अशी !

उमेश : ( तिच्या वाटेत उभा राहात ) हां--हां--नवऱ्यांची जातच मेलेय कुठे अजून– चांगली बायकांसकट जिवंत आहे !

उमा : उगाच शब्दावर कोट्या करीत नका बसू--( त्याला बाजूला ढकलीत ) स्वत: शोधू नका आणि मलाही शोधू देऊ नका. बायका रडकुंडीला आल्या की तुम्हा नवऱ्यांना आतून अगदी कशा उकळ्या फुटतात--त्याच जातीतले ना—

उमेश : ( हसत ) ए, बाकीच्या नवऱ्यांचं मला माहीत नाही– पण मी मात्र एक चांगला नवरा आहे की नाही ?

उमा : हो तर– म्हणे चांगला नवरा ! किल्ल्यासुद्धा शोधून नाही देत– काय उपयोग आहे तुमचा ?

उमेश : ए– म्हणजे माझा काहीच उपयोग नाही तुला ?

उमा : ( लाजून हसते ) हे बघा– चावटपणा नका करू. आधी या किल्ल्या बघा कुठे सापडतात का ते.

उमेश : जाऊ दे ग. हरवल्या तर हरवल्या. दुसऱ्या करून घेऊ.

उमा : अगबाई– त्या किल्ल्या सापडल्या नाहीत तर साहेब जीव घेतील माझा—

उमेश : शक्य नाही. मी लग्नाच्या दिवसापासून पाहतोय. तू साहेबांवर अशी काही जादू केली आहेस, की कुणावरही ते रागावले असले आणि त्यानं तुला पुढं केली की त्यांच्या रागाचा पारा सर्रकन खाली येतो...खरं की नाही ?

उमा : मला नाही माहीत– पण चाव्या गेल्या कुठं ? काय हो, आपल्या खोलीत तर नाही ना पडल्या ?

उमेश : हं ! सो चाव्या आर इम्पॉर्टंट ! समजा, तुला मी चाव्या शोधून दिल्या, तर तू मला काय देशील ?

उमा : चांगला नवरा म्हणेन.

उमेश : अंहं ! तेवढ्यानं नाही भागणार. ( जवळ जात ) चांगल्या नवऱ्यांना

चांगल्या बायका देतात ते— [ एकदम तिचा हात धरतो. ]

उमा : अहो- कुणी बघेल ना—

उमेश : ( हात न सोडता ) बघू दे— ( हाताच्या आधाराने तिच्या जवळ जात ) बघणाऱ्याला तरी असलं काही पुन्हा बघायला कसं मिळणार ?

उमा : अहो- साहेब- ( उमेश झटकन् हात सोडतो- ती दूर हसत पळते. )

उमेश : मला फसवतेस काय ? देत नाही किल्ल्या.

उमा : म्हणजे स्वतःच लपवून ठेवल्या होत्यात तर ?

उमेश : अर्रर्रर्र ! म्हणजे मीच बोलण्यात सापडलो. बायकांच्या तोंडी लागू नये म्हणतात ते काही खोटं नाही. असं तोंडघशी पडायला होतं.

उमा : किल्ल्या हरवल्याच्या कल्पनेनंच माझ्या काळजाचं पाणी पाणी झालं बघा.

उमेश : काळजाचं पाणी झालं ? चला— एक काळजी मिटली.

उमा : असा बायकोचा प्रत्येक बाबतीत अंत बघता आणि वर म्हणता मी च्यांगला नवरा—

उमेश : बरं- मी वाईट नवरा- मग तर झालं ? पण किल्ल्या टाकल्या होत्यात कुठं बाईसाहेब— माहीत आहे ?

उमा : हो- माहीत नसायला काय झालं ?

उमेश : अच्छा ! कुठे सांगा पाहू ...

उमा : अहो, तुम्हांला जिथं सापडल्या ना तिथं.

उमेश : ओह ! आय सी ! पण मला सापडल्या कुठं ? माहीत आहे...

उमा : हो ! जिथं त्या पडल्या होत्या तिथं.

उमेश : चावटपणा करू नको. बी. ए. झालेयस- माहीत आहे- मराठी घेऊन ! आपल्या कॉटच्या खाली पडल्या होत्या किल्ल्या ! आणि कुणी उचलल्या असत्या तर ?

उमा : हात्तिच्या ! कुणी उचलल्या असत्या तर माझ्याकडे आणून दिल्या असत्या ! तुम्ही नाही दिल्यात ?

उमेश : अजून दिल्यात कुठं ?

उमा : मग द्याना ...

उमेश : अंहं ! साहेबांजवळ देणार आहे. आणि सांगणार आहे की सूनबाईंना स्वयंपाक उत्तम करता आला, म्हणून तिजोरी सांभाळता येईलच असं नाही.

उमा : उमेश, प्लीज– असं नका करू. साहेब ओरडतील मला. आधीच त्यांनी त्या किल्ल्यांना जपायला सांगितलं होतं मला– प्लीज, द्याना.

उमेश : मग आधी मला चांगला नवरा म्हण.

उमा : बरं बाई. तुम्ही सगळे लोक अगदी सारखे हट्टी! कुणाला काही कमी समजायला नको. एकदा एक गोष्ट डोक्यात घेतलीत की तिचाच पाठलाग! अर्थात हाही गुण चांगलाच.

उमेश : गुण चांगला आणि नवरा नाही?– किल्ल्या हव्यात की नको आहेत— की देऊ साहेबांकडे—?

उमा : नको– नको– प्लीज!

उमेश : मग मी सांगतो तसं म्हण. तुम्ही फार चांगला नवरा आहात. (तो एकेक शब्द सांगतो– ती म्हणते.)

उमेश : इतका चांगला नवरा दुनियेत कुठल्याच बायकोला कधीच मिळाला नसेल– (उमा म्हणते– उमेश किल्ल्या देत) आता घे. पण काही म्हण, आज तू विशेष खुशीत आहेस.

उमा : आहेच मुळी.

उमेश : कारण सांगू?– तसं काही आहे काय?

उमा : तसं म्हणजे कसं?

[उमेश पाळण्यासारखा हात हलवतो व 'बाळा जो जो रे' गाणं म्हणतो—]

उमा : (लाजून) इश्श्य... तुम्हीसुद्धा असे आहात!

[बाहेरून जयेश ओरडत येतो– त्याच्या हातात एक खोका आहे.]

जयेश : वहिनी– वहिनी– (धापा टाकतो.)

उमा : अहो– पण एवढे दमलात कशानं?

जयेश : हे बघ मी तुझ्यासाठी काय आणलंय ते? साडी आहे साडी...बघ कशी आहे. तुला आणलीय. अख्ख्या लग्नात कुणी अशी साडी दिलीय का भेट? तीनशे रुपयांची आहे तीनशे! मी कित्येक दिवसांपूर्वी ठरवलं होतं की, तुला लग्नात काही देता आलं नाही, तेव्हा एक तीनशे रुपयांची साडी

अशीच द्यायची! अग, पण या भिकारड्या गावात तीनशे रुपयांची साडीच मिळेना. सगळ्या साड्या आपल्या तीनशेच्या खाली. शेवटी हुसेन एका दुकानात घेऊन गेला. तिथं मिळाली. किनार बघ कशी आहे— टॉप! आणि रंग तुझ्या कॉम्प्लेक्शनला मॅच आहे मॅच!

उमेश : हुसेननं दाखवलं ना दुकान? मग ती साडी नक्की स्मगलिंगची असणार!

जयेश : असू दे. तुला काय करायचंय त्याच्याशी?

उमेश : मला काही करायचं नाही. पण साहेबांना बरंच काही करावं लागलं. सकाळपासून भडकलेत ते.

जयेश : माझ्यावर भडकायला त्यांना काही कारण लागतंच असं नाही. त्यात आज कारण मिळालं. मग असला चान्स ते सोडतील?

उमेश : जयेश, लाज वाटली पाहिजे तुला असं बोलायला. करून सवरून वर शिरजोर!

जयेश : काय केलं रे मी?

उमा : (बावरून) अहो, पण झालं काय असं— मला सांगा तरी नीट.

उमेश : तुझ्या या दीरालाच विचार. भारी चढवून ठेवलायस ना डोक्यावर. आज साहेबांनी धावपळ केली नसती, तर घराची झडती घेतली असती पोलिसांनी.

उमा : काय हो जयेश, काय झालं?

जयेश : काही विशेष नाही. नेहमीच्यातलंच आहे. माझा विनाकारण संशय घेऊन पोलिस स्टेशनवर साहेबांना त्या साबळे इन्स्पेक्टरनं बोलावून घेतलं. त्याच्या पोरग्याला बडवला होता ना मागं सुमावरून...तेव्हापासून डूक धरून बसला आहे माझ्यावर! पुढं काय झालं पोलिस स्टेशनवर हे माहीत नाही मला...पण त्यानंतर आमचं घरी काय होणार याची कल्पना आली. पण हल्ली मी तिकडे विशेष लक्ष द्यायचं नाही असं ठरवलंय. डॅम इट— ते जाऊ दे. तुला साडी आवडली की नाही ते सांग...

उमेश : जयेश, जाऊ दे म्हणून चालणार नाही. काल हुसेनच्या घरी स्मगलिंगचा माल सापडला की नाही? त्यातल्या एका पाकिटावर चक्क तुझं नाव लिहिलेलं आहे की नाही? (जयेश बोलत नाही) साहेबांनी शब्द टाकला नसता, तर त्या हुसेनबरोबर तुलाही हातकड्या पडल्या असत्या. समजलं?

जयेश : पडल्या असत्या तर पडल्या असत्या! तुम्हांला सांगायला नसतो आलो

मला वाचवा म्हणून...

उमेश : तुला हातकड्या आज ना उद्या पडणारच आहेत हे ठाऊक आहे मला.

जयेश : ठाऊक आहे ना ? मग झालं तर !

उमेश : झालं तर काय ? तुझ्यामुळे साहेबांची गावात होणारी बदनामी टाळण्यासाठी त्यांना ही धावपळ करावी लागते, पण त्यामुळे होणारा मनस्ताप त्यांना टाळता येत नाही.

जयेश : भैया, त्याला माझा नाइलाज आहे.

उमेश : नाइलाज ? कुठल्या बाबतीत तुझा नाइलाज होतो ? जुगार खेळण्यात ? रेसचे घोडे उडवण्यात ? दोन वेळा इंटर कॉमर्स नापास झालास तो काय नाइलाज म्हणून ?

जयेश : भैया, माझ्या बाबतीत तू न बोलणं बरं. सांगून ठेवतोय.

उमेश : बोलणार. म्हणे नाइलाज होतो. त्या हुसेनच्या दुकानात तीनतीन तास पाघळत असतोस तो काय नाइलाजानं ?

जयेश : ( उसळून ) भैया, तू नेहमी माझ्यावर डाफरतोस ते काय म्हणून ? काय केलंयस तू आजपर्यंत माझ्यासाठी ? माझ्या सगळ्या दुर्गुणांचा पाढा तू नेहमी वाचतोस, तो तू स्वतःला काय देवमाणूस समजतोस ? आय हेट यू ...आय हेट यू !

उमा : जयेश... आता जास्त होतंय हे...

जयेश : वहिनी, विषयाला वाचा फुटल्यानंतर आता जास्त काय नी कमी काय ! हा म्हणे देव माणूस ! साधी माणुसकी नाही याच्याजवळ. अगदी लहानपणापासून मला आठवतंय... याचे वाटेल ते अपराध साहेब पोटात घालायचे. याला कधी शिक्षा नाही. मला मात्र बेदम मार. साहेब मला झोडपायला लागले आणि हा कधी मधे पडला असं झालं तर नाहीच, पण नंतरसुद्धा तुला लागलं का म्हणून कधी विचारलंय त्यानं मला ? विचार त्याला— माझ्यासमोर विचार. ( एक क्षण निःस्तब्ध शांतता. ) सो, आय हेट हिम. बरं, स्वतः तसा सद्‌गुणांचा पुतळा असता तर गोष्ट वेगळी !

उमेश : काय दुर्गुण आहेत रे माझ्यात ? मी कष्ट करतो हा माझा दुर्गुण ? रात्रीचा दिवस करून मी अभ्यास केला आणि इंजिनियरिंगची परीक्षा पहिल्या वर्गात पास झालो, हा माझा दुर्गुण ? बापाची अब्रू तुझ्याप्रमाणे मी मातीत

मिळवीत नाही, हा माझा दुर्गुण ? मवाल्यांच्या अड्ड्यावर मी जुगार खेळत नाही--वेश्यांच्या पोरांशी मैत्री करीत नाही--

जयेश : ( ओरडून ) भैया, तो शब्द पुन्हा उच्चारू नको.

उमेश : का उच्चारू नको ? सगळ्या घराची अब्रू तू मातीत मिळवायला निघालास, तरी मी गप्प बसू ? काही न्यायनीतीची चाड हवी माणसाला !

जयेश : एवढी नीतीची चाड होती तुला, तर तुझ्यासाठी जीव का रे द्यावा लागला त्या वीणा रावला ?

उमेश : जयेश--( कंपित स्वरात ) उमा--उमा--हे खोटं आहे. तिनं जीव दिला...स्वतःसाठी--माझ्यासाठी नाही ! मी तुला सगळं सांगितलंय. जीव देऊन ती सुटली. मला मात्र मी न केलेलं पाप जन्मभर मिरवीत राहावं लागणार आहे--हे असं. ( थोड्या वेळाने ) जयेश, याचा उच्चार तू आत्ता का केलास ? हे तुझ्या वहिनीला सांगून तू काय मिळवलंस, सांग...

[ जयेश पूर्णपणाने बावरला आहे. ]

उमा : वा ! आजचं त्यांचं यश प्रचंड आहे ! अमाप आहे ! एखादे वेळेस त्यांचा भाऊ सद्गुणी ठरला असता ना ? त्यांच्या वहिनीचा संसार जास्त सुखाचा नसता झाला ? हे तिला न कळतं-- यांच्या तोंडून तर ? वहिनीच्या सुखाला दृष्ट नसती लागली जगाची ?

जयेश : ( सेकंदाच्या शांततेनंतर अपराधीपणे— ) वहिनी, चूक झाली माझी. मला क्षमा कर. भैया, मला माफ कर. माझा असा हेतू नव्हता. ( कुणीही बोलत नाही. ) भैया, वहिनी, कुणी तरी बोला रे माझ्याशी ! वहिनी, मला एवढंच म्हणायचं होतं, की लहानसहान गोष्टीवरून मला साहेबांनी शिक्षा दिलेली आहे आणि भैयाला मात्र--

उमा : तेच म्हणतेय मी. सख्ख्या भावाला त्याच्या अपराधाचं शासन मिळालं नाही याबद्दल अनिवार दुःख होतंय ना तुम्हांला ? किती थोर मन आहे हो तुमचं ?

जयेश : नाही, वहिनी. तसं नाही. मी मूर्ख आहे. नालायक आहे. नादान आहे. पण— पण— मी वाईट नाही ग खरंच नाही. वहिनी, कसं सांगू तुला ? भैयाला शिक्षा न झाल्याचं मला दुःख होत नाही. आणि खरं म्हणजे भैया

माझ्यापेक्षा किती तरी श्रेष्ठ आहे. तो सद्‌गुणांच्या संगतीनं खूप यशस्वी झाला. मी दुर्गुणांच्या गर्तेत अजून गटांगळ्या खातोय हे मला समजत का नाही ? मला क्षमा कर, वहिनी.

उमा : आम्ही हो कोण तुम्हांला क्षमा करणार ? तुम्ही स्वतंत्र आहात. ह्या घराची अब्रू म्हणजे तुमची अब्रू नाही. ती आमची अब्रू आहे. ती राखण्याची दुर्दैवी धडपड आम्ही चालवली आहे. पण तुम्ही ती घालवलीत तर त्याबद्दल तुम्हांला दोष देणारे आम्ही कोण आणि क्षमा करणारे तरी आम्ही कोण ?

जयेश : वहिनी, तू असं बोलतेयस. अग, मी नेहमी चुका करीत आलो. नेहमी शिक्षा भोगीत आलो-- आजही चुकलो. आज तरी क्षमा करा मला भैया, मी चुकलो-- खरंच चुकलो.

उमेश : ( इतका वेळ दिङ्मूढ झालेला- सावकाशपणे ) नाही, जयेश... मी स्वतःला फार सद्‌गुणी समजत होतो, पण आज तू माझा भाऊ असूनही, वैरीसुद्धा ठेवणार नाही, इतकं नेमकं बोट ठेवलंस माझ्या वर्मावर ! थँक यू. जयेश, थँक यू व्हेरी मच !

जयेश : ( एकदम रडत ) अरे, पण एखादे वेळी तुम्ही माझ्यावर दया का नाही करीत ? एकदा तरी मला माफ करा. का असे नेहमी धारेवर धरता ? का ?- का ?-- का ?

[ ढसढसा रडू लागतो. आता उमेश व उमा त्याला दोन्ही बाजूंनी धरतात. ]

उमेश : जयेश, काय हे वेड्यासारखं !

उमा : शांत व्हा, जयेश... शांत हा...

जयेश : ( रडत ) भैया, तुम्ही सगळे- माझा तिरस्कार करता, तिटकारा करता का ? का ?

उमेश : जयेश, तसं नाही.

जयेश : मग मला असं का वाटतं ? सारखं वाटतं असं असं वाटतं- सगळे चांगले आहेत, भाग्यवान आहेत. मीच दुर्भागी आहे-- वाईट आहे. आणि मग--मग साध्या साध्या बोलण्याचा मी उलटा अर्थ लावतो. मला वाटतं, कुणीच समजून घेत नाही मला !—सगळं जग मला हिणवत आहे...

खिजवत आहे. कुणीच सांभाळून घेत नाही...

उमा : तसं नाही; जयेश, तसं नाही.

जयेश : वहिनी, मी एकटा आहे ग. जगात कुणाचाच आधार नाही मला. एक तुझा आधार आहे. पण मला भीती वाटते--माझ्या अशा वागण्यानं तोही तुटेल एखाद्या वेळी. आणि मग वहिनी, मरण्यावाचून मार्ग मोकळा नसेल मला !

उमा : जयेश, काय बोलता वेड्यासारखं ?

जयेश : वहिनी, तू, भैया, साहेब-- सगळी चांगली माणसं आहात. मग मीच का असा ? मी सगळ्यांना फक्त त्रास, मनःस्ताप दुःख देतो. मला असा बनवायचा होता तर जन्माला तरी का घातलं परमेश्वरानं ? मला मरायचं आहे, वहिनी, मला मरून जायचं आहे !

उमा : जयेश, शांत व्हा बघू... जयेश.

उमेश : जयेश, तू चांगला आहेस-- खरंच चांगला आहेस. शांत हो- एकदम शांत हो.

[ तो पाठीवरून हात फिरवून त्याला शांत करतो. ]

जयेश : ( रडू आवरून थकल्यासारखा ) वहिनी, जरा किल्ल्या दे कपाटाच्या-

[ उमा किल्ल्या देते-- जयेश धावत साहेबांच्या बाजूच्या जिन्याने वर जातो. उमेश जयेशकडे पाहात राहतो. उमा थकल्यासारखी कोचावर बसते. ]

उमेश : त्याला किल्ल्या दिल्यास--

उमा : विश्वासानं विश्वास वाढतो.

उमेश : मग माझ्यावर का नाही ठेवीत विश्वास ?

उमा : उमेश, वीणावर प्रेम होतं तुमचं ?

उमेश : ( क्षणभराने ) उमा, मी तुला सगळं स्पष्ट सांगितलं होतं. फक्त तिचं नाव नव्हतं सांगितलं. कॉलेजात टेनिसमध्ये ती माझी पार्टनर होती. माझा तिच्याशी संबंध आला तो इतकाच.

उमा : पण तुम्हांला तिच्याबद्दल कधी आकर्षण नाही वाटलं ?

उमेश : कठीण प्रश्न विचारलास तू. ती परजातीची होती आणि परजातीच्या मुलीशी लग्न करायला साहेब मला परवानगी देणार नाहीत हे मला माहीत होतं. म्हणून त्या फंदात मी पडलोच नाही.

उमा : इतके जपत आला तुम्ही साहेबांना!

उमेश : जपावंच लागलं– आईच्या पश्चात!

उमा : पण प्रेम करण्यालायक मुलगी होती ती.

उमेश : म्हणजे तू ओळखीत होतीस विणा रावला?

उमा : हो! वीणा राव माझी मैत्रीण होती…एक वर्षभर लेडीज् होस्टेलमध्ये एकाच खोलीत राहात होतो आम्ही…त्याच वर्षी तिनं आत्महत्या केली.

उमेश : पण–– उमा, त्याला मी जबाबदार नाही.

उमा : तिचा प्रेमभंग झाला एवढंच माहीत होतं आम्हांला. शेवटपर्यंत तिनं तुमचं नाव कुणाला सांगितलं नाही. ते जर तिनं मला सांगितलं असतं, तर उमेश, मी तुमच्याशी कधीच लग्न केलं नसतं!

उमेश : का?

उमा : कारण– कारण– तुमच्यावर फार प्रेम होतं तिचं. आणखी एक सांगू? तिच्यासारखं उत्कट प्रेम मलासुद्धा करता येणार नाही तुमच्यावर.

उमेश : नकोच करूस तू तिच्यासारखं प्रेम माझ्यावर! उत्कट विफल प्रेम करण्यापेक्षा साधं सफल प्रेम करावं माणसानं!

[ वर साहेबांचा रागाचा आवाज ऐकू येतो. "बदमाष, इथपर्यंत मजल गेली तुझी?" हंटरचा आवाज. नंतर जयेशचा आवाज… "पण माझं ऐकून तर घ्या…" ]

उमा : ( उठत ) काय झालं आता आणखी?

[ पुढे जयेश धावत व मागे साहेब हंटर घेऊन जिन्यावर प्रवेश करतात. ]

साहेब : बोल— तू तिजोरी का उघडलीस?

जयेश : गेल्या महिन्यात घेतलेले शंभर रुपये तिजोरीत ठेवीत होतो मी—

साहेब : पण गेल्या महिन्यात तरी चोरूनच घेतले होते ना?

जयेश : तुम्ही माझं न ऐकून घेता मला मारलंय...
साहेब : हो हो– मारलंय म्हणजे काय– जीव घेणार आहे तुझा.
जयेश : मग घ्या तरी एकदा. म्हणजे तुम्हीही सुटाल आणि मीही सुटेन.
उमेश : जयेश...
साहेब : आवाज बंद ! आय् से– शट् अप् ! माझं खातोस आणि माझ्यावर उलटतोस– सर्पासारखा ?
जयेश : जन्माला घातलं म्हणून खातोय. नसतं घातलंत जन्माला तर नसतं खाल्लं तुमचं.
साहेब : बेवकूफ– वर तोंड करून उलटं बोलतोयस ? मला ? आज तुझी चामडी लोळविल्याशिवाय राहात नाही मी. हरामखोर, डुक्कर.

[ जयेश बेडरपणे उभा राहतो. साहेब हंटर उगारतात. त्या दोघांच्या मध्ये उमा येऊन उभी राहते. ]

जयेश : वहिनी, तू बाजूला हो, मला सवय आहे मार खायची.
उमा : ( ताडकन वळून– ) चूप बसा ! एक अक्षर बोलू नका...साहेब, हंटर द्या.

[ साहेब एक क्षणभर तिच्याकडे पाहतात. हंटर देतात. तो घेऊन ती दोन पावलं जयेशकडे टाकते. ]

उमेश : उमा, काय करतेस तू ?

[ उमा हंटर खिडकीतून एकदम फेकून देते आणि रडत कोचावर कोसळते. साहेब हा प्रकार पाहून जड पावलांनी वर जातात. ]

जयेश : वहिनी ! ए वहिनी !
उमेश : शांत हो, उमा शांत हो. अग, तुझ्या आसवांचं मोल मोठं आहे. ती अशी उठल्या सुटल्या ढाळू नको.

[ उमा साडी उचलते आणि जयेशच्या अंगावर फेकते. ]

उमा : ... घ्या तुमची साडी. चोरलेल्या पैशांची साडी मला द्यायला लाज नाही वाटली तुम्हांला ?

जयेश : वहिनी– (थरथरत साडी उचलतो) वहिनी, ही साडी चोरलेल्या पैशांची नाही... साहेबांचे घेतलेले पैसे मी तिजोरीत ठेवलेत, वहिनी. ही माझ्या पैशांची साडी आहे. तिच्यासाठी मी पैसे मिळवलेत... माझ्या मार्गानं! आणि सहा महिने साठवलेत! तू ही साडी फेकून दिलीस? ठीक आहे— ठीक आहे... हेच लिहिलेलं असेल माझ्या नशिबात, तर तू तरी काय करणार?

[ साडी घेऊन जाऊ लागतो. ]

उमेश : जयेश, साडी दे इकडे.

जयेश : भैया, या बाबतीत तू नको करू मध्यस्थी... माझं बक्षीस मला मिळालं. मी साडी देणार नाही.

उमेश : जयेश, साडी दे. (साडी घेतो. उमाजवळ जाऊन) उमा, वर जा आणि ही साडी नेसून ये.

उमा : मला त्यांचं काही नको. ज्यांना या घराच्या अब्रूची चाड नाही, इथल्या माणसांची पर्वा नाही, त्यांचा माझ्याशी काही संबंध नाही. मी त्या साडीला हात लावणार नाही.

उमेश : (ओरडून) ही साडी नेसून ये. (थोड्या वेळाने शांतपणे) उमा, एक गोष्ट लक्षात घे. ही साडी तुझ्यासाठी विकत घेण्याचं स्वप्न या मुलानं सहा महिने रात्रंदिवस डोळ्यांत तेवत ठेवलं. आज ते पुरं होत आहे– ते तू पुरं कर. खऱ्या भावनेला असं पायदळी तुडवायचं नसतं. जा. नेसून ये साडी.

जयेश : भैया, का हा अट्टाहास तुझा तरी? नाही म्हटलं तरी तुझं थोडंसं चुकलंच... माझ्या भावनेची किंमत तिला वाटली असती, तर एका ठोकरीनं तिनं ती अशी मातीमोल ठरवली नसती.

उमेश : जयेश, आपल्या भावनेला कोण किती किंमत देतं यावर भावनेची किंमत अवलंबून नसते. शुद्ध प्रेम हे प्रतिसादावर अवलंबून नसतं जयेश. ते नेहमीच एकांगी असतं– वीणा रावसारखं! जा उमा, घे ही साडी. नेसून ये. आम्ही वाट पाहात आहोत. (उमा साडी उचलून वर जाते.)

उमेश : जयेश, संसारातले हे समरप्रसंग म्हणजे चहाच्या पेल्यातील वादळं, त्यांना संसारापेक्षा जास्त महत्त्व द्यायचं नसतं. (त्याच्या खांद्यावर हात ठेवतो.)

जयेश : भैया, मघाशी मी काय वाटेल ते भकलो. मला माफ कर... भैया.

उमेश : अरे, मी ते विसरूनसुद्धा गेलो.

जयेश : पण वहिनीला काय वाटलं असेल ?

उमेश : तुला काय वाटतं ते मला आज कळलं. तुझ्या वहिनीला काय वाटत असेल ते नंतर सावकाशीनं पाहू आपण.

जयेश : हेच- हेच ते ! हे असं तुझ्यासारखं चांगलं वागता येत नाही मला. आणि मग- खरं सांगू- मला मत्सर वाटतो तुझा !

उमेश : ( मोकळेपणाने हसतो ) अरे, यातच तुझा चांगुलपणा आहे. ज्यांना सद्गुग हवेसे वाटतात तेच सद्गुणी माणसांचा मत्सर करतात. अरे, मत्सर करण्याइतपत तरी सद्गुणांना महत्त्व देतोस तू. (ताक घुसळल्याशिवाय लोणी वर येत नाही. तसं माणसाचं अंतरंग मत्सराच्या रवीनं घुसळलं गेलं, की मगच त्यावर निश्चयाचं लोणी हळूहळू धरू लागतं. आणि मग, माणूस काही तरी बनण्याच्या मागं- काहीतरी करून दाखवण्याच्या मागं लागतो.)

[ उमा साडी नेसून हातात एक बॉक्स घेऊन येते- ती जिन्यावर असतानाच ]

उमेश : ओहो ! सुंदर. ( उमाला ) तिथंच थांब- तिथंच थांब. पाहिलीस का, जयेश, तुझी वहिनी या साडीत किती सुंदर दिसते आहे ती ?

जयेश : मला नाही पाह्यची. ती तुझ्यासाठी नेसलेय साडी. माझ्यासाठी नाही.

उमेश : अरे, पण वळून बघ तरी एकदा. गेल्या सहा महिन्यांत इतकी सुंदर कधीच दिसली नव्हती. लग्नात सुद्धा इतकी सुंदर दिसली नाही...

जयेश : ( जोराने ) मी बघणार नाही. ( जाऊ लागतो. )

उमा : अहो, पण आधी हे पेढे घ्या नि मग रागवा वहिनीवर.

जयेश : ( तोंड न फिरवता ) कसले पेढे ? मला नकोत. तूच खा. नाही तर फेकून दे- साडी फेकलीस तसे.

उमा : नकोत कसे ! सकाळीच आणून ठेवलेत तुमच्यासाठी. आणि आज तुमच्या आवडीचे कानोले केलेत, ते कोण खाणार ?

जयेश : पेढे ? माझ्या आवडीचे कानोले ? काय प्रकार आहे ?

उमा : अहो, प्रकार कसला ? आज तारीख किती ?

जयेश : एकोणतीस !

उमा : ( पेढावून ) एकोणतीस ! आज वाढदिवस आहे म्हटलं !

जयेश : कुणाचा ग ?

उमा : माझा !... २९ नोव्हेंबर— काही प्रकाश पडतोय का डोक्यात ?

जयेश : ( आवेगाने ) वाढदिवस— माझा वाढदिवस— काही तरी चुकतंय, वहिनी. माझा— आणि वाढदिवस ? वहिनी, या घरात माझा वाढदिवस कोणी साजरा करीत नाही.

[ उमा त्याला बोलू न देता त्याच्या तोंडात पेढा घालते— आत जाते. ]

जयेश : ( एकदम गहिवरून ) माझा वाढदिवस— माझा वाढदिवस— ( उमा आतून पंचारती घेऊन येते व त्याला ओवाळू लागते— )

जयेश : ( डोळ्यांत पाणी आणून )— वहिनी— माझी आई माझ्या लहानपणीच वारली— तिचा चेहरा मला आठवतच नाही— पण तो आज दिसतोय— अगदी स्पष्ट दिसतोय !

[ ती ओवाळीत असताना पडदा पडतो. ]

# अंक दुसरा

## दृश्य पहिले

[ स्थळ : साहेबांचा दिवाणखाना.

वेळ : संध्याकाळ : ६–०० चा सुमार. ] काही दिवसांनंतरचा प्रसंग. पडद्याच्या आत जयेश–सुमाचे बोलण्याचे व धावपळीचे आवाज ऐकू येतात.

जयेश : हा ऽऽ हा ऽऽ ला ऽ ला ऽऽ ला ऽ ला...

( धावपळीचा आवाज ) असं नाही चालणार सुमाबाई.

सुमा : तू देतोस की नाही ?

जयेश : देत नाही. ( पुन्हा धावपळीचा आवाज– धब्कन् पडल्याचा आवाज. )

सुमा : आयाईऽऽग !

जयेश : ( प्रवेश करीत ) दुबुक भोपळा पडला दुबुक !

सुमा : ( लंगडत प्रवेश करते ) पाय मुरगळला बघ माझा–

जयेश : पाय मोडला तरी मिळणार नाही.

( त्याच्या हातात गुलाबाचे लाल फूल आहे. )

सुमा : बघ हं जयेश ! वहिनींना सांगेन.

जयेश : अग, जा ग ! मोठी आली वहिनीवाली. वहिनी माझी आणि फुक्कट भाव खातेस तू ? मिळणार नाही फूल.

सुमा : माझा पाय मुरगळलाय म्हणून. नाही तर बघितलं असतं कसं मिळत नाही ते. ( जवळ जाते. )

जयेश : ( दूर पळत ) हं...हं... दुरून. सगळं नाटक दुरून.

सुमा : म्हणजे मी नाटक करतेय काय लंगडण्याचं ? तुला काळीज वगैरे काही आहे का रे ?

जयेश : माझ्या काळजाची तू नको काळजी करू. पण त्याचं काय आहे, काळजा-बरोबर माझ्या डोक्यात मेंदूही आहे– आणि तोही तल्लख.

सुमा : हो, हो, माहीत आहे तल्लख मेंदूवाला ! म्हणून तर दोन वर्षं वाऱ्या करतोयस इंटर कॉमर्सच्या !

जयेश : ए सुमे, माझ्या परीक्षेचं नाव काढशील तर दात पाडीन– ( रागाने जवळ जातो. )

सुमा : ( जवळ येत ) काय म्हणालास ?

जयेश : ( तिचा डाव ओळखून दूर जात ) नाही, म्हणजे मला काय म्हणायचं आहे, की परीक्षा पास व्हायला तल्लख मेंदूची गरज नसते. नुसती घोकंपट्टी करून पास होता येतं !

सुमा : परीक्षा पास व्हायला तल्लख मेंदूची गरज नसते ?

जयेश : नसते.

सुमा : कशावरून ?

जयेश : तसं असतं, तर तू कशी धडाधडा पास झाली असतीस परीक्षा ?

सुमा : म्हणजे माझा मेंदू तल्लख नाही काय ? ( ती त्याला मारावयास धावते. )

जयेश : काय ग, मघाशी तुझा पाय मुरगळला होता नाही ? अग, तू लंगडता लंगडता एकदम धावायला कशी लागलीस ?

सुमा : वाटेल तशी. तुला काय करायचं आहे ?

जयेश : नाही म्हणजे...मघाचं लंगडणं खोटं, की आत्ताचं धावणं खोटं ?

सुमा : काय वाटेल ते खोटं असलं, तरी ते फूल माझं आहे हे खरं आहे.

जयेश : तुझं कसं ? आमच्या बागेत फुललेलं फूल तुझं कसं ?

सुमा : ( चिडक्या सुरात ) पण ती कळी आमच्या बागेतच उगवली होती.

जयेश : असं, असं, असं! म्हणजे आमच्या बागेत फुललेल्या फुलाची कळी तुमच्या बागेत उगवली म्हणून हे फूल तुमचं!

सुमा : अर्थात! आमच्या बागेत कळी उगवलीच नसती, तर तुमच्या बागेत फूल कसं फुललं असतं हो... रावसाहेब?

जयेश : काय म्हटलंस? तुमच्या बागेत कळी उगवलीच नसती– ॲ?

सुमा : हो, हो, नसती तर...?

जयेश : तऽऽर? तर ती आमच्या बागेत उगवली असती. सोपं उत्तर. कारण त्या रोपाच्या नशिबी फूल होतं, पण तुमच्या बागेच्या नशिबी नव्हतं! म्हणून ते आमच्या बागेत फुललं.

सुमा : पण ते रोप तरी तुझं कुठंय? मीच लावलं ना तुमच्या बागेत?

जयेश : हो, हो, लावलंत तुम्हीच. पण तुमची फांदी कट करायची आयडीया माझीच!

सुमा : ( भयंकर चिडून ) माझी फांदी कट् करून वर रुबाब दाखवतोयस मलाच?

[ वेगाने फूल घ्यायला धावते. तो झटकन् कोचावर चढतो. ]

जयेश : हां, हां, हां, अशी हातघाईवर येऊ नकोस. तुझ्या फांदीचं असलं तरी ते फूल आता माझ्या ताब्यात आहे.

सुमा : ( भडकून ) हे बघ, फूल देतोस की नाही?

जयेश : फूल मिळणार नाही. पाहिजे तर ते रोपटं उपटून परत घेऊन जा.

सुमा : तुला शेवटचं विचारते. मला ते फूल वहिनींना द्यायचं आहे. तू मला देतोस की नाही?

जयेश : मीही तुला शेवटचं सांगतो, मलाही ते फूल वहिनीलाच द्यायचं आहे. आणि म्हणून तुला देऽऽत नाही! ( पुटपुटतो ) आयला! हे चांगलं. वहिनी माझी, फूल माझं! आणि रुबाब हिचा—

[ फुलाकडे कौतुकाने पाहतो. इतक्यात सुमा त्याचा एक पाय ओढते व हातात धरून उभी राहते. तो कोचावर एका पायावर उभा आहे. ]

जयेश : अग, अग– पाय सोड. मी पडेन.

सुमा : नाही सोडणार. आधी फूल दे.

जयेश : ( ओरडून ) वहिनी, ए वहिनी– ही बघ माझे पाय धरतेय. सोडायला तयार नाही.

[ उमा प्रवेश करते. जयेशची ही अवघडलेली अवस्था पाहून तिला हसू येते. गोविंदराव बाहेरून प्रवेश करतात. ]

गोविंद : वा ! काय दृश्य आहे ! कुठला सिनेमा पाहून आलात ?

[ सुमा झटकन जयेशचा पाय सोडते. ]

जयेश : ( खाली उडी मारून ) फार आवडलं दृश्य ?

गोविंद : अरे, कुणाला नाही आवडणार असलं दृश्य ?

जयेश : मग काकोबा, आम्हांला तरी पाहू दे तसलं दृश्य. ( गोविंदरावांना उचलून सुमाजवळ बसवतो– त्यांच्या हातात फूल देतो– उमासकट सगळे हसतात. )

गोविंद : ( चिडून ) हसताय काय वहिनी ! असं हसून हसून डोक्यावर चढवून ठेयलाय तुम्ही त्याला.

उमा : पण तुम्ही तरी प्रत्येक वेळी असलं भलतं मनात का आणता ? अहो, या बागेत बालपणापासून खेळताहेत ती दोघं.

गोविंद : सूनबाई, माणसं मोठेपणी बाललीला करू लागली की त्या कृष्णलीला ठरतात.

जयेश : काय हो काकोबा, तुम्हांला कृष्णाच्या लीला तेवढ्या आठवतात. पण या वयात आठवायला हवी ती भगवद्गीता... आठवते का, भगवद्गीता कृष्णाची ?

गोविंद : हो. फळाची आशा धरून कर्म करू नये, असं काही तरी सांगितलंय भगवंतांनी.

जयेश : मग ? फळाची आशा न धरता जन्मात केलंय का एखादं कर्म ?

गोविंद : अरे, आम्ही सामान्य माणसं. आम्हांला कसं जमणार असलं कर्म ? तू असामान्य ! तुला जमतं हे. फळाची आशा न धरता तू उगाच नाही दोन दोनदा परीक्षेला बसत !

जयेश : काकोबा, माझ्या परीक्षेबाबत बोलायचं काम नाही. सांगून ठेवतोय.

उमा : जयेश ! ( जयेश वरमतो ) आणि काका, तुम्ही असं कशाला बोलता ?

गोविंद : आम्हांला बरं दिसत नाही ते बोलतो. मागे त्या हुसेनच्या आईबद्दल बोललो तेव्हा याला राग आला. पण आज पोलिसांनी केस भरलेय तिच्यावर-- त्याच आरोपाखाली ! जामीन नाही तिला अख्ख्या गावात.

जयेश : काका, काय सांगताय काय हे ?

[ त्याच्या हातातून फूल गळून पडते. ]

गोविंद : तुला माहीत नाही ? आश्चर्य आहे !

उमा : हल्ली जात नाहीत ते तिकडे. त्यांना कसं कळणार ? पण काका, खरं आहे हे ?

गोविंद : खरं नाही तर काय खोटं ? दोन तासांत जामीन नाही मिळाला, तर सरळ कोठडीत नेतील तिला. जाऊ दे. आपल्याला काय करायचंय. जो तो आपल्या कर्मानं मरतो. सूनबाई, साहेब आहेत वर ?

उमा : नाही. बाहेर गेलेत.

जयेश : वहिनी, मी जरा जाऊन येतो. काही तरी केलं पाहिजे मला. त्या विचारीला हे लोक सुखानं जगू देणार नाहीत.

सुमा : ( त्याचा हात धरीत ) अरे पण ! साहेब तुला रागावतील.

जयेश : सोड सुमा माझा हात. छे, छे, मला गेलंच पाहिजे. काही तरी भयंकर घडतंय.

[ वेगाने निघून जातो. जाताना त्याचा पाय फुलावर पडतो. ]

उमा : जयेश, जयेश ! खरंच सुमा, काही तरी भयंकर घडतंय !

सुमा : ( फूल उचलीत ) वहिनी, हे मी लावलेल्या झाडाचं पहिलं फूल. जयेशनं ते तुम्हांला देण्यासाठी तोडलं, पण त्याच्याच हातून ते मातीत पडलं.

गोविंद : आणि त्याच्याच पायाखाली चुरगळलं !

उमा : ( फूल हातात घेत ) सुमा, जयेशचं असंच होतं नेहमी. त्यांना करायचं असतं एक आणि त्यांच्या हातून घडतं मात्र भलतंच.

गोविंद : ( पुटपुटत ) आणि मग सगळ्यांचा गैरसमज होतो.

सुमा : (रागाने गोविंदाकडे पाहते– ते वरच्या खोलीत जातात.) पण वहिनी, तुम्हांला तो फार मानतो. अगदी परमेश्वरापलीकडे श्रद्धा आहे त्याची तुमच्यावर. तुमचा नाही ना होत त्याच्याविषयी गैरसमज ?

उमा : (फुलाच्या पाकळ्या नीट करीत) माझा ? अजून तरी झाला नाही. पुढचं कुणी सांगावं ?

सुमा : मी सांगते पुढचं, वहिनी. तुमचा कधीच गैरसमज होणार नाही... त्याच्याबद्दल. तुम्हीच फक्त त्याला समजून घेण्याचा प्रयत्न करता. आत्ताच पाहाना ! त्या मातीत पडलेल्या फुलाचासुद्धा तुम्ही वास घेताहात. त्याच्या चुरगळलेल्या पाकळ्या पुन्हा जुळवताहात ! निर्माल्याचं पुन्हा फूल बनवता आहात !

उमा : वेडी आहेस सुमा तू ! अग, जरासं चुरगळलं म्हणून काय फुलाला निर्माल्य म्हणायचं ? इकडे ये. तुझ्या केसांत छान दिसेल.

सुमा : अहो, पण ते तुमचं आहे.

उमा : असू दे. माझं आहे म्हणूनच ते मला तुझ्या केसांत घालायचं आहे... हक्कानं. (फूल तिच्या केसांत खोवते.)

सुमा : वहिनी, काकांनी मला आज मुद्दाम निरोप धाडून बोलावलंय. कशाला ठाऊक आहे तुम्हांला ?

उमा : नाही बाई. मला नाही माहीत.

सुमा : ते येईपर्यंत मी जयेशच्या खोलीत बसू ?–ट्रान्झिस्टर ऐकत ?

उमा : हो, बस की.

[ सुमा धावत आत जाते. वहिनी विचारमग्न दिसते. ]

गोविंद : (प्रवेश करीत) वहिनी, साहेब येईपर्यंत एक चक्कर टाकून येतो गावात.

[ दिगंबरशास्त्री प्रवेश करतात. ]

दिगंबर : कसली चक्कर टाकताय, गोविंदराव ! अहो, चक्कर टाकायचं हे वय का आहे तुमचं ? (गोविंदराव वरमून हसतात.) नमस्कार वहिनीसाहेब !

उमा : नमस्कार, बसा ना.

दिगंबर : कसं काय चाललंय तुमच्या भावोजींचं ?

उमा : ठीक चाललंय !

गोविंद : तुमचं भविष्य खरं ठरण्याची वाट पाहतो आहोत आम्ही.

दिगंबर : ठरेल, ठरेल. जरा धीर धरा.

गोविंद : नाही, तुम्ही काही तरी ते 'देदीप्यमान यश' वगैरे सांगितलं होतंत ना...त्याची चातकासारखी वाट पाहात आहोत आम्ही. पण या वाळवंटावर तो कृष्णमेघ वृष्टी करण्याची काहीच लक्षणं दिसत नाहीत अजून !

दिगंबर : आता आम्ही ग्रहयोग सांगितला कुंडलीवरून. आता कुंडलीच जर चुकली असेल...तर...

गोविंद : द्या टाळी. तुम्हा ज्योतिष्यांचं हे नेहमीचंच आहे. ज्योतिष चुकलं, की कुंडलीमुळं आणि बरोबर आलं, तर ते तुमच्यामुळं.

[ गोविंदराव आणि उमा हसतात. ]

दिगंबर : तसं म्हणा हवं तर ! अहो, ज्यांचा विश्वास नाही त्यांच्यासाठी हे शास्त्र नाहीच.

उमा : जाऊ द्या हो, दिगंबरपंत, तुम्ही त्यांचं बोलणं कशाला मनावर घेता ? त्यांना सवयच आहे सगळ्यांची चेष्टा करायची.

दिगंबर : पण वहिनी, या वयात या माकडचेष्टा शोभून नाही दिसत.

गोविंद : म्हणजे तुम्ही भयंकर उकडलेले दिसता माझ्यावर ! बटाट्यासारखे !

उमा : नाही तरी गोविंदराव, तुम्हांला ही वाईटच सवय आहे, ज्या त्या गोष्टीची थट्टा करण्याची ! अहो, एखाद्याच्या श्रद्धेचा विषय असतो ना, त्याची कधी चेष्टा करू नये. उगाच कशाला दुखवायचं माणसानी !

[ गोविंदराव फिस्कारून हसतात. ]

दिगंबर : ( आणखी चिडून ) जाऊ द्या हो वहिनी. आयुष्यभरच्या सवयी आता म्हातारपणी सुटणार ? कितीही सरळ केलंत तरी कुत्र्याचं शेपूट वाकडं ते वाकडंच. तुम्ही कशाला शिणवता स्वतःला ? तुम्ही कितीही सांगितलंत तरी म्हणतात ना, 'नळी फुंकिली सोनारे, इकडून तिकडे गेले वारे !' असली त्यांची गत.

[ तो बोलत असताना गोविंदराव मधे मधे हसतात—उमालाही हसू आवरत नाही. ]

उमा : अहो, पण किती हसाल, गोविंदराव ?

गोविंद : ( हसत ) सूनबाई, हसण्यावर कंट्रोल नाही आला अजून.

दिगंबर : येईल, येईल, तोही येईल. पण गोविंदराव, तुमच्या हसण्यावर कंट्रोल येईल ना, तेव्हा पाणी येईल डोळ्यांत, समजलं ?

गोविंद : हे माझं भविष्य की तुमची भविष्यवाणी ? ( हसतो. )

उमा : गोविंदराव, पुरे झाली थट्टा. आज इकडे कसे आलात दिगंबरपंत ?

दिगंबर : अहो, त्या कुंडल्या दिल्या होत्या ना यांनी आणून, त्या पाहून घेऊन आलो. पण आता यांचा विश्वास नाही समजल्यावर कोण थांबेल इथं ?

[ रागाने जाऊ लागतो. आता गोविंदरावांची धांदल उडते. ]

गोविंद : ( त्यांना अडवीत ) अहो, पण साहेबांना भेटून जा...

दिगंबर : नाही! एकदा ठरलं म्हंजे ठरलं. वहिनीसाहेब, साहेबांना सांगा... दिगंबरशास्त्री आले होते. पण गोविंदरावांनी त्यांची टिंगल केली, तेव्हा ते निघून गेले.

गोविंद : ( हात जोडीत ) अहो, साहेब जीव घेतील माझा. तुमच्या पाया पडतो. पुन्हा टिंगल करणार नाही... परमेश्वराशपथ.

उमा : ( हसत ) पण इतक्या महत्त्वाच्या कुंडल्या आहेत तरी कुणाच्या ?

दिगंबर : ते आपले...

[ गोविंदराव त्याला थांबण्याची खूण करतात. तो एकदम गप्प राहतो. ]

गोविंद : नाही म्हणजे काय आहे, वहिनी, ते आहे साहेबांचं... सिक्रेट. एकदम सिक्रेट.

दिगंबर : पण गोविंदराव, ए वन् जुळतात कुंडल्या. जशा काही एकमेकांसाठी लिहिल्या आहेत.

[ साहेब बाहेरून प्रवेश करतात. ]

साहेब : जुळताहेत की जुळवता आहात ?

[ दिगंबरपंत उठण्याचा प्रयत्न करतात. ]

साहेब : बसा, बसा. मीही बसतो. ( बसतात. )

दिगंबर : साहेब, तुमचा विश्वास नाही आमच्या ज्योतिषावर. पण माझं भविष्य ऐका, हा जोडा जमणार– कुंडल्या सांगताहेत.

साहेब : अहो, ते मी सांगतो. कुंडल्या कशाला सांगायला हव्यात ? एकदा मी डोक्यात घेतलं की घेतलं. मग ते झालंच पाहिजे. काय गोविंदराव ?

गोविंद : पण साहेब, कुंडल्या जमल्या हेही बरंच झालं एका अर्थी. म्हणजे पुढचा मार्ग मोकळा झाला.

साहेब : अजून मार्ग मोकळा झाला नाही काका– सुमाची संमती घ्यायची आहे अजून–( उमाला ) सुमा येणार होती– आली का ती ?

उमा : हो, बसलीय ट्रान्झिस्टर ऐकत– जयेशच्या खोलीत.

साहेब : आणि जयेश कुठंय ?

[ उमा क्षणभर काय सांगावं या विचाराने बावरते– त्यांच्या हातातील हॅट, काठी घेते— ]

गोविंद : गेलाय दोस्ताच्या दुकानात.

साहेब : ( रागाने ) पुन्हा जाऊ लागला तिथं ? मी बंदी केली होती त्याला तिथं जाण्याची. तरीही गेलाय आज ?

( उमा स्तब्ध राहाते ) तुला विचारून गेला ?

उमा : नाही, सांगून गेलेत.

साहेब : आणि तू त्याला जाऊ दिलंस– नको नाही म्हटलंस ?

उमा : नाही.

साहेब : व्हाय ? आय से, व्हाय ? ( उमा स्तब्ध राहते ) हे बघ, आम्ही त्याच्याविषयी काहीही बोलू लागलो, तरी अलीकडे ते तुला आवडत नाही. म्हणजे आम्ही काय हे सगळं पाहात स्वस्थ बसायचं ? ( थोड्या वेळाने, अस्वस्थपणे ) बट आय डोन्ट अन्डरस्टॅन्ड धिस ! तिथं काय ठेवलंय त्याचं पुजून, कळत नाही मला.

उमा : साहेब, नको नको म्हणत असताना जेव्हा तिथं जातात तेव्हा कदाचित इथं न मिळणारी गोष्ट त्यांना तिथं मिळत असेल.

साहेब : नॉन्सेन्स ! त्या भिकारड्यांकडे इथं न मिळणारी कोणती गोष्ट मिळते त्याला ?

उमा : ( झटकन् -- अर्धवट स्वतःशीच ) प्रेम -- ममता -- माया ! ( वेगाने आत जाते. साहेब क्षणभर अवाक् होतात. नंतर स्वतःला सावरीत ) सुमा, ए सुमाताई --

( सुमा, आतून ! ' आले-- काका ' म्हणते. )

साहेब : दिगंबरपंत, ही दादासाहेब मोहित्यांची मुलगी. ओळखता ना दादासाहेबांना ?

दिगंबर : अहो, त्यांना कोण नाही ओळखत गावात ?

साहेब : तो आणि मी बालमित्र. दोघे संगतीनं वाढलो-- संगतीनं म्हातारे झालो. मी झालो सरकारी नोकर, तो पडला व्यापारात. त्याची ही मुलगी. हुशार आहे. यंदा बी. ए. ला आहे. मी तिला स्वतःचीच मुलगी मानतो.

दिगंबर : छान-- छान !

साहेब : अहो, म्हणून तर स्पष्ट सांगितलं त्याला— तू लग्न कर तिचं, पण स्थळ पसंत करणार मी !

गोविंद : या स्थळाविषयी काळजीच नको, साहेब. कुंडल्या बघा--

साहेब : त्या तुम्ही बघा गोविंदराव. मी मुलगा पाहून, खात्री करून मगच सुचवला हुषार, सुस्वभावी, देखणा ! अहो, गेल्या वर्षी बी. एस्सी. ला फर्स्ट क्लासमधे आला... केमिस्ट्रीचं गोल्ड मेडल् मिळालं त्याला. आहात कुठं ! धुंडून सापडायचं नाही असं स्थळ. सरदार घोरपडे म्हणजे महाप्रस्थ आहे कोल्हापुरातलं ! ( सुमा येते. )

साहेब : ये, सुमा. हे दिगंबरपंत. उत्तम ज्योतिषी आहेत. ही आमची सुषमा. एवढीशी चिमुरडी होती. आता पाहा केवढी झालेय ! ( खुशीत येऊन ) बरं का दिगंबरपंत, लहानपणापासून ही हुषारच ! माझ्या केबिनमध्ये माझ्या परवानगीशिवाय पाय टाकायची प्राज्ञा नसे कुणाची. अपवाद फक्त हिचा. एवढासा स्कर्ट घालून ही चिचुंद्री बेलाशक घुसायची आत. आणि मग माझं कितीही महत्त्वाचं काम असलं, तरी शिपायाला सांगून एक चॉकलेट आणि एक आइस्क्रीम एवढं पदरात पडल्याशिवाय हलायची नाही तिथून.

सुमा : खरंच, काका, मला अजून वाटतं... लहान होते तीच चांगली होते. उगाच मोठी झाले.

साहेब : काय ग सुमा, तू पाहिलं आहेस ना घोरपड्यांच्या अरविंदला ? गेल्या

वर्षी आला होता आमच्याकडे. महिनाभर राहिला होता. आठवतं ना ?

सुमा : हो, न आठवायला काय झालं ?

साहेब : कसा आहे ?

सुमा : छान आहे की.

साहेब : गुड ! सुमाताई, यंदा आम्ही बार उडवून देणार तुमचा.

सुमा : हो. तुम्हांला, दादांना, माईला-- सगळ्यांना घाई झालेय् ना माझ्या लग्नाची ? गेला आठवडाभर हाच विषय आहे घरात. तुम्हीच सुरुवात करून दिलीय ना त्याची ?

साहेब : अग, मी सुरुवात केली तर तू शेवट कर... गोडसा !

सुमा : पण काका, मला लग्नच करायचं नाही इतक्यात.

साहेब : अग, पण आम्ही कुठं म्हणतो आहोत उद्याच लग्न कर म्हणून. लग्न कधी करायचं ते हे दिगंबर शास्त्री ठरवतील. काय हो दिगंबरपंत ?

(दिगंबरपंत " ह्या ह्या " करीत हसतात-- साहेबही हसतात.) आम्ही पाहिलेलं स्थळ पसंत आहे की नाही ते तर सांगशील ?

सुमा : काका, मला कुठल्याच स्थळाचा विचार करायचा नाही इतक्यात.

साहेब : का ? का नाही करायचा ?

सुमा : काका, तुम्हांला कारण माहीत नाही ?

साहेब : कारण माहीत आहे-- पण पटत नाही.

सुमा : तुम्हांलाच काय, पण आमच्या दादा-- माईनासुद्धा पटत नाही.

साहेब : पण तू कधी त्यांना पटवून देण्याचा प्रयत्न केलायस ?

सुमा : कशाला करायचा ? मला माहीत आहे-- त्यांना पटणार नाही.

साहेब : कारण ते पटण्यासारखं नाही— होय ना ?

सुमा : काका, माझ्या भावनांचा तुम्हांला विचार करायचा नसेल, तर तुम्हांला काय हवं ते करा तुम्ही— माझं काय ?

साहेब : सुमा, अशी चिडू नको. आज आम्हांला काय हवं हा प्रश्न नसून तुला काय हवंय हा प्रश्न आहे.

सुमा : काका, मला काय हवं ते तुम्हांला ठाऊक नाही असं म्हणायचं आहे का तुम्हांला ?

साहेब : पण सुमा, तुला जे हवं ते मिळत नसेल किंवा ते तू स्वीकारण्याच्या

योग्यतेचं नसेल—
सुमा : हे कुणी ठरवायचं काका ?
साहेब : अर्थात सुमा तू. पण त्याची योग्यता तू तुझ्या आईवडिलांना— मला पटवून नको द्यायला ? ( सुमा स्तब्ध होते. )
गोविंद : सुमा, अग, केवढं मोठं घराणं आहे ! माहीत नाही तुला. केवढं नाव आहे !
दिगंबर : हां, गोविंदराव, नावावर जाऊ नका. मोठ्या नावाचं मोठेपण पुष्कळ वेळा नावाचंच ठरतं. अहो, नाव मोठं आणि नाणं खोटं असं होतं एखाद्या वेळी !
साहेब : तुम्ही शुद्धीवर आहात दिगंबरपंत ? हे नाणं मी पारखलंय.
दिगंबर : यांच्याविषयी नाही म्हणत मी, साहेब. पण आता बघा, आठ–पंधरा दिवसांपूर्वीची गोष्ट. त्या साबळे इन्स्पेक्टरच्या मुलीची पत्रिका परत करायला गेलो होतो पोलिस स्टेशनवर. तिथं एका दारूच्या केसमध्ये तो जबाब लिहून घेत होता. कुणाचा ? त्या पाववाल्याच्या पोराचा. आणि त्याच्याबरोबर कोण होता ठाऊक आहे ? तुमच्यासारख्याच एका बड्या हाफिसरचा पोरगा— आता घ्या. म्हणून म्हणतो ना—नाव मोठं आणि नाणं खोटं ! ( हसतात. )
साहेब : ( आवेग आवरीत ) दिगंबरपंत, तो माझाच मुलगा होता.
दिगंबर : ( घाबरून, एकदम वेगळ्या सुरात ) छे, छे, तसा मुलगा दिसला राजबिंडा, काय तेज होतं चेहऱ्यावर ! आपलाच पुत्र मग काय विचारता ? अहो, काय रुबाबात बोलत होता त्या इन्स्पेक्टरशी ! काही विचारू नका. दारू-बंदीचा अख्खा कायदा शिकवीत होता त्याला. मी बघितला तेव्हाच ओळखलं, की कुठल्या तरी मोठ्या घराण्यातला मुलगा आहे. अहो, इंग्रजीत फाडफाड बोलत होता त्याच्याशी. आता तो लक्ष देत नव्हता— पण याचं बोलणं म्हणजे आपलं तुफान मेलसारखं...
साहेब : ( असह्य होऊन ) स्टॉप इट ! स्टॉप इट ! ( थोड्या वेळाने ) दिगंबरपंत, तुमचं काम झालंय— तुम्ही जाऊ शकता.
दिगंबर : ( घाबरून ) बरं, बरं– गोविंदराव, नंतर भेटू.

[ जवळजवळ पळत जातो. त्यांच्यामागे गोविंदरावही जातात. ]

साहेब : ( स्वतःशीच ) हे विष किती दिवस पचवावं लागणार मला परमेश्वराला माहीत. ( थोड्या वेळाने ) ऐकलंस सुमा,— जयेशविषयी गावात लोक काय बोलतात ते ? या पोरानं गावात माझं तोंड कसं काळं केलं आहे याची कल्पना आली ना तुला ? बरं झालं हेही एका अर्थी ! ( थोड्या वेळाने ) त्याच्याशी लग्न करायला तुला आमचा विरोध का आहे हे लक्षात आलं तुझ्या ?

सुमा : ( धीर करून ) पण काका, प्रेम विचार करून करता येतं का ?

साहेब : नाही. पण लग्न येतं ! हे बघ, प्रेम ही एक धुंद भावना आहे, पण लग्न ही एक जबाबदारी आहे, आणि तुझं भवितव्य ज्याच्या भवितव्याशी कायमचं निगडित होणार, तो मुलगा कर्तबगार असावा, निदान बेजबाबदार नसावा... नालायक नसावा असा रास्त आग्रह धरण्याचासुद्धा तुझ्या आईवडिलांना अधिकार नाही ?

सुमा : पण काका, माझ्या प्रेमासाठी मी वाटेल तो त्याग करायला तयार आहे.

साहेब : नॉन्सेस ! त्याग ? कुणासाठी कुणाचा त्याग करते आहेस तू ? जन्मभर ज्यांनी तुझ्यावर जीवापाड माया केली, तुला तळहाताच्या फोडासारखं सांभाळलं त्या तुझ्या आईवडिलांच्या प्रेमाचा त्याग एका नादान माणसाच्या प्रेमासाठी करते आहेस तू ! हे योग्य आहे असं वाटतं तुला ?

सुमा : पण काका प्रेम जडतं...

साहेब : हो जडतं ! पण जीवनातल्या श्रेष्ठ मूल्यांवर ते जडलं की दुर्गुणी माणसावर कधीच जडत नाही ! सुमा, शांतपणे विचार कर. माझं म्हणणं पटेल तुला. अग, पुरुषानं पराक्रमाची शिखरं जिंकून काबीज करावीत आणि स्त्रीनं ती आपल्या प्रेमानं शृंगारावीत, यासाठीच परमेश्वरानं स्त्रीला अमाप प्रेम करण्याचं सामर्थ्य दिलं आहे. स्त्रीचं प्रेम हे फक्त पुरुषार्थाचंच धन झालं पाहिजे. ते जर वाटेल त्या भुक्कड माणसाला मिळू लागलं, तर पुरुषार्थाला मोल राहणार नाही जगात ! प्रेम केलं रुक्मिणीनं कृष्णावर, सीतेनं रामावर, संयुक्तेनं पृथ्वीराजावर ! आमची स्त्री सर्वस्व वाहून पूजा बांधते पौरुषाची ! हा भारतीय नारीचा आदर्श आहे. आणि तू हे काय करतेस ? तुम्हा आजकालच्या पोरींना स्वतःच्या स्त्रीत्वाची काही किंमत वाटत नाही, कदर वाटत नाही. अग, परमेश्वरानं तुमच्या हाती सोनं दिलंय ते काय असं मातीत मिसळायला ?

सुमा : काका—

साहेब : (तिला बोलू न देता, कठोरपणे) माझं म्हणणं तुला पटत नसेल, तर ते कसं चूक आहे हे तुला सांगावं लागेल. तुझ्यासारख्या सुशिक्षित, समंजस आणि चांगल्या घराण्यातल्या मुली जर रस्त्यावरल्या मवाल्यावर प्रेम करू लागल्या—

सुमा : मला तुमचं म्हणणं पटतं. पण काका, माझ्यावर मेहरबानी करा आणि या शब्दात जयेशविषयी बोलू नका.

साहेब : हे तू मला सांगतेस ? आणि का बोलू नको ? काय वेगळा आहे यापेक्षा तो ?

सुमा : पण काका, तो तुमचा मुलगा आहे.

साहेब : (भडकून) डॅम डॅट रास्कल! (क्षणभराने आवेग आवरून) तो माझा मुलगा आहे हेच माझं दुर्दैव आहे. पण मुलगा आहे, म्हणून तुझ्या-सारखं आंधळं प्रेम नाही करीत मी त्याच्यावर. उद्या तुझ्या मुलांनी तुला विचारलं की आमचा बाप काय करतो ? काय सांगणार तू ? सट्टा लावतो, स्मगिंलग करतो, बदमाषांच्या संगतीत राहतो ? उद्या इतरांची मुलं त्यांना विचारू लागली--"माझे वडील डॉक्टर आहेत, माझे वडील वकील आहेत, तुमचे वडील काय करतात ?" काय उत्तर द्यायचं त्यांनी ? नादान माणसामुळे त्यांच्या बायकांपेक्षा त्यांच्या मुलांचाच छळ जास्त होतो समाजात. आणि मग त्यांनी विचारलं--तुला--"आई, बी. ए. झालीस तू- या नादान माणसाशी का लग्न केलंस ?" काय उत्तर देणार तू ? माझं प्रेम बसलं म्हणून सांगणार ?

सुमा : (रडत) काका- थांबा काका- बोलू नका.

साहेब : आणि उद्या तुझ्या मुलीचं असंच एखाद्या मवाल्यावर प्रेम बसलं, तर तू त्याला विरोध नाही करणार ? त्यांचं काय थाटात लग्न लावून देणार ?

(सुमा कानावर हात ठेवते व रडू लागते.)

साहेब : (तिला जवळ घेत) रडू नको, बाळ, विचार कर. हा क्षण फार महत्त्वाचा आहे. मी तुझ्यासमोर रेखाटलेलं चित्र चुकीचं नाही. हे तुझ्या संसाराचं चित्र तुला टाळायचं असेल तर हा मोह तुला टाळला पाहिजे. हे बघ, माणसापेक्षा सद्गुण श्रेष्ठ आहेत, जीवनातील मूल्यं श्रेष्ठ आहेत. जयेशमधला एक सद्गुण सांग मला- सांगतेस ? (सुमा गप्प राहते.) तू त्याच्यावर प्रेम करावंस किंवा त्याच्यासाठी तुझ्या आईबापांना दुखवावंस इतकी लायकी नाही त्याची.

तू त्याच्यासाठी त्याग करण्याची तयारी दाखविलीस, पण तुझ्यासाठी तो त्याच्या दुर्गुणी मित्रांचा... वाईट नादांचा त्याग करायला तयार आहे ? जा, विचार त्याला. नाही उद्दामपणे भिरकावून दिली त्यानं तुला, तर काय वाटेल ते हरेन मी. ( रडणाऱ्या सुमाला जवळ घेत ) हे बघ बाळ, प्रेमभंगाचं दुःख मी जाणतो... पण पोरी, कोणत्याही दुःखावर जगण्याइतका जालिम उपाय नाही दुसरा... हेही मी जाणतो... अनुभवानं ! सुमा, माणसानं जगावं पाखरासारखं ! पाखरं जगतात आकाशासाठी... घरट्यासाठी नाही ! म्हणून एक घरटं मोडलं तर ती दुसरं बांधतात... तसंच एक स्वप्न भंगलं तर दुसरं स्वप्न रचून जगावं माणसानं ! जगावं जगण्यासाठी... जीवनासाठी... स्वप्नांसाठी नाही ! ( वरच्या खोलीत जाऊ लागतात. )

सुमा : ( एका विचित्र शांततेनंतर ) काका, एक प्रश्न विचारू तुम्हांला ?

साहेब : ( थांबून ) विचार.

सुमा : रागावणार नाही ?

साहेब : तुझ्यावर कधी रागावलोय का मी ?

सुमा : काका, जयेश लहानपणी फार गोड, समंजस, चांगला मुलगा होता. होता ना ?

साहेब : ( कुठे तरी दूर पाहिल्यासारखं सुस्कारा टाकून ) हो--होता; पण आता नाही.

सुमा : खरं आहे. आता तो हेकेखोर, बेफाम बनला आहे हे पटतं मला.

साहेब : ( समाधानाने ) पटतं ना ?

सुमा : पण काका, तो असा झाला याची काहीच जबाबदारी नाही तुमच्यावर ?
( सुमा साहेबांकडे तीव्र नजरेने पाहते. साहेब रागाने थरथर कापतात— हळूहळू विकल होतात आणि अवसान गेल्यासारखे हतबल स्वरात )

साहेब : आय डोन्ट नो--( पराभूत पावलांनी घरात जातात. )

सुमा : काका, मला पटतंय तुमचं म्हणणं, काका ! काका ! काका--काका—
( सुमा रडत कोचावर कोसळते तोच उमा येते. )

उमा : हे काय सुमा-- रडायला काय झालं-- आणि एकटीच काय करतेस इथं ?

सुमा : वाट पहातेय !

उमा : कुणाची ?

सुमा : जयेशची !

[ उमा सुस्कारा सोडीत पलीकडच्या खुर्चीवर बसते. थोड्या वेळाने ]

सुमा : वहिनी, दादांनी माझ्यासाठी एक स्थळ पाहिलं आहे—काकांनीच सुचवलंय्—

उमा : बरं मग—

सुमा : ( घोटाळत ) त्यांना जयेशचं वर्तन पटत नाही—

उमा : तुला पटतं ?

सुमा : अंहं ! मलाही नाही...त्यांचं म्हणणं असं आहे, की बाकी काहीही असलं, तरी जयेशसारख्या बेजबाबदार मुलाशी मी लग्न करू नये—

उमा : मग तुला काय वाटतं ?

सुमा : मला त्यांचं म्हणणं पटतं ! ( क्षणभराने ) तुम्हांला नाही पटत ?

उमा : माझ्या पटण्या न पटण्याशी काय संबंध आहे याचा ? हा तुझ्या जीवनाचा प्रश्न आहे.

सुमा : आणि जयेशच्या जीवनाचा नाही ?

उमा : त्या बिचाऱ्यांना आहे कुठं जीवन ? वादळाच्या चक्रात सापडलेल्या एकाकी पानाला कुठं असतं जीवन ! वादळ नेईल तिकडे जायचं, त्याच्या बरोबर भरकटायचं. आणि ते थांबलं तर आपण थांबायचं– जिथं ते थांबेल तिथं !

सुमा : वहिनी, तुम्ही जयेशवर एवढी माया का करता ?

उमा : अग, माया अशा माणसावर करावी की ज्याला मायेची गरज आहे. आज त्यांनाच जास्त गरज नाही का अशा मायेची ?

सुमा : मघाशी काका म्हणाले– जयेशमधल्या एका सद्गुणाचं नाव सांग. आणि वहिनी, खरंच मला काहीच सांगता येईना. इकडे आड आणि तिकडे विहीर अशी अवस्था झालीय माझी. वहिनी, मी काय करू ? काकांनी तर मला स्पष्ट सांगितलंय की, तुझ्यासाठी तो त्याच्या वाईट मित्रांचा, वाईट छंदांचा त्याग करणं शक्य नाही.

उमा : कदाचित बरोबर ठरेल साहेबांचं म्हणणं

सुमा : असं तुम्हालाही वाटतं ?

उमा : आज तरी वेगळं कुणाला काय वाटणार ? ( उठते )

सुमा : मग अशा मुलाला जावई म्हणून नकार देण्यात काही चुकेल का माझ्या आईवडिलांच ?

उमा : नाही--मुळीच नाही !

सुमा : वहिनी, दादा-माई फार प्रेम करतात माझ्यावर ! खरं म्हणजे जयेशवरही दोघांचं खूप प्रेम आहे. पण संगतीनं बिघडलाय तो, सुधारण्याच्या पलीकडे गेलाय असं वाटतं त्यांना—

उमा : तुला काय वाटतं सुमा ?

सुमा : मला ? मला काय वाटणार ? त्यांचं म्हणणं बरोबर वाटत असताना केवळ माझ्या प्रेमासाठी त्यांच्या प्रेमाशी मी प्रतारणा करू ? हा कृतघ्नपणा नाही ठरणार ? बोला—वहिनी !

उमा : काय बोलू ?

सुमा : असं का बोलता, वहिनी ? मला मदत हवीय् तुमची- फार, फार गोंधळून गेलेय मी.

उमा : हे बघ, सुमा— तुझ्या आईवडिलांचं म्हणणं योग्यच आहे. लग्न हा पोरखेळ नाही. तिथं एकदा चुकलं तर ती चूक नंतर दुरुस्त करता येत नाही.

सुमा : असंच. अगदी असंच सांगते माझी आई मला नेहमी. पण वहिनी, तुम्हीच पाहा, धड परीक्षा देत नाही. संगत भलत्या माणसांशी करतो. गावात नाव खराब आणि वर घमेंड कोण ?

[ जयेश बाहेरून प्रवेश करतो. ]

जयेश : काय ग, कुणाचं वर्णन चाललंय ?

सुमा : तुझं—

जयेश : आणि ते वहिनीजवळ कशाला ? तिला माहीत आहे ते—

सुमा : आणि या वर्णनात बदल व्हावा असं काहीच करायला तू तयार नाहीस-होय ना ?

जयेश : हे बघ सुमा, मला तुझ्या प्रेमाची भीक नकोय. मला माहीत आहे तुला स्थळं सांगून येताहेत ते. शेवटी सगळे व्यवहार पाहतात-तूही पाहा ! मी हा असा आहे— पटलं तर पाहा, नाही तर छोड दो ! उगीच कटकट

क्र. ९८८८)
नाटक
वि.

नको सदाची !

सुमा : ( तीव्रपणाने ) जयेश—

जयेश : काय ? बोल— बोल—

सुमा : ( भडकून ) तू एवढा घमेंडीनं वागतोस, बोलतोस, तो कशाच्या आधारा-वर ? काय मिळवलं आहेस तू आयुष्यात ? साधी इंटर कॉमर्सची परीक्षा दोनदा नापास झालास—

जयेश : माझा निकाल दोन्ही वेळा पेपरात छापून आला, तो तू मला पुन्हा सांगायची गरज नाही— समजलं ? आणि तुझ्या इतर प्रश्नांविषयी म्हणशील, तर असल्या प्रश्नांना उत्तरं द्यायची सवय नाही मला. आणखी काही ?

सुमा : हे बघ, जयेश, माझ्या आईवडिलांचं जिवापाड प्रेम आहे माझ्यावर— त्यांनी खस्ता काढल्यात आयुष्यभर माझ्यासाठी. मला त्यांच्या परवानगीवाचून काहीच करता येणार नाही.

जयेश : प्रेमसुद्धा ?

सुमा : ( क्षणभर थांबते– या प्रश्नाला उत्तर न देता बोलू लागते ) निदान त्यांचं म्हणणं अयोग्य वाटेपर्यंत तरी त्यांना दुःख होईल असं काही करणार नाही मी. एवढी अपेक्षा माझ्याकडून बाळगण्याचा त्यांना नक्कीच अधिकार आहे. वहिनींनाही पटलंय माझं म्हणणं—

जयेश : आय सी ! होय वहिनी ? तुलाही पटलं हे सारं...

उमा : तुम्हांला नाही पटत ?

जयेश : हे बघ सुमा, हा तुझा–माझा प्रश्न आहे— त्यात वहिनीला नको पाडूस मधे—

सुमा : पण तू काही तरी कर, जयेश– असं काही कर की तुझ्याविषयीच्या अभि-मानानं मी ताठ मानेनं बोलू शकेन जगाशी– तुझ्या बाजूनं—

जयेश : माझ्या बाजूनं जगाशी बोलायला मला कुणी नको आहे— तूही नको आहेस. ( एकदम ) काय वाईट आहे ग माझ्यात ?

सुमा : मी विचारते, काय चांगलं आहे रे तुझ्यात ? वाईट संगत–

जयेश : बस् , बस् , बस् ! कान किटलेयत ते सारं ऐकून. मी वाईट आहे म्हणजे चोर, दरोडेखोर तर नाही ? सांग तुझ्या आईवडिलांना, म्हणावं, त्यांची सुद्धा लग्नं होतात– एकेक नाही–चांगली चारचार होतात—

सुमा : म्हणजे माझ्यासाठी एवढंही तू करायला तयार नाहीस तर–

जयेश : मला जास्त बकवास नको आहे. मी तुझ्यासाठी काही केलं तर तू माझ्यासाठी काही करणार– हे मला मुळीच मंजूर नाही. तुझ्या नसत्या मेहेरबानीची मला अजिबात गरज नाही. समजलीस? मला फक्त एका प्रश्नाचं उत्तर दे तू. माझ्यावर तुझं प्रेम आहे की नाही?

सुमा : मला माहीत नाही.

जयेश : माझ्याशिवाय जगता येईल तुला?

सुमा : मला माहीत नाही.

जयेश : दुसऱ्या कुणाशी लग्न झालेलं चालेल तुला?

सुमा : मला माहीत नाही– माहीत नाही– माहीत नाही!

जयेश : वहिनी, सांग तिला– तिच्यासारख्या छप्पन्न पोरी मिळतील मला–

उमा : हा तुमचा प्रश्न आहे. त्यात वहिनीला नका पाडू मधे–

जयेश : ठीक आहे. (भडकून, सुमाला) पुनः सौदा पटवायला येऊ नको इथं. समजलं? गेट आउट!

[तरातरा आत निघून जातो.]

सुमा : (स्वतःला सांभाळीत संथपणे) वहिनी, पाहिलंत? नेहमीच असं वागतो माझ्याशी–– माझ्या काही अडचणी आहेत– खऱ्या अडचणी आहेत–– हे समजून घ्यायलाच मागत नाही हा. त्याच्या दृष्टीनं मी म्हणजे कचरा–पाचोळा. याच्यावर प्रेम केलं एवढाच गुन्हा केला मी त्याचा– (हुंदके देते.)

उमा : (तिला जवळ घेत) सुमा, शांत हो बघू– एकदम शांत हो. अग, आपल्या जीवनाचा मार्ग शेवटी नियती आखीत असते– आखू दे तिला. तिला विरोध करून तरी काय करणार आपण? प्रवाहाच्या विरुद्ध जास्त वेळ पोहता येत नाही माणसाला!

सुमा : वहिनी, किती स्वप्नं पाहिली होती मी! सगळी उधळून गेलीत आज— जळून खाक झाली आहेत! त्यांची राख उराशी धरून कशी जगू मी— (हुंदके देत) कशी जगू मी– सांगा, वहिनी—

उमा : शांत हो सुमा. जीवन हे जगायचं असतं– कसंही असलं तरी जगायचं असतं! आतापर्यंत कशी शहाण्यासारखी बोलत होतीस– आणि आता

काय हे वेड्यासारखं बोलतेस ? तुझं म्हणणं अगदी बरोबर आहे. सुमा, खरंच बरोबर आहे.

सुमा : वहिनी, तुम्हाला पटलं माझं म्हणणं ? जरा बरं वाटलं ! तुम्ही कधी चुकत नाही–

उमा : नको असं म्हणू. मीही चुकेन एखाद्या वेळी— कुणी सांगावं ?

सुमा : वहिनी, मघाशी काका म्हणाले– पुरुषानं पराक्रमाची शिखरं गाठावीत आणि स्त्रीनं ती शृंगारावीत ! किती सुंदर कल्पना ! अगदी माझंच स्वप्न बोलून दाखवीत होते ते. तुम्हाला माहीत नाही वहिनी, पण असं एखादं शिखर जयेशनं गाठावं म्हणून किती धडपडलेय मी– काय काय केलं त्याच्या-साठी, माझं मलाच माहीत. पण शेवटी हाती अपयश आलं माझ्या. सगळा अंधार दिसतोय समोर. माझी सहन करण्याची ताकद संपलीय आता.

उमा : सुमा, स्त्रीनं सहन करायचं असतं– अगदी शेवटपर्यंत– तोच तिचा धर्म आहे. ज्या दिवशी स्त्रीची सहनशीलता संपेल त्या दिवशी प्रलय होईल जगात ! माणसाला माणसात ठेवलंय ते स्त्रीच्या सहनशीलतेनं !

सुमा : वहिनी, वेड मन अजून स्वप्नं बघण्याची सवय सोडायला तयार नाही. वहिनी, जर जयेशनं असं एखादं शिखर काबीज केलं तर तो दिवस माझ्या आयुष्यातील सोन्याचा दिवस ठरेल. त्या दिवसाची मी वाट पाहीन. त्या दिवशी शक्य असेल तर सगळ्यांचा विरोध पत्करून मी तुझ्याकडे धावत येईन-- पण वहिनी– मी इतकी भाग्यवान नाही हो-- मला माहीत आहे, तो दिवस माझ्या आयुष्यात कधी उगवणार नाही— कधीच उजाडणार नाही, --( चटकन वहिनीच्या पाया पडते ) वहिनी, जाते मी.

[ रडत निघून जाते-- वहिनी डोळे पुसते. जयेश कपडे बदलून बाहेर जाण्याच्या तयारीने आपल्या खोलीतून प्रवेश करतो. ]

जयेश : ( शीळ वाजवीत प्रवेश करतो ) गेली का ती— जाऊ दे. मला माहीत आहे वहिनी, माझ्या आयुष्यात शेवटी फक्त तूच राहणार आहेस— आणि तीही नाइलाजानं ! वहिनी झाली आहेस ना– जाशील कुठं ?

उमा : कुठं निघालात ?

जयेश : जरा बाहेर जाऊन येतो.

उमा : इकडं या...इकडं या म्हटलं ना...असे माझ्यासमोर येऊन उभे राहा . पाठ करा.

[ हातातील स्वेटर त्याच्या छातीला लावून रुंदी बरोबर आहे की नाही ते पाहते. ]

जयेश : अग, अग, काय करतेस ? स्वेटर--कुणासाठी ?

उमा : म्हणे कुणासाठी ?

जयेश : माझ्यासाठी स्वेटर ? का-- काय धाड भरलीय मला ? जिच्यावर प्रेम केलं ती गेली निघून, आणि तू का जीव टाकतेस माझ्यासाठी ? काय संबंध आहे तुझा--माझा ?

उमा : ( डोळ्यांत पाणी येऊन थरथरत्या सुरात ) काहीच संबंध नाही तुमचा आणि माझा ?

जयेश : ( थोड्या वेळाने-- स्वतःचे डोळे पुशीत ) वहिनी... मी एकदम नालायक माणूस आहे बघ... नालायक तसाच, नादान तसाच, आणि कृतघ्नही तसाच !

उमा : जयेश, प्रत्येक वेळी तुम्हाला पश्चात्ताप होतो, पण तो क्षणाचा ठरतो. त्या क्षणानंतर तुम्ही पुन्हा पूर्वीच्याच वळणानं वाहू लागता. मघाशी सुमाला काय बेपर्वाइनं उत्तरं दिलीत ? का दिलीत ? मला माहीत आहे— त्याबद्दलही आता तुम्हाला पश्चात्ताप होतोय...

जयेश : वहिनी, माझी कोणतीही गोष्ट सरळ होत नाही. होणार नाही. शुद्ध सुखाची चव मी कधी घेतलीच नाही. वहिनी, तुला ते लहान मुलाचं गाणं आठवतं- चांदोबाचं ? ' चांदोबा, चांदोबा, भागलास का ? निंबोणीच्या झाडा-आड लपलास का ? ' मी आजीकडे होतो ना तेव्हा तेव्हा तिनंच शिकवलं हे गाणं मला. त्या गाण्याच्या शेवटी— ' तुपात पडली माशी, चांदोबा गेला उपाशी '-या ओळी आल्या की मी नेहमी विचारायचा आजीला, " आजी, चांदोबाच्या तुपात माशी का पडली ग ? " आजीनं कधीच उत्तर दिलं नाही मला या प्रश्नाचं—पण आयुष्यानं दिलं ! प्रत्येक वेळी मी काहीही करायला गेलो की त्या चांदोबाप्रमाणं माझ्या तुपात माशी पडायची आणि मी उपाशी राह्यचो—

उमा : हो–हो–हो–हो, पण म्हणते तुपात माशी पडली तर उपाशी राह्यचं काय कारण ? अलगद माशी उचलावी आणि फेकून द्यावी. एवढ्याशा माशीसाठी सगळं तूप फुकट घालवायचं ?

जयेश : वहिनी, यू आर ग्रेट ! रिअली ग्रेट ! मला जे प्रश्न कधीच सुटत नाहीत ते तू इतक्या झटकन् कसे सोडवतेस ग ?

उमा : काही प्रश्नांची उत्तरं त्या प्रश्नातच सापडतात. एक सिक्रेट सांगू ?

जयेश : सांग ना !

उमा : उत्तर सुचलं नाही ना, तर प्रश्नपत्रिका पुन्हा वाचावी. उत्तर सहज सापडतं.

जयेश : मग मलाच का नाही सापडत ?

उमा : कारण तुम्ही तुमच्या प्रश्नांकडे सोडवण्याच्या दृष्टीनं पाहातच नाही— बेपर्वाईनं पाहता ! मघाशी त्या सुमाला कशी बेपर्वाईनं उत्तरं दिलीत ? का दिलीत ? तिचे प्रश्न हे तुमचे प्रश्न नाहीत ? तिच्या अडचणी तुमच्या अडचणी नाहीत ?

जयेश : नाही— वहिनी — चुकलंच हं आपलं !

उमा : म्हणे चुकलं आपलं... उगाचच भांडलात तिच्याशी !

जयेश : वहिनी, आमचं हे भांडण तुला नवीन असलं तरी तिला नाही. अग, अगदी बालपणापासून असेच भांडत वाढलो आम्ही—मी वाढलो बाभळीच्या झाडासारखा, ती वाढली जुईच्या वेलीसारखी. पण वहिनी, या झाडांचं किनई एक शास्त्र आहे ! ज्या झाडाच्या संगतीनं वेल वाढते ना, त्या झाडाचे काटे तिला नाही बोचत ! गेली ना ती, जाऊ दे. येईल परत. अग, वासाला सवकलेलं मांजर वासावर परत आलंच पाहिजे !

उमा : हे, हे, हे तुमचं बोलणं. ती सवकलेलं मांजर काय ? जयेश, सर्वस्व वाहून केलेल्या प्रेमाची अशी उपेक्षा करण्यासारखं पाप नाही दुसरं !

जयेश : नाही, वहिनी, मला तिच्या प्रेमाची उपेक्षा नव्हती करायची ! जे घडलं ते रागाच्या भरात चुकून–

उमा : पण चुकून घडलेल्या पापाचंसुद्धा प्रायश्चित्त घ्यावं लागतंच माणसाला...

जयेश : ठीक आहे— कोणतं प्रायश्चित्त घेऊ ? सांग.

उमा : ( हसत ) चांगले व्हा. समंजसपणानं वागा. ( तीव्रपणाने ) तुमच्यावर प्रेम करणाऱ्या माणसांना उगाच दुखवू नका. प्रेम करणारी माणसं अशी

वाटेवर पडलेली नसतात जयेश ...

जयेश : पण वहिनी, वहिनी, तुम्ही माझ्यावर प्रेम का करता ? मी सांगतो का म्हणून ? आधी तुम्ही माझ्यावर प्रेम करता आणि मग मला तुमच्या प्रेमाला लायक बनवायचा प्रयत्न करता, मला बनता येत नाही—मग तुम्हाला वाईट वाटतं. तुम्ही माझ्यासाठी तडफडता, दुःखी होता ! तुमची ती तडफड मला बघवत नाही— मग मी तुम्हालाच दूर लोटण्याचा प्रयत्न करतो. वहिनी, मला कुणाच्याच प्रेमाची गरज नाही—अगदी तुझ्यासुद्धा !

उमा : ठीक आहे— आजपासून एक शब्द बोलू नका माझ्याशी !

(तिच्या डोळ्यांत पाणी येतं— ते पुशीत ती आत जाऊ लागते— तो तिला अडवतो.)

जयेश : थांब, वहिनी, पुन्हा गाढवासारखं बोललो मी— प्लीज, रागावू नको. खरं सांगू वहिनी, तुला रडवण्याचं हे पाप करतोय ना मी, त्याचं प्रायश्चित्त परमेश्वर मला नक्की देईल ! तुझ्या डोळ्यांत हे असं पाणी आलेलं पाहिलं की वाटतं, तुझ्या अश्रुगणिक कुणी तरी कोरडे ओढले पाहिजेत पाठीवर—

(ती अश्रू लपवीत दूर जाते. तो तिच्याजवळ जाऊन तिला हसवायचा प्रयत्न करीत बोलू लागतो—)

पण तेही शक्य नाही आता ! हंटर फेकून दिलास ना घरातला—वहिनी, त्या दिवशी हातात हंटर घेऊन तू माझ्याकडं पाहिलंस ना, तेव्हा असा टरकलो मी ! अगदी चंडिकेसारखी भयंकर दिसत होतीस ! मला वाटलं, आता तू मला झोडपणार ! म्हणजे मार खायची सवय आहे मला— पण मी बावरलो तो तुझ्या हातच्या माराला ! खाल्ला नाही ना अजून—

उमा : (डोळ्यांतील पाणी पुशीत— हसत) तीसुद्धा पाळी आणाल तुम्ही माझ्यावर एखादे दिवशी.

जयेश : छे, ग— तू काय मारणार मला ! आणि एखाद्यावेळी तू मला मारायला आलीस आणि त्या वेळी मला साधी शिंक आली ना, तरी मारायचं जाशील विसरून आणि म्हणशील नेहमीप्रमाणे "शिका—शिका—सर्दी झालीय तर स्वेटर नाही घालवत ?" खरं की नाही ? नाही पण मी म्हणतो ते खरं की नाही ?

[ दोघेही मनसोक्त हसतात— उमेश प्रवेश करतो ]

उमेश : अरे वा, दोघेही अगदी मनापासून हसताय? आज माझी एका गोष्टी-बद्दल खात्री झाली.

उमा : कुठल्या?

उमेश : आपल्या घरातलं हंटरचं राज्य खरोखर संपलं!

जयेश : हां, भैया, तसं समजू नकोस. ही फाडफाड बोलते ना त्यापेक्षा हंटर परवडला.

उमेश : आणि काय ग, हा स्वेटर कुणासाठी विणतेस– माझ्यासाठी वाटतं?

उमा : अं हं! यांच्यासाठी...

उमेश : ( जयेशला ) भाग्यवान आहेस बेट्या! म्हणजे बायको माझी आणि राबतेय तुझ्यासाठी–

उमा : यात राबतेय हो कसली? यांचा स्वेटर जुना झालाय म्हणून नवीन करायला घेतला— तेवढ्यानं लागलं वाटतं पोटात दुखायला?

जयेश : भैया, एका बाबतीतले तुझे उपकार या जन्मी तरी मला फेडता येणार नाहीत.

उमेश : उपकार– माझे तुझ्यावर? कसले?

जयेश : ( भावविवशतेने ) ही अशी देवापेक्षा चांगली वहिनी तू मला दिलीस हे–

उमा : हो तर, कुणाला अगदी खरंच वाटेल. म्हणून तर मघाशी विचारलंत– ( वेडावीत ) काय संबंध आहे तुझ्या– माझ्या—

उमेश : म्हणजे तुलाही असले प्रश्न विचारतो तर हा? मला वाटलं फक्त मलाच विचारतो की काय?

जयेश : ( वरमून ) नाही, म्हणजे वहिनी, तुला स्मरणशक्तीबद्दल पद्मश्री द्यायला हरकत नाही, एकदम तेज आहे—

उमा : आहेच मुळी. आणखी एक पुरावा देऊ का माझ्या स्मरणशक्तीबद्दल?

उमेश : हो, दे की...

उमा : आज तुमच्या परीक्षेचा फॉर्म भरायचा शेवटचा दिवस आहे, महाराज!

जयेश : आयला!

उमा : काय म्हटलंत ?

जयेश : काही नाही. म्हणजे मी अगदी लक्षात ठेवून जी गोष्ट विसरलो होतो, ती तू सुद्धा अगदी लक्षात ठेवून माझ्या लक्षात आणून दिलीस.

उमेश : पण तुझ्या लक्षात आली का ती ? ( सगळे हसतात ) हो, बरी आठवण झाली. सकाळी प्रो. रानडे भेटले होते– चौकशी करीत होते.. तू फॉर्म भरलास की नाही याची. बरंका ग, तू सांगितल्याप्रमाणं टयूशनचं विचारलं त्यांना. त्यांची तयारी आहे. ते म्हणतात की यानं जर लक्षपूर्वक अभ्यास केला, तर फर्स्ट क्लास मिळवील.

जयेश : कुणाला टयूशन– मला ?

उमेश : नाही तर काय मला ?

जयेश : नको त्या गोष्टी तुम्हाला नेमक्या कशा सुचतात रे, भैया ? हे बघ वहिनी, मी फॉर्म भरणार नाही. सांगून ठेवतोय. मी इंटर कॉमर्स या जन्मात पास होणं शक्य नाही.

उमा : का नाही होणार ? उमेश जर फर्स्ट क्लास मिळवू शकतात, मग तुम्हाला का नाही मिळणार ? त्यांचेच भाऊ आहात ना तुम्ही ?

जयेश : हेच ..अगदी हेच...गेल्या खेपेस प्रो. रानडे असंच म्हणत होते. तुला माहीत नाही वहिनी, त्यांनी आणि सुमानं किती मेहनत घेतलीय माझ्यासाठी. सुमाचं अक्षर चांगलं आहे. म्हणून रात्ररात्र जागून तीनतीनशे पानांच्या नोटस् तिने उतरून दिल्या मला– काय झाला याचा फायदा ?

उमा : पण मला खात्री आहे तुमच्याबद्दल—

जयेश : कसली खात्री आहे, कपाळाची ? अग, तसं असतं तर दोन्ही वेळा दांडी कशी उडाली असती आमची ? दोन्ही वेळा अगदी त्रिफळा, अपिलाला-सुद्धा जागा नाही. वहिनी, हे शक्य नाही– एवढं सोडून दुसरं काहीही करायला सांगा. ( उमा त्याच्याकडे पाहात राहते–रडक्या सुरात– ) अग पण मी पास होणार नाही– मला ठाऊक आहे माझी ताकद !

उमेश : जयेश, तुझ्या वहिनीसाठी तू एवढंही करू शकत नाहीस ? पास नापासाचा विचार तू करतोसच कशाला ? अरे, माणसानं कुणावर तरी विश्वास ठेवावा– श्रद्धा ठेवावी. तुझ्या वहिनीवर तुझी श्रद्धा आहे की नाही ?

जयेश : भैया, माणसाला देव भेटतो तो माणसाच्या रूपानं असं म्हणतात, ते

खरं आहे. भैया, मला देव भेटला तो वहिनीच्या रूपानं. तिच्यावर नाही ठेवायची मी श्रद्धा, तर कुणावर ठेवायची ?

उमेश : किती श्रद्धा आहे रे तुझी तिच्यावर !

जयेश : कसं सांगू तुला ? गणपतीनं गाईला प्रदक्षिणा घालून पृथ्वीप्रदक्षिणेचं पुण्य मिळवलं. मला जर कुणी पृथ्वीप्रदक्षिणा घालायला सांगितली तर, भैया, मी वहिनीला प्रदक्षिणा घालीन आणि बेधडक सांगेन, झाली माझी पृथ्वीप्रदक्षिणा !

उमा : अहाहा ! दिवे ओवाळा. मी तुम्हाला पृथ्वीप्रदक्षिणा घालायला नाही सांगत– फॉर्म भरायला सांगते इंटर कॉमर्सचा. ते नाही होत.

जयेश : अग पण—

उमा : हे बघा, पण बीण काही नाही. तुम्ही जर फॉर्म भरणार नसाल तर उद्यापासून तुमचा माझा संबंध संपला. समजलं ?

जयेश : ( चिडून ) समजलं ! ( थोड्या वेळाने ) वहिनी, मी फॉर्म आजच का—आत्ता भरायला तयार आहे—आत्ता—अभ्यास कोण करणार ?

उमा : तुम्हीच– मी सांगेन तसा. प्रो. रानडे उद्यापासून ट्यूशनला येणार आहेत. मी तुम्हाला पहाटे उठवीन– पाहिजे तर मीही जागेन तुमच्याबरोबर. पण या वर्षी तुम्ही ही परीक्षा पास झालंच पाहिजे—समजलं ? झालंच पाहिजे. काय हो, सगळं जग तुम्हाला नालायक म्हणतं याची लाज वाटत नाही तुम्हाला ? ती एवढीशी पोरगी माझ्यादेखत तुम्हाला नालायक ठरवून गेली. लाजेनं मान खाली झाली माझी– तुमची नाही. उद्यापासून परीक्षा होईपर्यंत घराबाहेर पाय टाकायचा नाही, समजलं ?

जयेश : अग पण.. माझं हे एक का लफडं आहे ? त्या हुसेनच्या आईवर केस केलीय पोलिसांनी—खोटी ! सगळं दैवच फिरलंय माझं. तू मला कुठंकुठं सांभाळणार, वहिनी— माझा नाद सोड...नापास होईन मी आणि अपयशी ठरशील तू. वहिनी, हे माझं युद्ध आहे– ते मला एकट्यालाच लढलं पाहिजे.

उमा : जयेश, तुमचं युद्ध तुम्ही एकट्यानं लढू नका . मी आहे, उमेश आहेत– आपण सगळ्यांनी मिळून लढू या ते ! तुमचं युद्ध तेच आमचं युद्ध !

जयेश : ( भडकून ) वहिनी, बोलणं सोपं असतं. माझं युद्ध तुमचं कसं होणार ?

माझ्या भावना– माझं प्रेम– तुमचं कसं होणार ? त्या हुसेनच्या आईसाठी जीव गहाण टाकायला निघालो तरी कुणी पाच हजार रुपये देईना. आजच्या इतकी जन्माला आल्याबद्दल लाज, खंत कधी वाटली नव्हती मला ! काय या कवडी किमतीच्या जिण्याचा उपयोग ? जिनं मला माया दिली– माणुसकी दिली– अग, मी जो जिवंत आहे तो तिच्यामुळं– आणि तिला अशा प्रसंगी माझा काही उपयोग होऊ नये ? कशाला जगायचं मी– सांग ? कशाला ? हा वाडा, हे वैभव, काय चाटायचं आहे ? कमिशनरचा मुलगा ! अग, एखाद्या हातभट्टीवाल्याचा पोर झालो असतो तर पाच हजार अस्से उभे केले असते—

उमा : अहो पण ...

जयेश : काही सांगू नको वहिनी, गुन्हेगाराला शिक्षा व्हायला हवी. अपराध्याला शासन मिळालं पाहिजे– हे असलं काही तत्त्वज्ञान सांगणार ना तू मला ? ते ऐकून माझं ओझं कमी होणार नाही. पावाच्या दुकानावर बसावं लागणाऱ्या बाईला पाप करावंच लागलं, तर ते का करावं लागतं ते तुम्हा बंगलेवाल्यांना कधीच कळणार नाही ! ( आवेगाने ) नाही— वहिनी, नाही– तुम्ही मला कधीच ओळखू शकणार नाही— तुमच्यात ती ताकद नाही. माझी माणसं तुमची माणसं नाहीत— मग माझं युद्ध तुमचं युद्ध कसं होणार– सांग, कसं होणार ?

उमा : बोलू नका—जयेश—जरा थांबा.

जयेश : कशाला थांबू— तुमचं ढोंगी तत्त्वज्ञान ऐकायला ? देताय पाच हजार रुपये ? भरताय तिचा जामीन ? घाला पडलाय तिच्या अब्रूवर— वाचवताय तिला ? म्हणे तुमचं युद्ध ते आमचं युद्ध ! हे बघ, काळीज हातावर घेऊन उभा आहे मी बाजारात— लिलाव पुकारलाय काळजाचा —भरतेय त्याची किंमत पाच हजार रुपये ? नाही भरत ? नाही भरत ?

उमा : ( डोळ्यांत पाणी आणून ) बोलू नका जयेश, माझं ऐकून घ्या आधी—

[ गोविंदराव प्रवेश करतात. ]

गोविंद : वहिनी, समजली का बातमी ?

उमा : कसली बातमी ?

गोविंद : हुसेनच्या आईला पाच हजार रुपये भरणारा जामीन मिळाला.

जयेश : ( अत्यानंदाने ) होय—कुणी भरले पैसे ?

गोविंद : ( हात जोडून ) धन्य आहे महाराज तुमची. म्हणजे सगळा गाव बोलतोय की कमिशनर सरनाइकांच्या मुलानं जामीन दिला म्हणून. आणि तूच मला विचारतोस, की कुणी भरले पैसे ? उलट मीच तुला विचारतो, की एवढे पैसे तुझ्याजवळ आले कुठून ?

जयेश : काका, काय वाटेल ते आळ घेऊ नका माझ्यावर.

गोविंद : घ्या, म्हणजे मीच आळ घेतोय ? चोराच्या उलट्या म्हणतात त्या अशा ! म्हणजे तू पैसे भरले नाहीस ?

उमेश : काका, प्रत्येक बाबतीतील तुमची ही बिसाडघाई कधी तरी गोत्यात आणील कुणाला तरी. सरनाइकांच्या मुलानं पैसे भरले ही गोष्ट खरी आहे, पण ते या मुलानं नाही— ( स्वतःकडे बोट दाखवीत ) या मुलानं !

जयेश : काय ? भैया, तू भरलास जामीन ?

उमेश : हो. अरे राणीसरकारांचा फोन आला की आज तुझा फॉर्म भरायचा शेवटचा दिवस आहे. तेव्हा काहीही झालं तरी जामीन भरून टाका— जामीन भरल्याशिवाय तुझं अभ्यासात लक्ष लागणार नाही—तेव्हा भरून टाकला जामीन.

जयेश : ( एकदम ढसढसा रडत ) भैया— तू भरलास जामीन ? वहिनी— तू सांगितलंस ? अरे, देवमाणसं तुम्ही— तुमच्यात हा करंटा, कसा जन्माला आला ? कसा जन्माला आला ?

( मुक्त कंठाने रडतो— नंतर थांबतो. उमाच्या पदराने डोळे पुसतो आणि हसत म्हणतो. )

वहिनी, वहिनी— नाही त्या इंटर कॉमर्सचा काटा काढला या वर्षी, तर वहिनी म्हणून हाक मारणार नाही पुन्हा !

( वेगाने निघून जातो—गोविंदराव दिङ्मूढ होऊन पाहात राहतात. )

प ड दा

## अंक तिसरा

### दृश्य पहिले

[ स्थळ : साहेबांचा हॉल. चार-पाच महिन्यांनंतरचा काळ. उमा आणि उमेश बाहेरून प्रवेश करतात. उमेश खेळण्याच्या पोशाखात. पांढरी फुल-पॅंट, पांढरा टी शर्ट—हातात रॅकेट. उमा पूजेहून हातात प्रसादाचा नारळ व रिकामे ताम्हन घेऊन प्रवेश करते. ]

उमा : आज पूजा अगदी मनासारखी करता आली. पुरे झालं हो तुमचं मौनव्रत ! सबंध रस्ताभर अक्षर नाही बोललात. ( उमेश स्तब्ध ) काय हो– असं काय करता ? इतकं रागवायचं काहीच कारण नाही हं !

उमेश : हे बघ, असं हातात ताट घेऊन बोलू नको. बरंच बोलायचं आहे तुझ्याजवळ. आत ठेवून ये ते ताट.

उमा : तुम्ही बोलणार असाल तर इथंच ठेवते ताट.

उमेश : ( खोट्या रागाने ) इथं नको– आत ने.

उमा : बरं बाई, आत ठेवून येते. ( आत जाऊ लागते )

उमेश : आणि हे बघ, नेहमीसारखा उगाच वेळ काढू नको. फार महत्त्वाचं

बोलायचं आहे मला–समजलं ?

उमा : ( खोट्या नम्रतेने ) होय सरकार– समजलं ! ( गालात हसत आत जाते. )

उमेश : ( थोडा वेळ वाट पाहून ) काय गऽऽ ! ताट ठेवायला इतका वेळ लागतो ? ऐकायला येतंय की कान फुटले ?

उमा : ( घाईघाईने प्रवेश करून ) ओरडू नका उगाच. तुमच्या या ओरडण्यानं मात्र खरोखरच कान फुटतील माझे.

उमेश : उभी राहा अशी.

( तिच्याकडे पाठ फिरवून रुबाबात ) गेले पाच महिने तू माझे हाल चालवले आहेस. पाच महिन्यांत एकही पिक्चर पाहिलं नाही आपण. ( आत जाते– ते त्याला कळत नाही. )

तीन महिने गेले जयेशच्या परीक्षेत आणि नंतरचे दोन महिने गेले त्याच्या आजारीपणात. या पाच महिन्यांत नवऱ्यासाठी काय केलंस तू ? बोल– काय केलंस ? अग, बोल ना —( वळतो ) पाच महिने गेले तसे– आता स्वतः आजारी पडून आणखी पाच महिने आम्हाला पुन्हा वाळीत टाकायचा विचार दिसतोय ! म्हणजे सगळं वर्ष फुकट ! कसला गृहस्थाश्रम पार पाडायचा आम्ही —कर्माचा ?

उमा : अहो, काही तुमच्या जिभेला हाड आहे की नाही ?

उमेश : मला नाही माहीत, मला कुठं कुठं हाडं आहेत ती ? गेले दोन दिवस अन्नाला शिवली नाहीस तू ! आजही संध्याकाळपर्यंत हा दीर्घ उपास चालू राहणार तुझा ! कसली मूर्खासारखी व्रतं करतेस, कळत नाही. अन्न बंद केलंस तरी बाकीची कामं चालूच आहेत. काल संध्याकाळी तुला चक्कर आली. तरी आज उपास चालू ? मी म्हणतो, तू हे काय मांडलंयस ?

उमा : अहो–पण–

उमेश : ( भडकून ) आज काही ऐकणार नाही मी तुझं ! माणसानं दुसऱ्याचं ऐकावं जरा. ते नाही. स्वतःला मोठी शहाणी समजतेस. जे तुला बरोबर वाटेल तेच बरोबर ! बाकी सगळे सांगणारे गाढव ! पण तुला सांगून ठेवतो, एक दिवस तुझा हा अतिशहाणपणा असा अंगाशी येईल तुझ्या ! उपास करतेय ! ( त्याचं भडकणं पाहून तिला हसू येतं ) हसा–हसा ! हसता हसता एक दिवस दात पडतील तेव्हा समजेल !

उमा : ( हसणं आवरीत ) अहो ! ( तो पाहात नाही ) ( त्याच्याजवळ जात )- अहो, असं रागावता काय ? प्लीज ! जयेशचा टायफाइड किती लांबला पाहिलंत ना ? आज छपन्नावा दिवस ! म्हणून शंकराला साकडं घातलं होतं तीन दिवस, दिगंबरशास्त्र्यांनी !

उमेश : हे बघ, त्या दिगंबरशास्त्र्याला नाही धंदा. तो उद्या तुला, मलासुद्धा पाण्यात बुडवायला सांगेल तीन दिवस. अग बी. ए. झाली आहेस तू, जरा विचार करून वाग.

उमा : काय अविचार केलाय हो मी आत्तापर्यंत ? सांगता का जरा ?

उमेश : का ? त्या हुसेनच्या आईला नाही म्हटलं तरी साडेतीन हजार रुपये दिलेस आजपर्यंत.

उमा : अहो, चांगल्या कामासाठीच झाले ना खर्च ते ? त्यांचा जामीन भरला- चांगला वकील दिला आपण त्यांच्यासाठी, म्हणून केस काढून टाकली ना मॅजिस्ट्रेटनं ! काय वाईट झालं त्यात ? त्यांचं दुकान सावरलं आपल्या कर्जानं !

उमेश : कर्जानं ? वाट बघ- एक पैसा परत नाही मिळायचा !

उमा : आपला जयेश परत मिळाला ना- झालं तर. पैशाचं काय- मिळतील आज ना उद्या !

उमेश : तसंच त्या दिगंबरशास्त्र्याला- जवळजवळ ४०० रुपये दिलेस. अजून दक्षिणा बाकी आहेच.

उमा : का हो- एवढे मारवाडी कधीपासून झालात ?

उमेश : उद्या साहेबांनी हिशेब विचारला, तर सरळ तुझ्याकडे बोट दाखवीन- सांगून ठेवतोय !

उमा : त्यांना सांगूनच तर सगळं चाललंय हे !

उमेश : अग, पण डॉक्टरांची ट्रीटमेंट चालू असताना ही आणखी दिगंबरशास्त्र्यांची ट्रीटमेंट कशाला ?

उमा : अहो, पण डॉक्टरच म्हणाले होते की आज ताप नाही उतरला, तर आणखी सात दिवस थांबावं लागेल ! म्हणून मग दिगंबरशास्त्री म्हणत होते ते करून पाहिलं ! पण तुम्हीच सांगा- आज ताप उतरला ना जयेशचा ?

उमेश : हो, त्याचा उतरला तो आता तुला चढेल ! अग, गेले पाच महिने तुला धड झोप नाही- धड खातपीत नाहीस. फक्त त्याच्या परीक्षेची काळजी

केलीस. त्यात हे उपास करतेस अधूनमधून– बावळटासारखे! उद्या तुला काही झालं, तर त्या दिगंबरशास्त्र्यांचं काय जातंय त्यात? दिगंबरच तो! त्याला ना बायको ना संसार! पण आपल्याला नाही हे परवडायचं– सांगून ठेवतोय!

उमा : घ्या. म्हणजे तुमच्या भावासाठी केलं मी हे सगळं, आणि वर तुम्ही मला बोलता?

उमेश : उपकार नाही केलेत– त्याला आजारी पण आपणच पाडलात. गेल्या तीन वर्षांत केला नसेल एवढा अभ्यास तीन महिन्यांत करून घेतलास त्याच्या-कडून. मग विचारा आजारी नाही पडेल तर काय होईल?

उमा : मी नाही करून घेतला– त्यांनीच केला! तुमचेच भाऊ ना? 'विश्रांती घ्या जरा' म्हटलं, की ओरडायला सुरुवात, 'मला पुन्हा नापास करायचाय?' नको, नको, म्हटलं तरी जाग्रणं केली– एक, एक वाजेपर्यंत!

उमेश : आणि तुमचं टाइम टेबल पहाटे तीनला सुरू व्हायचं ते? दररोज त्याला तीनदा उठवायचीस; पण तो एकला झोपला की दोनला हे विचारलंस कधी?

उमा : ( चिडून ) अहो, पण याचा तुम्हाला काय त्रास झाला?

उमेश : का? दररोज गजर लावायचीस तीनचा. पण कधी बंद केल्याचं आठवतंय? गजर सुरू झाला रे झाला की स्वयंपाकघरात धावायचीस–चहा करायला! आणि मला मात्र झक मारीत उठावं लागायच दररोज–तीन वाजता. कशाला? फक्त गजर बंद करायला! ( उमा त्याचं बोलणं चालू असताना मनसोक्त हसते ) हसतेस काय?

उमा : वा! म्हणजे तुम्ही हसण्यासारखं बोलता आणि आम्ही हसायचं नाही?

उमेश : नाऽऽही! आज उपासाचा तिसरा दिवस आहे तुझा. हसता हसता तुला चक्कर आली, तर रडायची पाळी येईल माझ्यावर!

उमा : काही कोणी रडणार नाही. मी मेले तर दुसरी बायको मिळेल तुम्हांला–

उमेश : अग पण तुझ्याइतकी चांगली नाही मिळणार.

उमा : खरंच?

[ जयेश हळू हळू जिन्याच्या आधाराने खाली उतरला आहे हे कुणाच्याच लक्षात येत नाही. तो अत्यंत थकलेला दिसतोय.

जिन्याच्या मधल्या पायरीवर तो उभा आहे. त्याच्या अंगात उमाने विणलेला स्वेटर आहे. ]

उमेश : अगदी खरं, तुझ्यासारखी बायको मला, तुझ्यासारखी सून या घराला—

जयेश : ( पुढे येत– ) आणि तुझ्यासारखी वहिनी मला पुन्हा कधीही मिळणार नाही, खरं ना भैया ?

उमा : सगळं ठीक आहे तोपर्यंत सगळेच करतात कौतुक. उद्या काही कमी जास्त घडलं माझ्या हातून, तर सगळेजण खायला उठाल मला.

जयेश : छे, छे, वहिनी– मी नाही हं उठणार...

उमा : तुम्ही ? तुम्ही तर माझा जीव घ्यायलाच उठाल. एक नंबरचे कृतघ्न तुम्ही !

जयेश : आता नेहमीप्रमाणे शिव्या दे तू– पण वहिनी, तुझं काही चुकलंच तर एक वेळ मी माझ्या जिवावर उठेन, पण तुझ्या नाही.

उमेश : पण मी म्हणतो, कुणीच, कुणाच्या जिवावर नाही उठलं तर काय हरकत आहे ? ( सगळे हसतात ) बरं, जयेश, कसं वाटतंय तुला आज ?

जयेश : कालपासून फ्रेश वाटतंय– पण आत्ता जरा चाललो ना तेव्हा जरा थकल्या-सारखं झालं.

उमा : ( त्याला धरून कोचावर बसवीत ) अहो, पण तुम्हाला सांगितलं होतं कुणी इथं यायला ? ( जयेश धापा टाकतो. )

उमेश : ( त्याची मान आपल्या टॉवेलने पुशीत ) हे बघ जयेश, हा टायफाइड फार वाईट असतो. एकदा उलटला ना, की कमीत कमी सात दिवसांची राखणी लागते. अग, त्याला काही चहा, कॉफी...

उमा : तुम्ही नको काळजी करायला. कॉफी, सूप, सगळं झालंय.

उमेश : मी नको काळजी करू– नाही करीत ! खरं म्हणजे मला हल्ली तुझी काळजी वाटायला लागलीय. कारण हा आजारी पडल्यापासून तुझ्या याच्या-वरच्या प्रेमाचं टेंपरेचर वाढत्या प्रमाणावर आहे.

उमा : ( मिस्किलपणे ) का ? लागलं पोटात दुखायला ?

उमेश : माझ्या नाही पोटात दुखत. कारण न पचणाऱ्या गोष्टी मी कधी खात नाही. तुम्हीच सांभाळा... अती झालं की तिथं माती होते.

उमा : ( वेडावीत ) अटी झालं की टिटे माटी होटे ! होऊ दे. तशी माटी

झाली की तुम्हाला बोलवू आम्ही–तिथं शोण करायला.

उमेश : बरं, आम्हाला बोलवलंत तर आम्ही येऊ–शोण करायला! (सगळे हसतात) आंबोळीला पाणी काढलंयस?

उमा : हो–(तो जाऊ लागतो)–अहो—

उमेश : हो–हो–तेवढा गीझर सुरू करतो. आणि कपाटातून टॉवेल घेतो. बाकीची तयारी आहेच–बाकीची म्हणजे बाथरूम, साबण, लोटा आणि मी–

[ ते हसत असताना साहेब बाहेरून हसत प्रवेश करतात—]

साहेब : अरे, किती त्रास द्याल त्या एकट्या पोरीला? जयेशचं करण्यात तुझ्याकडं थोडं दुर्लक्ष होत असेल तिचं! तेवढं नको सांभाळून घ्यायला आपण?

[ उमेश तिच्याकडे पाहात पुटपुटत जातो– ती 'बरं झालं' अशा अर्थी त्याला साहेबांच्या नकळत खुणा करते. ]

साहेब : जयेश, बेटा, कसं वाटतंय आज? (तो उभा राह्यचा प्रयत्न करतो) अरे, बस, बस. बरं वाटतंय ना आज?

उमा : बरं वाटतंय म्हणून इथं आले आहेत. ताप उतरलाय ना आज!

साहेब : येऊ दे ग. सारखं पडून राहवत नाही माणसाला—

उमा : पण डॉक्टरांनी हलू नका सांगितलंय–

साहेब : (हसत) डॉक्टरांचं इतकं शब्दशः ऐकायचं नसतं. त्या एकाच खोलीत किती दिवस काढलेत त्यानं.

जयेश : खरंच, वहिनी, किती दिवस आजारी होतो ग मी?

उमा : चांगले छप्पन दिवस! शेवटच्या पेपराला ताप घेऊन आलात तो आज उतरतोय!

जयेश : मधे केव्हा तरी उतरला होता ना?

उमा : उतरला होता–पंधरा दिवसांपूर्वी! पण एकच दिवस! त्या दिवशी नको नको म्हणत असताना गप्पा मारल्या– आणि दुसऱ्या दिवसापासून आजपर्यंत ताप आहेच! ९९°—१००°

जयेश : हॅ! ९९°, १००° म्हणजे काहीच नाही, वहिनी.

उमा : अहो, टेंपरेचर कमी होतं म्हणून आज इतके तरी फ्रेश दिसताय. खरं

म्हणजे ५६ दिवसांचा आजार झाला नसेल कुणाला कधी.

जयेश : माझं सगळं पलीकडचं असतं वहिनी. अलीकडचं काहीच नाही! आता आजारी पडलो ना, तोसुद्धा कचकून! उगाच त्या टायफाइडला वाईट वाटायला नको. (बोलताना दम लागतो)

उमा : बरं...बरं...जास्त बोलू नका आता– तुम्हाला दमायला होतंय...

जयेश : साहेब, ही मला बोलू सुद्धा देत नाही.

साहेब : अरे, आजच उतरलाय ना तुझा ताप? मग जरा दोन दिवस जपायला पाहिजे. जरा कमी बोललास वहिनीच्या सांगण्याप्रमाणं तर चालेल.

जयेश : हे सगळं तिच्या सांगण्यावरूनच झालंय, साहेब.

उमा : हो, तुम्हाला आजारी मी पाडलं. मघाशी म्हटलं काय, एक नंबरचे कृतघ्न आहात. काही वाईट झालं की त्याचं खापर वहिनीच्या डोक्यावर फोडायचं— नेहमीचीच सवय!

जयेश : आणि चांगलं झालं तर क्रेडीटही देतो तुला. आता समजा, मी पास झालो—(एकदम आठवून) वहिनी, वहिनी, आज तारीख किती?

उमा : बावीस...

जयेश : आणि हा महिना कोणता?

उमा : मे– का?

जयेश : २२ मे! म्हणजे आज माझ्या निकालाचा दिवस. वहिनी, दर वर्षी हा दिवस जसजसा जवळ यायचा तसतसा मी नर्व्हस व्हायचा– पण या वर्षी हा दिवस कधी आला ते कळलंच नाही मला.

उमा : तुम्ही आजारी होतात ना—म्हणून नाही कळलं.

जयेश : म्हणजे याचंही क्रेडीट परत तुलाच– मला आजारी पाडलंस तूच ना?

उमा : मी आजारी पाडलं? अशी ठेवून देईन एक आता—(साहेब व जयेश हसतात. उमा लाजेने कावरीबावरी होते.)

साहेब : जयेश, अरे अशी वहिनी मिळायची नाही कुणाला. तिचं तुझ्यावरचं हे प्रेम पाहिलं ना की भीती वाटते—

उमा : भीती? कसली?

साहेब : (जगातल्या सगळ्या श्रेष्ठ सौंदर्याला दुःखाच्या आर्ततेची एक किनार आहे. सौंदर्याला शापच आहे तो. प्रत्येक सुंदर वस्तूच्या अंतरंगात शोकाचा,

दुःखाचा एक हळवा उमाळा दाटून राहिलेला असतो. जगाला फक्त सौंदर्य दिसतं—त्या सौंदर्यानं किती सहन केलं ते नाही दिसत. मला वाटतं हा शाप सिद्ध करण्यासाठीच जेव्हा मुमताज गवसली तेव्हा नाही बांधला ताज-महाल शहाजहाननं ! जेव्हा ती त्याला कायमची अंतरली तेव्हा बांधला. तुमच्या या सुंदर प्रेमालासुद्धा या परखड दुःखाच्या आवर्तातून कधी ना कधी जावंच लागेल. त्या क्षणी एकमेकांना सांभाळणं फार कठीण—फार कठीण !
( टेलिफोनची घंटा वाजते– साहेब फोन घेतात. )

साहेब : हॅलो, कोण प्रो. रानडे ? गुड मॉर्निंग. ( आनंदून ) पेढे—कसले ? पास झाला ? काय म्हणता काय ? आर यू शुअर ? पार्टी ना— जरूर— जरूर ! आहे ! थँक्स् ! थँक यू व्हेरी मच ! ( फोन ठेवीत ) जयेश, बेटा रानड्यांचा फोन होता–तू—तू पास झालास इंटर कॉमर्स ! कॉंग्रॅट्स्, हार्टी कॉंग्रॅट्स् !

उमा : ( अत्यानंदाने ) जयेश, तुम्ही पास झालात ! ( डोळे मिटून —थरथरत्या सुरात —) परमेश्वरा, हे सहन करण्याची ताकद दे रे मला—( तिच्या डोळ्यांत पाणी तरळते. )

जयेश : ( भावनावेगाने थरथरत–उभा राहत– ) मी—नाही वहिनी—मी नाही पास झालो– वहिनी– तू पास झाली आहेस इंटर कामर्सला– ( तिच्या पायावर कोसळतो. )

उमा : ( जयेशला उठवीत ) उठा जयेश– हे काय वेड्यासारखं ? त्रास होईल तुम्हांला– शांत व्हा पाहू !

जयेश : ( थरथरत उठतो– साहेबांना नमस्कार करून ) साहेब, एक विचारू साहेब ? आता तुम्हाला मला तुमचा मुलगा म्हणवून घेण्याची लाज नाही ना वाटत ?

साहेब : ( गद्‌गदलेल्या सुरात– त्याला मिठी मारून ) नाही– बेटा आज—आज फार अभिमान वाटतोय तुझा– आज तुझी आई असती, तर आनंदानं तिला आकाश ठेंगणं झालं असतं !

जयेश : साहेब, आई, नाही– पण वहिनी आहे. तिला आकाश नक्कीच ठेंगणं वाटतंय आज. वहिनी, वहिनी, तुझे हे उपकार फेडायला शंभर जन्म घ्यावे लागतील ग मला... शंभर जन्म घ्यावे लागतील !

उमा : जयेश, तुम्हीच म्हणत होता ना--' नापास होईन मी, आणि अपयशी ठरशील तू ! '-जयेश, आज एवढं यश पदरात टाकून तुम्हीच माझ्यावर उपकाराचं ओझं करून ठेवलंय- इतकं यश या जन्मी तरी मला पुन्हा मिळवता येणार नाही.

जयेश : का नाही येणार ? तुझ्या हाताला गुण आहे- वहिनी, तुझ्या हाताला गुण आहे ! तुझा हात परीस आहे परीस ! हात लावशील त्याचं सोनं करशील- या दगडाला लावलास आणि सोनं केलंस माझ्या जन्माचं...सोनं केलंस माझ्या जन्माचं !

उमा : जयेश, जास्त बोलू नका— आजच ताप उतरलाय तुमचा—

जयेश : आता कसलीच पर्वा नाही मला— तुझी लाज राखली, तुझी शान राखली- बस्स. जे मिळवायचं ते मिळवलं- आता मेलो तरी बेहत्तर !

उमा : जयेश... ( गोविंदराव वर्तमानपत्र घेऊन येतात. )

गोविंद : सूनबाई, अहो, वाचलंत का पेपरात ? आपला जयेश पास झाला. साहेब, मी पेपरात बघितलं— ते नंबर आधी एवढेएवढेसे— धड दिसेनात —म्हणून डोळे चोळून चोळून पुन्हा पुन्हा पाहिलं— तरी याचा नंबर आपला आहेच !

[ जयेश वहिनीच्या समोर उभा राहतो— पेपरची मागील बाजू त्याच्या समोर येते. मागच्या पानावर अरविंद घोरपडे व सुषमा मोहिते यांचे फोटो छापलेले आहे— ]

जयेश : ( एकदम वर्तमानपत्रावर झडप घालीत-) वहिनी, हे काय ? ( वाचीत ) अरविंद घोरपडे यांचं जर्मनीहून आगमन ? अरविंद घोरपडे व त्यांच्या नियोजित वधू- सुषमा मोहिते ? ( ओरडून ) वहिनी, सुमाचं लग्न ठरलं ? ( तिचा दंड धरून ) वहिनी, खरं आहे हे ?- खरं आहे ? ( वहिनी होकारार्थी मान हलवते ) मग मला का नाही सांगितलंस- का नाही सांगितलंस ?

उमा : ओरडू नका जयेश— तुम्ही आजारी होतात- तुम्हाला त्रास झाला असता ते समजून--

जयेश : वहिनी-- मला मारून टाका-- मारून टाका एकदाचा ! ( धापा टाकीत ) कुणी केलं हे--सांग-वहिनी, हे कुणी केलं ? ( वहिनीची नजर

नकळत साहेबांकडे वळते ) साहेब– तुम्ही ? साहेब, आजपर्यंत चाबकानं बडवलंत त्याचं काही नाही- पण– साहेब, बाप होऊन असा काळजावर घाव का घातलात माझ्या– का– का– ( वेड्यासारखा ) मला माहीत आहे– मला माहीत आहे– मी जन्माला येऊन तुम्हाला आईपासून वेगळं केलं त्याचा असा सूड घेतलात तुम्ही–– सूड घेतलात माझ्यावर ! ( साहेब, ' जयेश, बेटा काय बोललास ? ' म्हणत कोसळतात. )

जयेश : मी त्याचा खून करीन– सुमा– सुमा–

[ त्याला घेरी येते– वहिनी त्याला सावरते. अंधार– दृश्य पहिले संपते ]

## दृश्य दुसरे

[ स्थळ : साहेबांचा हॉल— त्याच दिवसाची संध्याकाळ. कोपऱ्यात गोविंदराव चोरासारखे उभे आहेत. उमेश त्यांच्यावर संतापून बोलत आहे. ]

उमेश : तरी मी तुम्हाला नेहमी म्हणतो, की प्रत्येक गोष्टीची घाई करू नका. कधी तरी ही घाई कुणाला तरी खड्डयात घालील. आणि आज आम्ही सगळेच खड्डयात पडायची पाळी आणलीत तुम्ही.

गोविंद : आता उमेशभैया, उगाच माझ्यावर संतापू नको. मी काही मुद्दाम केलं का ? दादासाहेब म्हणाले अरविंदचा फोटो छापायला द्या. मी विचार केला, सगळं काही ठरल्यासारखं आहे तेव्हा एकाबरोबर दोन्ही आनंदाच्या बातम्या एकदमच येतील पेपरात— नाही तरी आमच्या सुमाचा फोटो कधी येणार पेपरात ?

उमेश : काय ठरल्यासारखं आहे ?

गोविंद : भैय्या, अरे सगळं मीच तर केलंय पहिल्यापासून. दोघांच्या कुंडल्या जमल्या. साहेबांनी पुढाकार घेऊन घोरपड्यांना पत्रसुद्धा पाठवलं, देण्याघेण्याची बोलणी करू या, असं. घोरपड्यांचं उत्तरसुद्धा आलं— आता काय बाकी राहिलंय ?

उमेश : का ? सुमानं स्पष्ट संमती दिलीय ?

गोविंद : तिचा प्रश्न साहेबांनी मागंच सोडवलाय. खुद्द दादासाहेब सांगत होते- तिची संमती आहे म्हणून—

उमेश : काय सांगत होते दादासाहेब, तिनं स्पष्ट संमती दिलीय म्हणून? मग बडोद्याला मावशीकडे कशाला जाऊन बसलीय ती?

गोविंद : नाही— म्हणजे तिनं अजून तसा होकार नाही दिलाय—

उमेश : होकार दिलेला नाही नव्हे; चार दिवस शांतपणे विचार करून उत्तर देते, असं सांगून गेली त्याला आज दोन महिने झाले. खरं की नाही?

गोविंद : उमेशभैय्या, ते खरं- पण तिनं जाताना स्पष्ट नकार तरी कुठं दिला होता?

उमेश : पण म्हणून ती एकदम अरविंदची 'नियोजित वधू' झाली?

गोविंद : हां- हां- भैया, ते शब्द माझे नाहीत; ती त्या पेपरवाल्याची अक्कल!

उमेश : उगाच आता नामानिराळे राह्यचा प्रयत्न करू नका. पहिली गोष्ट म्हणजे सुमाचा फोटो छापायला द्यायचं तुम्हाला काहीच कारण नव्हतं. आणि द्यायचा, तर आम्हांला, निदान दादासाहेबांना तरी विचारायला नको होतं तुम्ही?

गोविंद : हां, एवढं बाकी चुकलंच. (उमेश खिडकीतून बाहेर बघत उभा राहतो. त्याच्याजवळ जात) नाही, म्हणजे करायला गेलो एक आणि झालं भलतंच. तोंडांत मारून घ्यायची पाळी आली. (भीत भीत) पण उमेशभैया, कसं आहे जयेशचं आता?

उमेश : (भडकून) कालपासून १०४° टेंपरेचर आहे- म्हणे जयेशचं कसं आहे-

गोविंद : आणि साहेब...

उमेश : काल स्वतःच्या डोळ्यांनी पाहिलीत ना त्यांची तब्येत- लाज नाही वाटत विचारायला?

गोविंद : (क्षणभराच्या शांततेनंतर) छे, छे, छे! म्हणजे अगदीच गाढवपणा झाला माझ्या हातून. हे भलतंच झालं!

उमेश : गाढवपणा? महामूर्खपणा केलाय तुम्ही. आणि आता तो आम्हांला निस्तरावा लागणार. (साहेब सावकाश- जिन्यावरून उतरतात. धोतर, मलमलचा सदरा- खूप थकल्यासारखे)

साहेब : त्यांच्यावर कशाला रागावतोस उमेश? जे होणार ते होतंच असतं.

अरे, ढासळणारे बुरूज ढासळतात आणि त्यांच्या तळाशी वारूळ करणाऱ्या गोविंदकाकासारख्या कीडमुंग्या निमित्तमात्र ठरतात. जे नशिबात आहे ते भोगलंच पाहिजे– जे पाहावं लागेल ते पाहिलं पाहिजे. ( थोडा वेळ चमत्कारिक शांतता )—का—

गोविंद : काय, साहेब ?

साहेब : तुम्ही उभे का आता इथे– ( गोविंदराव घाईने जातात ) ( सुस्कारा सोडीत ) जय हरी– करुणेश्वरा– दयाघना– पांडुरंगा– जगच्चालका– ( कोचावर बसतात. )

उमेश : ( साहेबांच्याजवळ जात ) साहेब, तुम्हीच असा धीर सोडून कसं चालेल?

साहेब : धीर अजून सोडला नाही उमेश, पण सकाळच्या प्रकारानंतर धीर थोडा खचलाय—

उमेश : साहेब, रागाच्या भरात बोलला जयेश; ते मनाला लावून का घेता ?

साहेब : खरं आहे तुझं म्हणणं ! रागाच्या भरात बोलला– दोनच शब्द बोलला ! पण दोन शब्दांत पुष्कळ काही बोलून गेला.

उमेश : साहेब, तुमच्या जिव्हारी घाव पडण्यासारखं बोलला तो—पण—

साहेब : नाही, उमेश, त्याच्या शब्दांनी माझ्या जिव्हारी घाव नाही घातला, त्याच्या जिव्हारी पडलेला घाव मला दाखवला. मी खचलो तो माझ्यासाठी नाही- त्याच्यासाठी !

उमेश : पण साहेब, असं खचून कसं चालेल ?

साहेब : स्वतःच्या मूर्खपणाचं विराट दर्शन आयुष्याच्या उतरणीवर माणसाला झालं, तर माणसाचं मन खचणार नाही ? अरे, किती झालं तरी माणूस आहे मी ! सूर्यप्रकाशात दिमाखानं चमचमणारं हिमशिखर बर्फ वितळलं की उघडं पडतं ! त्याच्या डोक्यावरची माती त्याची त्यालाच दिसू लागते. आणि इतर सामान्य टेकड्यांप्रमाणे आपणही एक टेकडीच आहोत हे त्याला कळून चुकतं ! थोडी उंचावरची टेकडी– पण म्हणूनच हिमशिखराचा आभास— आणि शेवटी भ्रमनिरास ! आयुष्याची ही घोर शोकांतिका त्याची त्यालाच सहन करावी लागते– त्याची त्यालाच जगावी लागते— भोगावी लागते ! ( जयेशच्या बाजूच्या जिन्यावरून डॉक्टर व मागोमाग उमा हॉलमध्ये येतात. )

साहेब : डॉक्टर, कशी आहे प्रकृती त्याची ?

डॉक्टर : अजून ताप आहे– आणि— ( अडखळतात )

साहेब : काय डॉक्टर– आणि काय ? अडखळू नका. स्पष्ट सांगा काय ते—

डॉक्टर : आधीच जवळ जवळ छप्पन्न दिवसांचा टॉयफाइड झालेला– आणि तो असा उलटला की फार चमत्कारिक कॉम्प्लिकेशन्स् निर्माण होतात.

उमेश : तसं काही होण्याचा संभव आहे, डॉक्टर ?

डॉक्टर : संभव बराच आहे. कारण अजून टॅपरेचर कमी व्हायला हवं; खरं म्हणजे सकाळी दिलेल्या इंजेक्शननंतर ते बरंच उतरायला हवं होतं. थोडं उतरलंय— पण प्रोग्रेस फार स्लो आहे. या अवस्थेत डिलेरियमची भीती असते— भ्रम झाल्यासारखा वाटतो; त्यातून एखादेवेळी मेंदूवर परिणाम होतो— मॅनेंजायटिस वगैरे...

उमा : पण तशी काही भीती वाटते तुम्हांला ?

डॉक्टर : भीती नाही— पण काळजी करायलाच पाहिजे. मघाशी थोडा भ्रमात असल्यासारखा बोलत होता. साहेब, सुषमा कोण ? काही तरी अशाच नावाचा उच्चार दोन–तीन वेळा केला त्यानं—

साहेब : सुषमा! ते आमच्या दुर्दैवाच दुसरं नाव आहे, डॉक्टर. तेवढं सोडून दुनियेतील दुसरी कोणतीही गोष्ट आणू शकेन मी त्याच्यासाठी!

डॉक्टर : ( सुस्कारा सोडून ) मनावर कसला तरी असह्य ताण पडलाय त्याच्या. त्यामुळे निर्माण होणारी अस्थिर मनोवृत्ती ही कॉम्प्लिकेशन्स् निर्माण करते.

साहेब : ( हताशपणे ) डॉक्टर, मला एवढंच सांगा—यातून माझा मुलगा वाचेल की नाही– ( उमा एकदम, ' साहेब ' म्हणून जवळ जाते. उमेशही भयकंपित होतो. साहेब बोलतच राहतात.) मला खोटी आशा नका लावू...डॉक्टर, खरं काय ते सांगा—

डॉक्टर : साहेब, इतका निराश अजून मी तरी झालो नाही. अर्थात इतक्यात कसल्याच डेव्हलपमेंटचा अंदाज बांधणं चुकीचं ठरेल. माझे प्रयत्न मी चालू ठेवले आहेत. अजून ४८ तास तरी फार जपलं पाहिजे. टॅपरेचर उतरत आहे, तेव्हा घाबरण्याचं कारण नाही. मात्र ते थोडंसं जरी चढलं तरी फोन करा मला ताबडतोब. ( उमेशला ) डोन्ट वरी; एव्हरी थिंग वुईल बी ऑल राइट! बरं आहे, साहेब. ( उमाकडे बोट दाखवून ) या स्वतः त्याची देखभाल करताहेत म्हणून घाबरू नका म्हणतो मी! अहो, चांगला डॉक्टर तर

लागतोच! पण डॉक्टरपेक्षा चांगल्या नर्सची अधिक गरज असते पेशंटला. (उमाला) बरं; मी पुन्हा रात्री फोन करीन— हं. अच्छा– (हसतात व... जातात.)

साहेब : (पुटपुटत) ४८ तास– म्हणजे– अजून दोन रात्री आणि दोन दिवस– ४८ तास!

उमा : साहेब, तुम्ही आम्हांला धीर द्यायचा, तर तुम्हीच इतके असे हताश होऊन कसं चालेल?

साहेब : (हळवेपणाने) उमा, आपला जयेश यातून वाचेल का ग?

उमा : अशी अशुभ शंका तुमच्या मनाला शिवतेच कशी, साहेब! दिगंबर–पंतांनी सांगितलेला प्रत्येक उपास, दिलेलं प्रत्येक व्रत सावित्रीच्या पणानं पार पाडलंय मी!

साहेब : पण त्यांनीच सांगितलं ना सकाळी—हे चार दिवस त्याला फाऽऽर वाईट आहेत म्हणून—(पुटपुटत) त्यांनीच सांगितलंय—

उमा : साहेब, दिगंबरपंतांचं भविष्य एक वेळ खोटं ठरेल, पण माझा देव खोटा ठरणार नाही. विश्वास आहे माझा! देवाचं देवपण पणाला लागलं की ते त्याला सिद्ध करावंच लागतं! माझा देव माझा विश्वासघात कधीच करणार नाही—कधीच करणार नाही!

उमेश : साहेब, तुम्ही उगीच चिंता करता आहात. आत्ताच डॉक्टरांनी सांगितलं ना, की त्याचा ताप हळूहळू उतरतोय—

साहेब : उमेश, या सगळ्या प्रकाराला मीच कारण झालो आहे. फार मोठा अपराध केलाय मी तुमचा सगळ्यांचा! फार मोठा अपराध केलाय!

उमा : साहेब, असं कसं म्हणता? चूक कुणाची होत नाही? पण नकळत झालेली चूक म्हणजे अपराध नव्हे!

साहेब : माझं सांत्वन करतेस पोरी! अग, दशरथानं मुद्दाम बाण नाही मारला श्रावणाला, पण चुकून लागला म्हणून शापातून सुटला नाही तो— आयुष्यभर पाठलाग करून त्या शापानं आयुष्याच्या अंती त्याला गाठलंच... शेवटी त्या शापानं त्याला गाठलंच— त्याला गाठलंच— (पुटपुटत उठतात— थरथरत खोलीकडे जात असतानाच अंधार होतो व दृश्य संपते— )

[ स्थळ : जयेशच्या खोलीचा कोपरा. जयेश कॉटच्या कठड्याला टेकून ठेवलेल्या उशीवर रेलून पडला आहे. डोळे मिटलेले आहेत. स्पॉटच्या प्रकाशात त्याचे ओठ फक्त हलताना दिसतात. दूरवरून रात्रीचे १२ चे टोले पडताना ऐकू येतात. खाली टेलिफोनची घंटा वाजते. उमाचा टेलिफोनवरचा अस्पष्ट आवाज शांततेमुळे स्पष्ट ऐकू येतो— ]

उमा : " हॅलो, डॉक्टर ?—हो, हो—आता बारा वाजलेत. ताप साफ उतरलाय आता—हो—हो—छान झोप लागलीय त्यांना—गोळ्या ना- दिल्या. घाम फार येतोय- येऊ दे—ठीक !... आता काही काळजी करायचं कारण नाही ना ? काय म्हटलंत- उद्या फिरायला घेऊन जाऊ ? ओह- थँक यू , डॉक्टर ! उद्या फोन करीन— जरूर नसली तरी करीन—बरं—हो मी पण झोपते—हो अगदी शांतपणे—गुड नाइट ! " ( फोन ठेवल्याचा आवाज. )

[ जयेशचा घोगरा आवाज पुटपुटल्याप्रमाणे प्रेक्षकांना ऐकू येतो— त्याचे डोळे मिटलेले आहेत— ओठ अगदी किंचित हालचाल करताहेत—व्हिस्पर ऐकू येतो— ]

जयेश : " सुमा ऽ ऽ –सुमा ऽ ऽ – माझ्याकडे ये— तू माझी आहेस —सुमा ऽ तू माझी आहेस..."

[ दरवाज्याजवळ वरून पडलेल्या प्रकाशात त्याला सुमा उभी दिसते —त्याचे डोळे मिटलेले आहेत—ओठ स्थिर आहेत—आवाज —" ये—सुमा ऽ ऽ —जवळ ये माझ्या— " दरवाजातून उमा प्रवेश करते. उमा खुषीत आहे, जवळ जाते—कॉटवर त्याच्याकडे पाहात असते— कपाळाला हात लावते— आवाज—" आलीस —जवळ ये माझ्या— अजून जवळ " उमा पदराने त्याचा घाम पुसू लागते— तो तिला एकदम मिठी मारतो— ]

उमा : " जयेश— सोडा मला— "

जयेश : ( तिला घट्ट धरीत, थरथरत्या आवाजात ) सुमा ऽ ऽ तू माझी आहेस, फक्त माझी—

उमा : सोडा — मला — जयेश—

[ थाड थाड त्याच्या तोंडावर मारते— तो विकल होऊन पडतो —ती भूत दिसल्याप्रमाणे त्याच्याकडे पाहते— तो डोळे उघडून— ]

जयेश : वहिनी, वहिनी—

[ अशी तिच्याकडे पाहात हाक मारतो— तो हाक मारीत असतानाच ती निघून जाते. अंधार होतो—अंधारात त्याच्या "वहिनी, वहिनी" अशा हाकांचे अस्पष्ट प्रतिध्वनी घुमतात. स्पॉट पुन्हा उजळतो— उमाच्या चेहऱ्यावर, ती कानांवर हात ठेवते—जयेशचे शब्द तिला ऐकू येतात— "गणपतीने गाईला प्रदक्षिणा घालून पृथ्वीप्रदक्षिणेचं पुण्य मिळविलं. मला जर कुणी पृथ्वीप्रदक्षिणा घालायला सांगितलं तर, भैया, मी वहिनीला प्रदक्षिणा घालीन आणि बेधडक सांगेन, झाली पृथ्वीप्रदक्षिणा! ती कानांवर हात ठेवून पुटपुटते— "भगवान— हे खरं आहे की ते खरं आहे— सांग—परमेश्वरा! काय खरं आहे?" प्रकाश उजळतो. तिच्या मागे उमेश उभा आहे. हॉलचे दृश्य लागले आहे. ]

उमेश : काय खरं आहे— उमा, काय खरं आहे का?

उमा : काही नाही— काही नाही—

उमेश : काही नाही?

उमा : खरंच काही नाही ऽ ( जाऊ लागते. )

उमेश : थांब उमा. गेले दोन दिवस तुझं चित्त ठिकाणावर नाही, वेड्यासारखी कुठं तरी पाहात उभी राहतेस— काही तरी हरवलेलं— शोधीत असल्यासारखी! मग असं काही तरी पुटपुटतेस. उमा, मला सांग काय होतंय तुला?

उमा : पुटपुटते कोण— मी— कधी— छे— तुम्हाला उगीच भास होतो काही तरी!

उमेश : भास ? आता म्हणालीस-- " हे खरं आहे का, परमेश्वरा ? " मी शब्द स्पष्ट ऐकले- हा भास ? सांग-- उमा.

उमा : मी म्हटलं ?

उमेश : हो. तू म्हटलंस— " हे खरं की ते खरं— सांग, परमेश्वरा " काय खरं आहे का, उमा ?

उमा : मला आठवत नाही— काही तरी बोलले असेन—( उमेशकडे पाहते— उमेश न पटल्यासारखं तिच्याकडे पाहात राहतो ) — का छळता आहात मला— तुम्हांला सांगितलं ना, भास झाला तुम्हांला ! ( समोर हरवलेल्या दृष्टीने पाहात उभी राहते. )

उमेश : ( हळूच तिच्यामागे येऊन तिच्या खांद्यावर हात ठेवीत ) उमा ! ( ती दचकून दूर सरते ) उमा, काय होतंय तुला ? माझं काही चुकलं का ? स्पष्ट सांग—

उमा : नाही, उमेश, तसं काही नाही.

उमेश : मग गेले दोन दिवस तू माझा स्पर्श का टाळते आहेस ?

उमा : कुठे— छे— काही तरीच !

उमेश : काही तरीच ? आत्ता तुझ्या खांद्यावर मी हात ठेवला— तर तू दूर सरकलीस— का ? ( ती न बोलता तशीच उभी राहते... उमेश तिच्या जवळ जाऊन तिचे दंड मागून धरतो. ) उमा ! काय होतंय तुला ? मला नाही सांगणार ?

उमा : ( त्याचा स्पर्श असह्य झाल्याप्रमाणे ) सोडा मला उमेश, प्लीज— प्राण कंठाशी आलेत माझ्या—सोडा मला— ( तो सोडीत नाही ) जयेशला कॉफी द्यायची वेळ झालीय. मी कॉफी ठेवलेय गाळून— निवून जाईल ना ती— ( तो तिचे दंड सोडतो. ती आत जाते. उमेश विचार करीत क्षणभर उभा राहतो— नंतर टेलिफोनची डायल फिरवतो. )

उमेश : हॅलो— हॅलो—दादासाहेब आहेत ? मग कोण आहे ? काकी आहेत ? जरा बोलवा फोनवर. ( थोड्या वेळाने ) कोण, काकी ? मी उमेश बोलतोय. आज सुमा येणार आहे ना बडोद्याहून ? स्टेशनवर ? कोण, दादासाहेब गेलेत ? गाडी कितीला येते ? साडेसहाला ? बरं, मग आल्याबरोबर पाठवाल का इकडे तिला ? हो—माझं काम आहे महत्त्वाचं—अच्छा-- ( फोन ठेवतो.

उमा कॉफीचा कप घेऊन प्रवेश करते. )

उमा : राघू, राघू— ( तिच्या आवाजात थकल्याची जाणीव स्पष्ट आहे. )

उमेश : राघू मळ्यावर गेलाय.

उमा : ( रागाने ) कुणी पाठवला त्याला ?

उमेश : मी सांगितलं जायला—

उमा : ( स्वतःशीच ) आता कॉफी कोण देणार त्यांना ?

उमेश : का ? तू दे की.

उमा : ( घाबरून ) पण-- संध्याकाळ झालेय-- काळोख झालाय--

उमेश : बरं, मग ?

उमा : अं ऽ ! काही नाही.— ( कॉफीचा कप घेऊन जयेशच्या जिन्याकडे जाते. हातातला कप थरथरू लागतो. जिन्याजवळ जाऊन ) उमेश, मला बघा जरा थकल्यासारखं झालंय. तुम्ही देता कॉफी ?

उमेश : हो, देतो ना ! त्यात काय आहे ? दे इकडे. ( कॉफीचा कप घेतो. वर जातो. उमा थकून जिन्याच्या पायरीवर बसते. शून्य नजरेने समोर पाहात असते. उमेश कप ठेवून ताबडतोब परत येतो. तिला चाहूल न देता तिच्या मागच्या पायरीवर उभा राहतो, आणि अस्पष्ट घोगऱ्या स्वरात तिला हाक मारतो— वहिनी ऽ—

उमा : ( वादळ झाल्याप्रमाणे उठते-- वेगाने कोचाकडे धावत जाते ) दूर व्हा —जयेश– मला हात लावू नका-- माझ्या गळ्याची शपथ आहे तुम्हाला—

[ तिचा ऊर धडधडत असतानाच ती वळून पाहाते, उमेश अजून जिन्यावरच उभा आहे. ]

उमा : ( थरथरत ) तुम्ही ? मग मला वहिनी म्हणून कुणी हाक मारली ?

उमेश : वहिनी ? छे. मी 'उमा' म्हटलं. तुला भास झाला असेल.

उमा : तुम्ही कॉफी दिलीत जयेशना ?

उमेश : राघू देतोय.

उमा : राघू मळ्यावर गेलाय ना ? मग खोटंच सांगितलंत ?

उमेश : तू मला खोटं सांगते „आहेस-- मग मी सांगितलं तर काय झालं ? ( उमा जाऊ लागते )

उमेश : थांब उमा. ( ती थांबते ) काल संध्याकाळची गोष्ट. राघू आत जयेशला कॉफी देत होता. जयेशनं त्याला विचारलं-- " वहिनी कुठे आहे ? ती माझ्या खोलीत का येत नाही कॉफी घेऊन ? तिला बरं नाही का ? माझं इतकं केल्या-मुळेच ती आजारी पडली असेल ! नाही तर मला कॉफी द्यायला ती तुला नाही पाठवणार ! " नंतर असंच काही बोलत होता तो, मी माझ्या खोलीतून ऐकत होतो. मी खोलीतून बाहेर आलो. अंधारात जयेशच्या खोलीबाहेर दरवाजाला डोकं टेकून तू त्याचं बोलणं ऐकत होतीस आणि ढसाढसा रडत होतीस.

उमा : तुम्ही पाहिलं मला ?

उमेश : हो पाहिलं– पण काही विचारलं नाही. आज राहावलं नाही म्हणून विचारलं. पण आता वाटतंय उगाच विचारलं ! ( निःश्वास सोडून ) उमा, मला वाटलं होतं, तुला माझा आधार वाटतो. पण आज तुला असं असहाय्य-पणे रडताना पाहिलं आणि मला कळून चुकलं, की तू या घरात एकटी आहेस. मी तुझा कुणी नाही– तुझा माझ्यावर विश्वास नाही– उमा, ज्या व्यक्तीवर आपण प्राणापलीकडे प्रेम करतो तिचा साधा विश्वाससुद्धा मिळवता येऊ नये, यासारखं दुसरं दुःख नसेल.

उमा : तसं नाही– उमेश, तुमच्या पायाशपथ सांगते, खरंच तसं नाही !

उमेश : ( चिडून ) तसं नाही तर कसं आहे ? मग मला का सांगत नाहीस स्पष्टपणानं तुला काय झालंय ते ? का लपवून ठेवतेस माझ्यापासून ?

उमा : लपवण्यासारखं काही नाही.

उमेश : अजून खोटं बोलतेस माझ्याजवळ ? लपवण्यासारखं काही नाही मग रडत का होतीस काल-- एकटीच ? मघाशी मी मुद्दाम ' वहिनी ' अशी हाक मारताच का थरथरत ओरडलीस वेड्यासारखी– ' जयेश, मला हात लावू नका '– काय केलं त्यानं– सांग मला.

उमा : काय सांगू उमेश ? मला काहीच माहीत नाही– तुम्हांला काय सांगू ?

उमेश : डोन्ट बी सिली, उमा ! काहीच वेगळं, विचित्र घडलं नाही, असं का तुला म्हणायचं आहे ?

उमा : अं– तसं– घडलं काहीच नाही—

उमेश : मग तू असं का वागतेस ?

उमा : असं– म्हणजे कसं ?

उमेश : असं— म्हणजे नेहमीसारखं नाही. एखादं भूत, पिशाच्च अकस्मात दिसलं तर माणूस घाबरून जातं ना, तसं!—कशाचा तरी धसका घेतल्यासारखं!-- (उमा स्वतःशीच मुळूमुळू रडू लागते.)

उमेश : (तिच्याजवळ जात) असं काय करतेस वेड्यासारखं? तुझं दुःख मला नाही सांगणार?

उमा : पण ते सांगता येत नसेल मला तर?

उमेश : प्रयत्न कर— सांगता येईल तुला! नाही तरी या अवघडलेल्या अवस्थेत स्वतःचा कोंडमारा तू आणखी किती दिवस करून घेणार आहेस? दुःख कुणाजवळ तरी बोलून दाखविलं की ते हलकं होतं, मन मोकळं होतं आणि मग मार्गही सापडतो. सांग— काय झालं— जसं घडलं तसं सांग.

उमा : उमेश—

उमेश : (विश्वास देत) बोल— उमा— बोल. घाबरू नको. काय वाटेल ते असलं तरी मार्ग काढू आपण त्यातून.

(या वेळी जयेश जिन्याच्या वरील पायरीवर येऊन ऊभा राहतो.)

उमा : हे बघा उमेश, जे घडलं त्याचा अर्थ अजूनही नीटसा उलगडला नाही माझा मलाच! मग तुम्हांला काय सांगू? जसं घडलं तसंच सांगितलं पाहिजे! जितकं घडलं त्याच्यापेक्षा थोडं अधिक किंवा वेगळं— शब्दांनी सांगितलं तर मी काय करू— उमेश! (विकलपणे रडू लागते.)

उमेश : काही काळजी करू नको. मला फक्त काय घडलं ते सांग. त्याचा अर्थ आपण नंतर लावू. माझ्यावर विश्वास आहे ना तुझा?

उमा : हो— आहे! (त्याच्याकडे एकदा पाहते.)

उमेश : (धीर देत) बोल— घाबरू नको.

उमा : (डोळ्यासमोर प्रसंग घडत असल्याप्रमाणे बोलते) ज्या रात्री जयेशचा ताप उतरला त्या रात्रीची गोष्ट. रात्री १२ वाजता डॉक्टरांचा फोन घेऊन मी त्यांच्या खोलीत गेले— (अडखळत) त्यांच्या शेजारी बसले; त्यांच्या कपाळावरचा घाम पुसू लागले— आणि— आणि—

उमेश : बोल— उमा. आणि काय?

उमा : (रुद्ध स्वरात धापा टाकीत) आणि त्यांनी मला मिठी मारली; म्हणाले— "तू माझी आहेस, उमा"— मी मिठी सोडवू लागले तर ते मला सोडीनात.

(रडू लागते, उमेश क्षणभर सुन्नपणे उभा राहतो– नंतर स्वतःला सावरून तो बोलू लागतो.)

(जयेश आघात झाल्याप्रमाणे मागे वळून जातो.)

उमेश : उमा, हे बघ. तो इतके दिवस आजारी होता– त्यातून ताप उलटला (ती त्याच्याकडे पाहते) हो– त्या दिवशी ताप उतरला होता हे खरं. पण हे घडलं तेव्हा एखादे वेळी भ्रमात किंवा झोपेच्या गुंगीत असेल तो !

उमा : कदाचित असतीलही– पण– पण मग---

उमेश : पण ? पण काय ?

उमा : (स्वतःशीच) पण मग 'वहिनी--- वहिनी' अशा हाका कशा मारल्या असत्या त्यांनी ? मला ओळखलं कसं असतं ?

उमेश : तुला ओळखलं ? वहिनी अशी हाक मारली ? (क्षणभर विचारमग्न होऊन) म्हणजे हे सारं त्यानं कळून सवरून केलं असं म्हणायचं आहे तुला ?

उमा : (घाबरून थरथरत्या स्वरात) मला ?– अंहं ! मला काहीच म्हणायचं नाही. तुम्हीच मला काय घडलं ते सांग म्हटलंत– मी सांगितलं– आता तुम्ही मलाच त्याचा अर्थ विचारता आहात ?

उमेश : (सुन्नपणे) छे ! डोकं काम करीनासं झालंय ! तू म्हणतेस तसं घडलं असलं— तुला काही वेगळं जाणवलं असलं— तुला काही संशय आला असेल तर– हा सगळाच प्रकार भयंकर आहे !

उमा : आणि माझं चुकत असेल तर ?

उमेश : उमा, आयुष्याच्या अंतापर्यंत तू सगळ्यांना सांभाळीतच राहणार आहेस का ? उमा, (थोड्या वेळाने) हे बघ, तू स्त्री आहेस. स्पर्शाचा अर्थ स्त्रीला कुणी समजावून द्यावा लागत नाही. या प्रकाराचा तू लावलेला अर्थ कसा चुकेल ?

उमा : पण मी कोणताच अर्थ लावला नाही अजून.

उमेश : का नाही लावलास--

उमा : भलताच अर्थ लावला आणि अनर्थ झाला तर मग ?

उमेश : तू मला सांग, त्याच्या एकंदर वागणुकीनं तुझ्या मनात काही संशय आला आहे काय ?

उमा : संशय– अंहं! फक्त सगळ्या प्रकारानं अगदी हादरून गेलेय मी. भीती वाटते कसली तरी! वाटतं– परमेश्वर कसली तरी घोर परीक्षा बघतोय माझी! त्यांच्या खोलीत जायचा विचार जरी माझ्या मनात आला, तरी पायांतलं त्राण नाहीसं होतं– थकून, गळून गेल्यासारखं वाटतं– वाटतं– पुन्हा तसं काही घडलं तर– आणि– आणि मग– कसल्या तरी अनामिक भीतीनं ऊर धडधडू लागतो– जीव गुदमरू लागतो– काळजातून किंकाळी उठते. पण ओठांतून उमटत नाही– गळ्यात गोठून जाते– बर्फासारखी! ही भीती– ही भीती– माझा प्राण घेईल, उमेश!

उमेश : यालाच संशय म्हणतात.

उमा : उमेश, तुम्हा पुरुषांना फक्त संशय ओळखीचा वाटतो. मी स्त्री आहे– माझी भीती वेगळी आहे.

उमेश : अग, पण संशय नाही, मग भीती कसली?

उमा : का? अंधारात ओळखीच्या वस्तूंचीसुद्धा भीती वाटत नाही माणसाला? नसलेल्या आकृती दिसल्याचा भास नाही होत?

उमेश : पण हे कळत असतानासुद्धा––

उमा : हो, हो कळत असतानासुद्धा अकस्मात अंधार झाला, तर काटा तरी येतोच ना माणसाच्या अंगावर– काळीज धडधडतं ना प्रकाश दिसेपर्यंत?

उमेश : मला कळत नाही –खरंच कळत नाही तुझं म्हणणं–

उमा : नाहीच कळणार– कारण तुम्ही स्त्री नाही ना झालात! (थोड्या वेळाने) उमेश, स्त्रीचं स्त्रीत्व हाच स्त्रीला मिळालेला शाप आहे मोठा! त्या स्त्रीत्वाची जपणूक करताना तिला घायाळ व्हावं लागतं! इतरांना घायाळ करावं लागतं.

उमेश : (वैतागून) स्पष्ट बोल उमा– असं बोलून मला काय कळणार?

उमा : स्पष्ट बोलू? जे स्पष्टपणानं जाणवलं नाही— समजलं नाही– उमजलं नाही– ते स्पष्टपणानं कसं बोलू?

उमेश : मग मी काय करू सांग?

उमा : (थकल्या स्वरात) काही करू नका. भोवऱ्यात सापडलेल्या माणसाला स्वत:लाच बाहेर पडावं लागतं; दुसरं कोणी त्याला वाचवू शकत नाही. आणि कुणी वाचवायला गेलाच तर तोच सापडतो भोवऱ्यात– तुमच्यासारखा!

उमेश : हे बघ, मी विचारतो जयेशला– स्पष्टच!

उमा ( घाबरून ) नका, उमेश, माझ्या गळ्याची शपथ आहे तुम्हांला– काही विचारू नका– माझ्या नशिबाचे सगळे भोग संपेपर्यंत भोगलेच पाहिजेत मला! –नका विचारू, कुणालाच काही विचारू नका.

उमेश : पण का नको? काय झालं ते कळलंच पाहिजे आपल्याला.

उमा ( भडकून ) कशाला कळलं पाहिजे? कुणाला कळलं पाहिजे? मला नकोय कळायला काय झालं ते!

उमेश : ( ठामपणे ) तुला नको असलं— तरी मला हवंय! माझ्यासाठी नाही —तुझ्यासाठी!

उमा : जरा माझं ऐका, उमेश– नका विचारू त्यांना काही!

उमेश : ( चिडून ) पण का नको?

उमा : कारण– कारण भरवंशानं दोरी समजून आधार घ्यायला गेलात आणि तो साप ठरला तर— ( वेगाने 'हे भगवान' म्हणत धावत आत जाते. )

उमेश : ( चमकून ) उमा ऽ! ( हाक मारीत तिच्या मागे धावतो. जयेश अडखळत खाली येतो. समोरच्या टेबलावरील कागद घेतो—तिथलेच पेन घेतो– आणि चिठी लिहून उठतो. जाऊ लागतो— थांबतो— स्वेटर काढून जिन्यावर टाकतो व बाहेरच्या दरवाजातून निघून जातो.– थोड्या वेळाने उमेश उमाला जवळ जवळ खेचीतच घेऊन येतो. )

उमा : नका, उमेश, काहीही सिद्ध करण्याचा प्रयत्न करू नका. काय मिळणार आहे हे नसतं सिद्ध करून?

उमेश : ( चिडून ) उमा, आता गप्प बस जरा. सत्याला घाबरायचं नसतं— तोंड द्यायचं असतं!

उमा : ( एकदम काही भयानक कल्पना मनात आल्याप्रमाणे ) उमेश, तुम्ही म्हणता तसं जर हे त्यांच्या हातून भ्रमात घडलं असेल तर?

उमेश : तर? तर काय?

उमा : तर ते त्यांना कधीच कळता कामा नये! नाही तर– नाही तर– काही तरी भलतंच करून घेतील ते आपल्या जिवाचं– सध्या त्यांना दिवसही बरे नाहीत!

उमेश : ( तिच्या डोक्यावरून मायेने हात फिरवीत ) काळजी करू नको. उमा, मी त्याला काही कळू देणार नाही– मग तर झालं? खरंच त्याच्यावर आई-

सारखी माया करतेस तू! घाबरू नको— जयेश— जयेश— ( हाका मारीत जयेशच्या खोलीत जातो—)

[ उमाचे लक्ष जिन्याच्या पायथ्यापाशी पडलेल्या स्वेटरकडे जाते. तिला जयेशचा स्वेटर दिसतो. तो ती उचलते– कावरीबावरी होऊन इकडेतिकडे पाहते– टेबलावर चिठ्ठी दिसते. ती उचलते. वाचते. चिठीतून जयेशचा आवाज प्रतिध्वनित होतो—" वहिनी, भैयाशी झालेलं तुझं बोलणं ऐकलं. त्या रात्री मला सारखा सुमा आल्याचा भास होत होता. मी सुमाला जवळ ओढलं आणि तिनं मला थाड्थाड् मारलं– मी डोळे उघडले तेव्हा तू जाताना दिसलीस– मी तुला हाका मारल्या. मला विचारायचं होतं की सुमानं मला का मारलं? आज कळलं!— पण नसतं कळलं तरी चाललं असतं! त्या भ्रमात मी 'सुमा' म्हटलं असेन— तुला 'उमा' ऐकू आलं हे माझं दुर्दैव! पण मी सदाचाच दुर्दैवी आहे! नाही तर माझ्या हातांची ती तशी मिठी चुकीनं का होईना तुला का पडली असती? नाही— वहिनी— तो स्पर्श तुला झाला? असह्य होतं —जीव व्याकुळ होतो नुसत्या कल्पनेने! चुकून घडलेल्या पापाचं सुद्धा प्रायश्चित्त घ्यावं लागतं ना वहिनी? तेच घेणार आहे मी! शक्य असल्यास मला माफ कर. पुन्हा माफी मागण्यासाठी सुद्धा तुझ्या जीवनात येणार नाही मी. (नाही तरी जिचा भरंवसा वाटत नाही, आधार वाटत नाही, त्या दोरीनं कशासाठी जगायचं– कुणासाठी टिकायचं? तिनं तुटून जावं हेच बरं! तेच करणार आहे मी! तुला कधीच सुखी न करू शकलेला आणि म्हणून तुझा नसलेला जयेश." उमा 'जयेश' म्हणून किंकाळी मारते. उमेश धावत खाली येतो. ]

उमेश : उमा, जयेश कुठं आहे? वर खोलीत नाही. गच्चीवर पण नाही! ( ती चिठी देते. )

उमा : जयेशला वाचवा—उमेश– ('जयेश' म्हणत बाहेर धावते— तिच्या मागोमाग तिला हाका मारीत उमेश धावतो.) ( साहेब प्रवेश करतात. )

साहेब : अरे, काय आरडाओरड चाललीय ? उमेश—उमा- (समोर पडलेली चिठी उचलतात—वाचीत कोचापर्यंत येतात—एकदम कोचावर कोसळतात.)

साहेब : परमेश्वरा, अरे काय आहे तुझ्या मनात ? (आत 'जयेश—वहिनी' अशा सुमाच्या हाका ऐकू येतात. सुमा धावत प्रवेश करते. तिच्या हातात पेढ्यांचा बॉक्स आहे.)

सुमा : (अत्यानंदाने) वहिनी, काका, वहिनी कुठे आहेत? जयेश- जयेश... काका, आता दादा—माईचा विरोध नाही आमच्या लग्नाला. तुमचाही नाही ना ? तुम्ही म्हणत होतात ना तसं जयेशनं शिखर काबीज केलंय पराक्रमाचं—नुसतं शिखर नाही काका, अगदी एव्हरेस्ट गाठलंय ! काका—काका—याच सोन्याच्या दिवसाची मी वाट पाहात होते, काका—तो आज उगवला- उशिरा का होईना— पण उगवला काका— उद्या दहा किलो पेढे आणायला सांगितले आहेत दादांनी. सगळ्या गावाला वाटणार आहे मी. आधी त्या गोविंदकाकांच्या घशात किलोभर पेढे घालणार आहे—नेहमी जयेशची निंदा करायचे ! कुठे आहेत ते ? त्यांनीच ते फोटो छापले ना— माई सांगत होती. जयेश कुठं आहे काका ? कशी आहे प्रकृती त्याची- त्याला द्यायला पेढे आणले आहेत मी. तुम्ही घ्या ना काका- (आपणच बोलत आहोत हे लक्षात येऊन थांबते-साहेबांजवळ जाते- त्यांच्या डोळ्यांतून घळाघळा धारा वाहात असताना-) काका, काय झालं ? बोलत का नाही, काका ? (साहेब तिच्या हातात चिठ्ठी देतात.)

सुमा : (चिठी वाचून-) नाही, जयेश नाही ! काका, देव माझी अशी क्रूर थट्टा करणार नाही.

साहेब : घाबरू नको, सुमा ! उमेश गेलाय त्याला परत आणायला.

सुमा : नाही- असं होणार नाही- मी होऊ देणार नाही—

(धावत जाते—अंधार होतो—अंधारात दृश्य बदलते.)

## दृश्य चवथे

[ अस्पष्ट प्रकाशात रेल्वेच्या बोगद्याचे दृश्य दिसते. लाल सिग्नलच्या प्रकाशात रूळ चकाकत आहेत. सिग्नलच्या पायथ्याशी

जयेश बसला आहे. सिग्नल हिरवा होतो. दूरवर आगगाडीची कर्कश शिटी ऐकू येते. जयेश रुळावर उभा राहतो. लांबून उमाच्या व उमेशच्या हाका ऐकू येतात. दूरवर आगगाडीचा दिवा दिसतो. त्याचा प्रकाश मोठा मोठा होतो. उमा धावत येते. ]

उमा : बाजूला व्हा, जयेश– ( त्याचा हात धरते. )

उमेश : दूर हो वहिनी– मला मरायचं आहे– (मोठा प्रकाशझोत दोघांवर पडतो– इतक्यात उमेश धावत येतो व दोघांना खेचून घेतो– त्यांच्यामागून आगगाडी धडाडत जाते. सिग्नल पुन्हा लाल होतो. त्या प्रकाशात उमाचे डोळे धक्का बसल्यासारखे दिसतात. अंधार होतो. )

## दृश्य पाचवे

[ साहेबांच्या दिवाणखान्याचं दृश्य लागतं. ]

उमा : साहेब, तुमचा मुलगा तुम्हांला परत आणून दिलाय मी. या घराला आता माझी गरज नाही. सुमा आलीय– ती सांभाळील हे घर. या घराचा इतका भयंकर अपराध केल्यानंतर या घरात मला आता जागा राहिली नाही, साहेब—

साहेब : कसला अपराध घेऊन बसलीस उमा ? आता हे सगळं तुझ्यामुळे झालं याचीच खंत वाटतेय तुला– पण का ? अग, जी चुकत नाहीत ती माणसं नाहीत, चांगली असलीस तरी तू माणूस आहेस. आपण चुकतो हाच आपल्या माणुसकीचा एकमेव पुरावा आहे. किती झालं तरी मातीत पडलेली फुलं आपण ! मातीत पडलेल्या फुलांना मातीचा वास येणारच ! तो वास हाच आपला खरा सुगंध आहे. कारण आपण हरघडी चुकणारी, वाट हुकणारी माणसं आहोत, हे तो वासच सिद्ध करतो ना ?

जयेश : वहिनी, माझं थोडंसं ऐक. वाटलं तर माझ्याशी बोलू नको– माझ्याकडे पाहू नको. पण घर सोडून जाऊ नको. तू मला घडवलंस. आता तूच मला

तोडू नको. मी जीव द्यायला आलो, हा अक्षम्य अपराध केला मी तुझा.. त्याची क्षमा वहिनी, तू मला कधी कधीच करू नको– पण– पण वहिनी, चांदोबाच्या तुपात पुन्हा माशी पडलेय. अलगद उचलून फेकून दे ना ती ? वहिनी –तुझ्या चांदोबाला कायमचा उपाशी ठेवू नको– कायमचा उपाशी ठेवू नको. (तिच्या पायांवर पडतो)

उमा : (इतका वेळ आणलेलं अवसान गळून ढसढसा रडत–) मग जीव द्यायला का गेलात ? तुमच्या जीवासाठी आम्ही जीव पणाला लावून धडपडायचं...

जयेश : चुकलं– खरंच चुकलं...बोलू नको वहिनी– फार चुकलं—

उमा : (रडत) आणि तुम्ही खुशाल जीव द्यायला जायचं– वहिनीला ही शिक्षा-ही शिक्षा...

जयेश : नाही– नाही–– मी मूर्ख आहे–– शांत हो, वहिनी, शांत हो—

उमा : (रडत) आणि आज मेला असतात मग–– मी काय केलं असतं ? बोला.. काय केलं असतं ? (भावनातिरेकाने त्याला मारीत...) कराल पुन्हा असं ? जाल जीव द्यायला...जाल जाल... (मारता मारता थकून थांबते—उमेश व सुमा तिला दोन्ही बाजूंनी धरतात.)

जयेश : मार. वहिनी, मार— थांबू नको. ज्या तुझ्या स्पर्शासाठी मी दोन दिवस आणि दोन रात्री तडफडत होतो त्या तुझ्या अमृताच्या स्पर्शानं माझ्या जीवनाचा पोरकेपणा भरून काढ वहिनी— मार ना—

(तिच्या हातात डोके खुपसतो — तिच्या डोळयांतून अश्रूंची धार वाहू लागते आणि तिचे हात त्याचे केस कुरवाळू लागतात.)

IRBK-0118881

प ड दा

IRBK-0118881

म. ग्रं. सं. ग्रं., वाचनालय मुंबई.
दा. क्र. १८८८७ दि २०.८.८...
वि. ...नाटक